यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

१२ मार्च २०१५

स्व. यशवंतराव चव्हाण यांना
१०२ व्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन




मा. श्री. शरद जोशी यांना
अध्यक्ष : मा. शरद पवार
शरद पवार

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच./बी.ओ.एम.-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२८५२०८१, २२०४५४६० • फॅक्स : २२८५२०८१/८२

## • विश्वस्त मंडळ सदस्य •

१. मा. श्री. शरदराव पवार — अध्यक्ष
२. मा. श्री. अरुण गुजराथी — उपाध्यक्ष
३. मा. सौ. सुप्रिया सुळे — कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे — सरचिटणीस
५. मा. श्री. हेमंत टकले — कोषाध्यक्ष
६. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर
७. मा. श्री. राम प्रधान
८. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
९. मा. श्री. बी. के. अग्रवाल
१०. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
११. मा. श्री. अजित निंबाळकर
१२. मा. श्री. अमित डहाणूकर
१३. मा. श्री. समीर दलवाई
१४. मा. श्री. ना. धों. महानोर
१५. मा. सौ. प्रभा कुलकर्णी

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

## • कार्यकारिणी मंडळ सदस्य •

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. रा. सु. गवई
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
२०. मा. श्री. चंद्रकांत घुले-पाटील
२१. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

## • कार्यकारी समिती •

१. मा. श्री. शरदराव पवार — अध्यक्ष
२. मा. श्री. अरुण गुजराथी — उपाध्यक्ष
३. मा. सौ. सुप्रिया सुळे — कार्याध्यक्ष
४. मा. श्री. श. गं. काळे — सरचिटणीस
५. मा. श्री. हेमंत टकले — कोषाध्यक्ष
६. मा. श्री. अजित निंबाळकर — विश्वस्त सदस्य
७. मा. श्री. जीवनराव गोरे — सदस्य
८. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील — सदस्य

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

### विभागीय केंद्रे

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. रा. सु. गवई |

### विविध विभाग

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर - श्री. सुशील गुप्तन |

### मुख्य कार्यालय

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | प्रमुख लेखाधिकारी | श्री. महेश चव्हाण |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परिक्षक | | मे. सी.व्ही.के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | | मे. वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउंटंट |

Website : www.ybchavanpratishthan.org.     E-mail : ybchavan100@gmail.com

# संपादकीय

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०२ व्या जयंती दिनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांच्या कार्याचा हा अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे.

यंदा आपण चव्हाणसाहेबांना अभिवादन करताना उद्यमशीलतेचा सन्मान करणार आहोत. भारतीय उद्योग जगताला उत्तुंग शिखरावर नेऊन ठेवणारे टाटा समूहाचे निवृत्त अध्यक्ष आदरणीय श्री. रतन टाटा यांचा प्रतिष्ठानच्या **'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार, २०१४'** या पुरस्काराने गौरव करून उद्योग, सामाजिक तसेच आर्थिक परिवर्तनाच्या दिशेने त्यांनी केलेल्या असामान्य कार्याचा सन्मान आपण करतो आहोत. आदरणीय चव्हाणसाहेबांनी आखून दिलेल्या संतुलित आणि सर्वंकष उद्यमी जगताची परिपूर्ती रतन टाटा यांच्या रूपाने आपल्याला अनुभवण्यास मिळाली. त्यांचा सन्मान म्हणजे एक प्रकारे वैश्विक झेप घेतलेल्या राष्ट्रीय वृत्तीच्या भारतीय उद्योग जगताचा सन्मान आहे.

यावर्षीचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा युवा पुरस्कार स्वीकारणारे प्रयोगशील जि.प. शिक्षक संदीप गुंड यांच्या कार्याची मोहर राज्यच नाही तर राष्ट्रीय पातळीवर उमटली असून त्यांच्या क्षेत्रात अधिक व्यापक पातळीवर काम करण्याची संधी त्यामुळे त्यांना मिळते आहे.

प्रतिष्ठानच्या कामाबद्दल एकीकडे समाधान वाटत असतानाच आपल्यापुढील अनेक सामाजिक आव्हानांमुळे दडपून जायला होत आहे. यंदा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे व्यसनाधीन झालेल्या युवा पिढीला व्यसनमुक्त करण्याचे एक मोठे आव्हान आम्ही पेलण्याचे ठरवले आहे. साथीच्या आजारांनी दगावणाऱ्या लोकांपेक्षाही तंबाखूमुळे मृत होणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे. तंबाखूमुळे होणाऱ्या तोंडाच्या कॅन्सरचे सर्वाधिक रुग्ण भारतात आहेत. यासंदर्भात ग्रामीण भागातल्या शाळांपासून जागृती करण्याचे आम्ही ठरवले आहे. स्लाइड शो, प्रदर्शन, पथनाट्य अशा विविध प्रकारांद्वारे तंबाखूचे भीषण परिणाम आम्ही युवा पिढीवर ठसवण्याचा प्रयत्न करत आहोत. त्याबरोबरच १२ मार्च २०१५ पासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने तंबाखूविरोधी जागर करणारी एक मोठी मोहीमच सुरू करण्यात येत आहे. सलाम बॉम्बे फाउंडेशन, टाटा कॅन्सर हॉस्पिटल तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था व व्यक्ती यांच्या सहभागाने ही मोहीम यशस्वी करण्याचा निर्धार आहे.

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या हा तर आपल्या सर्वांच्याच काळजीचा विषय आहे. शेतीसंबंधात परिचर्चा आयोजित करून त्यादृष्टीने नेमक्या उपायांच्या दिशेने जाण्याचा आमचा प्रयत्न आहे. पण केवळ तेवढ्यावरच न थांबता पारंपरिक शेतीला पूरक व्यवसायांची जोड कुठली देता येईल या मार्गदर्शनासाठी विशेषज्ञांना पाचारण करून उपक्रम राबवले गेले. स्वयंरोजगाराच्या नवीन संधींचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन केले गेले, हा एक आमचा प्रयत्न आहे.

बदलते पर्यावरण हाही कळीचा मुद्दा आहे. त्याबद्दल जनजागृती सुरूच आहे. वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियानाअंतर्गत नेहमीच्या उपक्रमांबरोबर औषधी गुणधर्मांच्या वनस्पतींची

# औद्योगिक विकासाच्या नव्या दिशा

**तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अमलबजावणीच्या तोंडावर एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलच्या एका कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण यांनी केलेले हे मार्मिक भाषण. त्या काळातील नियोजित व संतुलित औद्योगिक धोरणाबाबत त्यांनी केलेला उहापोह आज अचंबित करतो. कृषि-औद्योगिक समाजव्यवस्थेचा पाया घालून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा खुलासा या भाषणांतून सहज मिळतो.**

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात आस्थेने लक्ष घालणाऱ्या तुम्हा मंडळींना भेटण्यास मला फार आनंद होत आहे. यंदा अशी संधी मला पुन्हा दिल्याबद्दल मी तुमच्या संस्थेचे आभार मानतो.

महाराष्ट्र राज्य निर्मितीकडे केवळ एक साध्य म्हणून मी पाहत नसून, महाराष्ट्रातील लोकांचे विधायक विचार व त्यांचे कर्तृत्व याची सांगड घालून विकासाच्या कार्यास चालना देण्याचे महाराष्ट्र राज्य हे एक साधन आहे असेच मी नेहमी मानत आलो आहे. या कार्यात तुमच्यासारख्या संघटनांना महत्त्वाची भूमिका बजावता येण्यासारखी आहे. राज्याचा औद्योगिक विकास भक्कम पायावर व जलद गतीने घडवून आणण्याच्या कामी सरकारशी सहकार्य करून, तुम्ही ही भूमिका योग्य प्रकारे बजावत आहात, याबद्दल मला आनंद वाटतो. तुमच्या अध्यक्षांनी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसंबंधी सविस्तर उल्लेख केला. तथापि राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला शेवटचा हात देण्याचे काम अद्यापि चालू असल्यामुळे तिच्या स्वरूपासंबंधी सर्वसाधारण विचारच मला आपल्यापुढे मांडले पाहिजेत. आपल्या राज्याची व त्याचप्रमाणे भारताची तिसरी पंचवार्षिक योजना, चालू महिन्याच्या अखेरीस अंतिम स्वरूपात तयार होईल, अशी अपेक्षा आहे. आपल्या देशाचा आर्थिक विकास आपणांस द्रुतगतीने आणि भक्कम पायावर घडवून आणावयाचा असल्या कारणाने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत लोकांच्या कर्तृत्वाला अधिक संधी व अधिक वाव मिळेल याबद्दल मला शंका नाही.

अगोदरच्या योजनांत हाती घेण्यात आलेल्या काही मोठ्या प्रकल्पांचे फळ आपल्याला तिसऱ्या योजनेच्या काळात मिळेल. पोलादाचा धंदा, वीज आणि वाहतूक यांचा आपण जो विकास करू शकलो त्यामुळे औद्योगिकरणाचा वेग वाढविण्याची गुरुकिल्ली आपल्या हाती आली आहे. आपण जी साधनसामग्री निर्माण केली आहे, तिचा पूर्ण व काटकसरीने उपयोग करून घेणे आणि त्याचबरोबर उत्पादनाची जी ताकद आज आपल्या अंगी आली आहे ती रिकामी पडून वाया जाऊ नये म्हणून खबरदारी घेणे, या गोष्टींना फार महत्त्व आहे. यासाठी कामातील कसब व तंत्र ज्यांच्याजवळ आहे अशा माणसांचा आपणांस योग्य प्रकारे उपयोग करून घेता आला पाहिजे. त्याचप्रमाणे लोकांमध्ये आपण कामाची निकड व जबाबदारी यांची जाणीव निर्माण केली पाहिजे. उत्पादनाचा खर्च कमी करण्याकरिता देशी मालाचा व साधनांचा उपयोग करून परदेशी चलनात आपण बचत केली पाहिजे. त्यासाठी नवनव्या युक्त्या-प्रयुक्त्या आपण शोधून काढल्या पाहिजेत. सरकारने औद्योगिक विकासाचा जो 'मास्टर प्लॅन' तयार कला आहे, त्यात कोणत्या भागात कोणत्या उद्योगधंद्यांचा विकास होऊ शकेल यासंबंधी सविस्तर दिग्दर्शन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या कामी उद्योगपतींना त्वरित मदत मिळावी म्हणून सरकारच्या उद्योग विभागामार्फतही व्यवस्था करण्यात आली आहे.

मुंबई शहरातील उद्योगधंद्यांच्या भवितव्यासंबंधी तुम्हाला जी चिंता वाटत आहे व जी तुमच्या अध्यक्षांनी आताच बोलून दाखविली ती मी समजू शकतो. सबंध राज्याचा समतोल विकास करण्याचे सरकारने जे धोरण

जाहीर केले आहे त्याचा अर्थ मुंबई शहराकडे दुर्लक्ष होईल असा मुळीच नाही. याबद्दल तुम्ही निश्चिंत राहावे. बृहन्मुंबईतील उद्योगधंद्याच्या वाढीस भौगोलिक कारणांमुळे मर्यादा पडतात ही गोष्ट सर्वमान्य आहे. आणि म्हणून जमीन, पाणी, वीज आणि कच्चा माल या गोष्टी जेथे उपलब्ध होऊ शकतील असे नवे विभाग नवीन उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी शोधून काढल्याखेरीज, आपल्या औद्योगिक विकासाचे पाऊल फारसे पुढे पडणार नाही. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची आखणी करताना बृहन्मुंबईतील उद्योगधंद्यांची शक्य तेवढी वाढ व्हावी म्हणून जरूर ती खबरदारी आम्ही घेतली आहे असे मी आपणांला आश्वासन देतो. खरे म्हणजे ठाण्याच्या खाडीवर पूल बांधून आणि दलदलीच्या भागांचे औद्योगिक भागांत रूपांतर करून मुंबई शहराचे औद्योगिक क्षेत्र सध्याच्या हद्दीच्या बरेच पुढे नेण्याचा आमचा विचार आहे. अर्थात् मुंबई महानगरपालिकेचे अधिकारक्षेत्र वाढविण्याची मात्र यात कल्पना नाही. मी अनेक वेळा सांगितले आहे की, मुंबई शहर सोडल्यास महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले आहे असे म्हणता यावयाचे नाही, आणि हे नाकारण्यातही काही अर्थ नाही. शिवाय गेल्या दहा वर्षांत देशांतील इतर राज्यांच्या मानाने आपली प्रगती अगदीच यथातथा झाली असल्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झालेली आहे. म्हणून जे भाग अद्यापि मागासलेले म्हणून ओळखले जातात त्या भागांत उद्योगधंदे काढून औद्योगिकरणाचे क्षेत्र वाढविणे अगत्याचे ठरते. आणि म्हणून महाराष्ट्र राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण भागात सुरू करण्यात यावयाच्या उद्योगधंद्यांची पूर्वतयारी करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर, ग्रामीण भागांत उद्योगधंद्यांची उभारणी करण्याच्या दृष्टीने ज्या औद्योगिक वसाहती स्थापन करावयाच्या आहेत त्यांना मी फार महत्त्व देतो. या औद्योगक वसाहतीत, रस्ते, वीज, पाणीपुरवठा वगैरे सोयी उपलब्ध होणार असून त्यामुळे तेथे छोटे-छोटे उद्योगधंदे सुरू करण्यास चांगलाच वाव मिळणार आहे. या सोयीचा जास्तीत जास्त फायदा घेऊन विजेवर चालणाऱ्या छोट्या छोट्या उद्योगधंद्यांची सुरुवात व वाढ करण्याच्या दृष्टीने प्रत्येक भागासाठी निश्चित स्वरूपाची योजना तयार करण्यात आली पाहिजे. शहरी भागांत आज मोठे व मध्यम स्वरूपाचे उद्योगधंदे पूरक ठरतील. मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या उद्योगधंद्यांतील उत्पादन विभागांचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागांत निघणाऱ्या छोट्या उद्योगधंद्यांकडे हे काम सोपविण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला पाहिजे. यामुळे ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेची शहरी भागांतील अर्थव्यवस्थेशी योग्य प्रकारे सांगड घातली जाईल आणि खेड्यांतून शहरांकडे धाव घेण्याची लोकांत आज जी प्रवृत्ती दिसून येते तिलाही आळा बसेल.

कृषि-औद्योगिक समाजव्यवस्थेचा पाया घालण्याचे उद्दिष्टही राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारण्यात आले आहे. ग्रामीण भागांत उद्योगधंदे काढून ग्रामीण जीवनाशी ते एकजीव करावयाचे आणि शेती व ग्रामीण उद्योगधंदे यांची सांगड घालावयाची हाच याचा अर्थ आहे. ग्रामीण भागांत याप्रमाणे शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे निघाल्यास शहर भागांतील उद्यागधंद्यांकडे कच्च्या मालाची वाहतूक करण्यात होणारे परिश्रम वाचतील. शिवाय ग्रामीण भागांतील या उद्योगधंद्यांमुळे शेतकरीवर्गास रोजगारीचे एक साधन उपलब्ध होईल आणि त्यामुळे त्यांच्या उत्पन्नांत वाढ होऊन त्यांच्या राहणीचा दर्जाही सुधारेल.

ग्रामीण भागांत आधुनिक स्वरूपाचे उद्योगधंदे सुरू करण्याच्या दृष्टीने शेतीच्या क्षेत्रांत सहकारी तत्त्वावर आधारलेले प्रोसेसिंगचे - म्हणजे शेतमालावर प्रक्रिया करण्याचे उद्योगधंदे काढणे अतिशय फायद्याचे ठरेल. आपल्या राज्यांत स्थापन झालेल्या सहकारी साखर कारखान्यांमुळे आपल्याला जो बहुमोल अनुभव मिळाला आहे तो या बाबतील मार्गदर्शक ठरेल यांत शंका नाही. या अनुभवाच्या आधारे शेतमालावर

प्राथमिकच नव्हे तर त्यानंतरच्याही अवस्थेत प्रक्रिया करण्याचे उद्योगधंदे ग्रामीण भागांत सहकारी पद्धतीने सुरू करता येतील. तथापि जेथे ग्रामीण भागांतील उत्पादकांच्या सहकारी संस्थांना तांत्रिक अडचणींमुळे म्हणा अगर अवाढव्य भांडवली खर्चामुळे म्हणा, अशा प्रकारचे उद्योगधंदे सुरू करणे शक्य नसेल तेथे 'संयुक्त औद्योगिक क्षेत्र' निर्माण करण्याचा आमचा विचार आहे. सरकार • आणि खाजगी कारखानदार यांनी आपल्या संयुक्त प्रयत्नांनी ग्रामीण भागांत मोठ्या स्वरूपाचे उद्योगधंदे सुरू करावयाचे अशी ही कल्पना आहे. राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत, सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांसाठी करण्यांत आलेल्या तरतुदीव्यतिरिक्त, संयुक्त क्षेत्रांतील उद्योगधंद्यांच्या बाबतीतही पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचा खासगी कारखानदार योग्य तो फायदा घेतील असा मला विश्वास वाटतो.

ग्रामीण भागांत उद्योगधंद्यांची वाढ खंड पडू न देता चालू ठेवावयाची म्हणजे ग्रामीण भागांतील लोकांनीच त्या बाबतीत पुढाकार घ्यावयास पाहिजे. त्यासाठी व या लोकांच्या उपक्रमशीलतेस पुरेसा वाव मिळावा म्हणून खास प्रयत्न करावयास पाहिजेत आणि जरूर ती यंत्रणाही उभी करावयास पाहिजे.

अगोदरच्या पंचवार्षिक योजनांत जे भाग विकासाच्या बाबतीत मागे पडले आहेत त्यांना इतर भागांबरोबर आणणे जरूरीचे आहे. राज्याच्या सर्व विभागांत समतोल विकास घडवून आणण्यासाठी सरकार प्रादेशिक विकास मंडळे स्थापन करणार असून त्यासाठी आवश्यक असा कायदाही करण्यात येईल. निरनिराळ्या कारणांमुळे राज्याचे हे भाग जे अविकसित राहिले आहेत त्यांना, विकासाच्या मार्गावर पुढे गेलेल्या इतर भागांबरोबर आणण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत काही खास तरतुदी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. विदर्भात रस्ते कमी आहेत, तर मराठवाड्यात व कोकणात रस्ते व वीज यांची कमतरता आहे. त्यामुळे या भागांत काही विशिष्ट प्रश्न निर्माण झाले असून त्यांची उकल करण्याच्या दृष्टीने तिसऱ्या योजनेच्या काळात या भागांतील दळणवळणाच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. भारत सरकारच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत दिवा-पनवेल-उरण रेल्वेची जी तरतूद करण्यात आली आहे त्यामुळेही कोकण विभागात विकासाचे नवे क्षेत्र निर्माण होईल. तिसऱ्या योजनेत विद्युत-वाहनाचा जो कार्यक्रम आखण्यात आला आहे. त्यामुळे सोलापूर, अहमदनगर, नाशिक, धुळे व जळगाव हे जिल्हे, विदर्भातील पश्चिमेकडले जिल्हे आणि कोकण व मराठवाडा या भागास वीज मिळू लागेल आणि या भागांची विजेच्या बाबतीत आजपर्यंत जी उपासमार झाली ती नाहीशी होईल. या भागाखेरीज आणखी ५०० मोठ्या व छोट्या गावांना या कार्यक्रमानुसार वीजपुरवठा करण्यांत येणार आहे. तेव्हा विकासाच्या बाबतीत हे भाग जे मागे पडले आहेत त्यांची तिसऱ्या योजनेमुळे कांही प्रमाणांत तरी प्रगती होईल अशी अपेक्षा आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे प्रमुख उद्दिष्ट स्वयंचलित विकसनाच्या दिशेने भरीव प्रगती करणे हे आहे. याचा अर्थ असा की, उत्पन्नाचे प्रमाण सारखे वाढत राहण्यासाठी बचतीचे व पैसा गुंतविण्याचे प्रमाण पुष्कळच वाढले पाहिजे. ही उद्दिष्टे साध्य करण्याकरिता, तुमच्या या कौन्सिलने उत्पादनाचा कार्यक्रम अशा रीतीने आखावा की, ज्यायोगे आपल्या गरजेपेक्षा अधिक मालाचे उत्पादन होऊन एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलच्या मदतीने परदेशी बाजारपेठा आपण काबीज करू शकू. तसे झाल्यास आपल्या परदेशी चलनात वाढ होईल आणि त्यांतून, ज्या उद्योगधंद्यांसाठी परदेशांतून आपल्याला यंत्रसामग्री मागवावी लागते त्यांना आपल्याला मदत करता येईल. उत्पादनाचा खर्च शक्यतोवर वाढू न देता आपल्या पक्क्या मालाचा दर्जा आपण सुधारला पाहिजे. तसेच आपल्या उत्पादनकार्यात कोणत्याही प्रकारे खंड पडणार नाही याचीही खबरदारी घेतली पाहिजे. यापूर्वी उद्योगधंद्यांत जे भांडवल आपण गुंतविले आहे आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात आपण जे गुंतविणार आहोत, ते सर्व योग्य

कारणी लावून जेवढे म्हणून उत्पादन आपल्याला वाढविता येणे शक्य आहे तेवढे ते वाढविण्याचा आपण नेटाने प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यांतील नफा पुन्हा उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीच वापरला गेला पाहिजे. या गोष्टी जर आपण करू शकलो नाही, तर ज्या स्वयंचलित विकसनाचा मी आताच निर्देश केला ते लांबणीवर पडण्याची भीती आहे. तुमच्या संस्थेच्या सभासदांना या दिशेने प्रगती करण्याची जी तीव्र उत्कंठा आहे त्यामुळे आपला उत्पादनाचा कार्यक्रम पार पाडण्याच्या बाबतीत ते यत्किंचितही कसूर करणार नाहीत याबद्दल मला पूर्ण खात्री आहे.

योजनाबद्ध विकासाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरेसा रोजगार निर्माण करणे ही होय. लोकसंख्येची वाढ झपाट्याने होत असल्यामुळे कामगारांच्या संख्येत दरसाल सारखी भर पडत असते. त्यामुळे रोजगाराच्या या प्रश्नाचे स्वरूप अधिकाधिक गंभीर होत आहे. नियोजन मंडळाने या बाबतीत जी पाहणी केली आहे त्यावरून असे दिसून येते की, अगोदरच्या पंचवार्षिक योजनांच्या काळात रोजगाराच्या या प्रश्नाबाबत महाराष्ट्र राज्याची फार कुचंबणा झाली. तेव्हा, प्रत्येक माणसास योग व पूर्ण वेळ रोजगार मिळेल अशी परिस्थिती निर्माण होण्यास अद्याप बराच कालावधी जावा लागेल, तथापि, मध्यंतरीच्या संक्रमणकाळात आधुनिक उद्योगधंद्यांची वाढ करण्याचा कार्यक्रम नेटाने व कसोशीने अमलात आणला पाहिजे व त्याबरोबर शेतीचाही विकास झपाट्याने केला पाहिजे. त्याचप्रमाणे उत्पादन किंवा उत्पादनाचा खर्च यांवर परिणाम होऊ न देता जास्तीत जास्त मजुरांना ज्यामुळे काम मिळेल अशा प्रकारच्या उत्पादनपद्धतीचा आपण अवलंब केला पाहिजे. अर्थात् उत्पादनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत जी तांत्रिक प्रगती होत असते तिचा आपण फायदा घेऊच नये, असे मला सुचवावयाचे नाही. तथापि, सध्याच्या परिस्थितीत रोजगार वाढविण्याचे आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा दृष्टीने या बाबतीत तोल सांभाळणे किती आवश्यक आहे याची तुम्हांला कल्पना आहेच. विजेवर चालणारे छोटे उद्योगधंदे सुरू करण्याकरिता ग्रामीण विद्युतकरणाच्या कार्यक्रमाचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे याचा उल्लेख मी अगोदर केलाच आहे. उत्पादनाच्या नव्या नव्या पद्धतीचा व तंत्राचा अवलंब करून आणि अगदी अद्ययावत् ज्ञान व कसब संपादन करून, उपलब्ध स्थानिक साधनसामग्रीचा उद्योगधंद्यांसाठी उपयोग करून घेण्याचे नवे मार्ग जर आपण शोधून काढले, तर उद्योगधंद्यांच्या क्षेत्राचा आपण विस्तार करून शकू आणि बेकारीचे प्रमाणही पुष्कळच कमी करू शकू, याबद्दल मला शंका नाही.

मोठ्या प्रमाणावर आर्थिक नियोजन करीत असतांना, औद्योगिक उत्पादनांतील सर्वांत महत्त्वाचा जो मानवी घटक, त्याकडे आपल्याला केव्हाही दुर्लक्ष करता येणार नाही. मानवी घटक म्हणजे अर्थातच कामगार आपल्या या प्रयत्नात जर आपल्याला यश मिळवावयाचे असेल तर कामगारांना योग्य तो न्याय आपण दिलाच पाहिजे. उद्योगधंद्यांच्या कारभारात कामगारांना भागीदार करून घ्यावे या कल्पनेने आता मूळ धरले असून उत्पादनक्षता वाढविण्याची नवी प्रेरणा तिने कामगारांमध्ये निर्माण केली आहे. आपले ध्येय ती काय हेच आहे. म्हणून औद्योगिक संबंध आपण निकोप ठेवले पाहिजेत, आणि उत्पादनातील नुकसान टाळण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला पाहिजे. या गोष्टींची आज फार आवश्यकता आहे.

आर्थिक विकासाच्या बाबतीत सध्या जे नवीन वातावरण निर्माण होत आहे, ते लक्षांत घेऊन तुमचे कौन्सिल पंचवार्षिक योजनेची मुख्य उद्दिष्टे सतत आपल्या नजरेपुढे ठेवील, आणि राष्ट्रीय पुनर्रचनेचे या योजनेत अंगिकारलेले ध्येय साध्य करण्याच्या कामी सरकारशी हार्दिक सहकार्य करील अशी आशा मी व्यक्त करतो, आणि या प्रसंगी मला आमंत्रण दिल्याबद्दल मी तुमचे पुन्हा एकवार आभार मानतो.

(सह्याद्रीचे वारे या पुस्तकातून साभार)

# YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD, 2014

FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES

OR, SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA

**CONFERRED UPON HON. SHRI RATAN TATA**

## CITATION

In the corporate world of India there is one name which evokes universal recognition and respect as well as expectation of ethical management, excellence and integrity. That name is the Tata Group of Industries. The group is a conglomerate which provides products and services ranging from iodized salt to watches and jewellery, transport vehicles comprising the innovative Nano and the coveted Jaguar, modern computer and consultancy services and the old world charm of Taj Hotels. To manage such a vastly diversified group of industries and to maintain, for over a century, unblemished reputation for quality of products and services is a gigantic achievement.

The Tata group has been able to manage succession in the group with a great degree of finesse and understanding. There are some dramatic accounts of the succession from J.R.D. Tata to Ratan Tata on 25th March, 1991. Perhaps J.R.D. Tata was faced with a wealth of talent within the group and it must not have been easy to take a decision on who amongst the 'probables' can lead the group into the next century. However, after nearly twenty-five years since the fateful day when J.R.D. Tata handed over the reins of the Tata group to Ratan Tata, there can be no doubt that J.R.D. Tata made the momentous decision with remarkable accuracy and perspicacity.

JRD bequeathed to Ratan Tata, eighty-four companies constituting a corporate empire with sales of more than Rs.240 Billion. The widely diversified group was employing about 2,70,000 persons. Obviously, it was a crown not easy to wear, particularly after JRD who was the only industrialist to have been awarded the Bharat Ratna.

Ratan Tata is a Mumbaikar. He was born in Mumbai to Soonoo and Naval Tata, on 28th December, 1937. He was born with a silver spoon in his mouth. However, his father, Naval whose parents died early was brought up in an orphanage. He was 13 when he was adopted by the childless and widowed Lady Navajbai Tata. Then Naval came to live with her in Tata House near the Bombay Gymkhana. Ratan Tata grew up in that house. Naval and Soonoo separated when Ratan was about 7 years old. Ratan was brought up by Lady Navajbai Tata, who had a great influence on his life. He was also close to his mother for whom, in his capacity as a professional architect, he designed a home on Peddar Road. After completing the architectural training in Cornell University, he was inclined to continue staying in the U.S.

However, Lady Navajbai thought differently and, there was also a formal invitation from JRD to join the Tatas.

For the first six years Ratan Tata worked in the Telco and Tisco complexes at Jamshedpur. He spent two years on the shop floor. He was then shifted to Mumbai, where he was given the charge of two ailing units, Central India Textiles and Nelco. He turned around the textile mill, but, as a group, Tatas decided to move out of textiles. He improved the performance of Nelco and had his first lessons in dealing with difficult industrial relations. It was an ordeal by fire. He came out successfully and the experience helped him later on.

His first major break came in October, 1981, when he was appointed Chairman of Tata Industries and thereby entered the league of possible successors to JRD. Around the same time, his mother was found to have cancer and whilst sitting by her side for four months in the hospital in New York, Ratan Tata wrote out his 1983 Tata Strategic Plan. Little did he know that it would fall to his lot to implement it. According to the Strategic Plan, Ratan wanted the Tata group to move into the industries with cutting edge technologies such as, telecommunications, oil exploration, computers, advanced materials, bio-technology and energy storage systems. Fortunately, these areas were opened

up to the private sector in the first round of liberalisation under Prime Minister Rajiv Gandhi. Even before that, Ratan had somehow managed to establish new enterprises under the Tata Industries namely; Tata Honeywell, Tata Telecom, Hitech Drilling, Tata Keltron and Tata Finance.

The next step up the ladder came in December, 1988 when he became Chairman of Telco. Here his skills in dealing with unionized labour were tested again. All efforts to settle the matter amicably failed, and the then Chief Minister of Maharashtra - none other than Shri Sharad Pawar - had to intervene to restore peace and order. The successful end to the confrontation with the Union at Telco was also due to Ratan's efforts at winning over the loyal workers and creating a public opinion in favour of settlement. This certainly helped in Ratan's rise to the top of the Tata group.

Having firmed up his hold on the Tata group, Ratan moved to increase the shareholdings of Tata Sons in the group companies and to implement a firm policy of retirement at 75 years. The latter ended many fiefdoms which had been thriving under the earlier system. It is noteworthy that when he reached the mark of 75 years, he retired as the Chairman of Tata Group, bringing in Cyrus Mistry as the successor. During Ratan's tenure, the revenues of Tata Group increased manifold, totalling Rs.475 Billion. His bold acquisitions of Tetley, Corus and Jaguar Land Rover have given a truly global profile to the Tata Group.

The changes brought about by Ratan Tata in the system of functioning in the Tata Group

of Industries were not for bolstering his own power or image but to make the transition to a modern globalized business. He had to change the management culture so as to make the Group more competitive, agile and innovative. Ratan Tata as the helmsman succeeded remarkably in changing the direction and the speed of the ship.

While responding to JRD's invitation to join the Tatas, he had said that "I shall attempt to express my thanks by serving the firm as best as I can, and do all I can to make sure that you will not regret your decision". In 21 years of his tenure, he has been true to these words.

He has bequeathed a vision for the Tata Group which was spelt out in 2004 in the following words :

"One hundred years from now, I expect the Tatas to be much bigger, of course, than it is now. More importantly, I hope the Group comes to be regarded as being the best in India, best in the manner in which we operate, best in the products we deliver, and best in our value system and ethics. Having said that, I hope that a hundred years from now we will spread our wings far beyond India, that we become a global Group, operating in many countries, an Indian business conglomerate that is at home in the world, carrying the same sense of trust that we do today".

The Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai feels privileged in conferring the Yashwantrao Chavan National Award 2014 on Shri Ratan Tata for his outstanding contribution to economic development in India.

Mumbai
12th March, 2015

| | |
|---|---|
| **Dr. Anil Kakodkar** | **Sharad Pawar** |
| Chairman | President |
| Panel of Jury, Mumbai | Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai |

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार, २०१४

## राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्ये व भारताचा सामाजिक व आर्थिक विकास यासाठी प्रदान केल्या जाणाऱ्या पुरस्काराचे मानकरी श्री. रतन टाटा

## मानपत्र

भारताच्या उद्योगजगतामध्ये एक नाव असे आहे की, जे व्यवस्थापनातील नैतिकता, उत्कृष्टतेचा ध्यास आणि प्रामाणिकपणा यासाठी जागतिक स्तरावरही आदराने घेतले जाते. ते नाव आहे टाटा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज. आयोडाइज्ड मीठ, घड्याळ आणि दागिने, वाहने ज्यामध्ये कल्पक अशा नॅनो आणि जॅग्वारसारख्या गाड्या आहे, अत्याधुनिक संगणक आणि कन्सल्टन्सी सेवा अशा सुविधा-वस्तू पुरवितानाच ताज ग्रुप ऑफ हॉटेल्सद्वारे परंपरांचे जतनही केले आहे. इतक्या मोठ्या स्तरावर, शतकापेक्षा अधिक काळ विविध क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या या समूहाचे व्यवस्थापन करताना सर्वोत्तम दर्जाच्या वस्तू आणि सुविधा पुरविणारा समूह अशी ओळख निर्माण करणे हे निश्चितच नेत्रदीपक यश आहे.

टाटा हा एक असा सर्वोत्कृष्ट समूह आहे, ज्यामध्ये समूहाचा पुढील उत्तराधिकारी कोण हे ठरवताना अत्यंत सुंदर पद्धतीने आणि सामंजस्याने निर्णय घेण्यात आले. २५ मार्च १९९१ रोजी जेआरडी टाटा यांनी त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी रतन टाटा यांची निवड केली. टाटा समूहामध्ये तेव्हा प्रतिभावंत, गुणवंत मंडळींचा इतका राबता होता की, आपला वारसदार कोण हे ठरवणे जेआरडींनाही नक्कीच कठीण गेले असेल. हा समूह पुढील शतकात नेण्यासाठी अनेक संभाव्य उमेदवार होते. त्यांच्यातून एकाची निवड करणे हे नक्कीच सोपे नव्हते. जेआरडींनी रतन टाटा यांच्याकडे समूहाची सूत्रे दिल्याला आता २५ वर्षे झाली. जेआरडींनी घेतलेला हा निर्णय उल्लेखनीय, अचूक आणि योग्य दृष्टीकोनातूनच होता, याबद्दल दुमत असण्याचा संभव नाही.

जेआरडी यांनी रतन टाटांकडे जे साम्राज्य सोपविले, ते होते ८४ कंपन्यांचे. ज्यांची एकूण उलाढाल होती २ अब्ज ४० कोटींची. या समूहाचा पसारा एकूणच खूप मोठा असल्याने एकूण २ लाख ७० हजार कर्मचारी या समूहासोबत सेवेत होते. त्यामुळेच कितीही लखलखता वाटला, तरी हा मुकूट काटेरीच होता. भारतरत्न या सर्वोच्च बहुमानाने सन्मानित झालेले एकमेव उद्योजक जेआरडींनंतर टाटा समूहाची धुरा सांभाळणं नक्कीच फार मोठं आव्हान होतं.

रतन टाटा हे मुंबईकर. त्यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी झाला. सुनू आणि नवल टाटा त्यांचे आई-वडील. चांदीचा चमचा तोंडी घेऊन जन्मलेल्या रतन टाटा यांचे वडील नवल टाटा यांच्या आई-वडिलांचे मात्र लवकरच निधन झाले होते. त्यामुळे नवल टाटा अनाथाश्रमात लहानाचे मोठे झाले. १३व्या वर्षी नवाजबाई टाटा यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यानंतर नवल टाटा त्यांच्यासोबत बॉम्बे जिमखान्याजवळ टाटा हाउसमध्ये राहण्यास गेले. रतन टाटाही त्याच घरात वाढले. रतन सात वर्षांचे असताना त्यांचे आई-वडील म्हणजेच सुनू आणि नवल वेगळे झाले. रतन टाटांना मग नवाजबाईंनी लहानाचे मोठे केले. त्यामुळे नवाजबाईंचा त्यांच्या जीवनावर मोठा प्रभाव राहिला. आईशीही त्यांची खूपच जवळीक राहिली. त्यामुळेच त्यांनी आईसाठी एक व्यावसायिक वास्तुविशारद या नात्याने पेडर रोडवर एक सुंदर घर बांधले. कार्नेल विद्यापीठातून वास्तुविशारद म्हणून शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अमेरिकेत राहण्याकडे त्यांचा कल होता. मात्र नवाजबाईंना ते मान्य नव्हते आणि टाटा समूहात प्रवेश करण्याचे औपचारिक निमंत्रणही त्यांना जेआरडींकडून आलेले होते...

सुरुवातीच्या सहा वर्षात रतन टाटांनी जमशेदपूरच्या टेल्को आणि टिस्को संकुलांमध्ये काम केले. त्यातील दोन वर्षे तर ते प्रत्यक्ष कारखान्यातही होते. त्यानंतर त्यांना मुंबईला पाठवण्यात आले. सेन्ट्रल इंडिया टेक्सटाइल आणि नेल्को या दोन डबघाईला आलेल्या, आजारी कंपन्यांची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यांनी गिरणीला आर्थिक संकटातून वाचवलेही. पण टाटा समूहानें एक धोरणात्मक निर्णय घेत, कापड उद्योगातून बाहेर पडण्याचे ठरविले. रतन टाटांनी नेल्कोच्या कामगिरीतही सुधारणा करून दाखवली. पण त्यांना औद्योगिक संबंध किती आणि कसे कठीण असतात, याविषयीचा पहिला धडाही मिळाला. ही एकप्रकारे त्यांची अग्निपरीक्षाच होते. त्यात ते यशस्वी झालेही आणि या अनुभवाचा उपयोग त्यांना पुढे आयुष्यभर झाला.

रतन टाटा यांना ऑक्टोबर १९८१मध्ये टाटा इंडस्ट्रीजचे अध्यक्षपद मिळाले. त्यामुळे जेआरडींच्या संभाव्य वारसांच्या यादीत त्यांचेही नाव घेतले जाऊ लागले. पण त्याच कालावधीमध्ये त्यांच्या आईला कॅन्सर झाल्याचे निदान झाले. तेव्हा चार महिने न्यू यॉर्कमध्ये एका रुग्णालयात रतन टाटा तिच्याजवळ बसून होते. या कालावधीत त्यांनी १९८३चा टाटा धोरणात्मक आराखडा तयार केला. पण त्यांना हे अजिबातच ठाऊक नव्हते की, त्याची अमलबजावणी करण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच येणार आहे. त्या आराखड्यामध्ये रतन टाटा यांनी सुचविले होते की, तंत्रज्ञानाची कास धरून टाटा समूहाने दूरसंचार, तेल संशोधन, संगणक, अत्याधुनिक साहित्य, बायो-टेक्नॉलोजी आणि ऊर्जासंचय प्रणाली अशा व्यवसायांकडेही भविष्यात वळायला हवे. सुदैवाने राजीव गांधी पंतप्रधान असताना उदारीकरणाच्या पहिल्या टप्प्यात यातील अनेक उद्योग खासगी समूहांसाठी खुले झाले. त्याआधीच टाटा इंडस्ट्रीज या नव्या नावाखाली रतन टाटा यांनी टाटा हनीवेल, टाटा टेलिकॉम, हायटेक ड्रिलिंग, टाटा केल्ट्रॉन आणि टाटा फायनान्स उसे उद्योग सुरू केलेही होते.

डिसेंबर १९८८ मध्ये टेल्कोचे अध्यक्षपद मिळणे ही पुढची पायरी ठरली. इथे संघटित कामगारांना हाताळण्याच्या त्यांच्या कौशल्याची पुन्हा चाचणी झाली. मात्र त्यांचे सगळेच प्रयत्न अयशस्वी ठरले आणि दस्तरखुद्द शरद पवार, महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री यांना मध्यस्थी करावी लागली. त्यांच्या मध्यस्थीनंतरच शांतता आणि सुव्यवस्था पुन्हा प्रस्थापित झाली. अर्थात एकनिष्ठ कामगारांची मते आपल्याकडे वळवून संघर्षाला पूर्णविराम मिळावा असे जनमत तयार होण्यासाठी रतन टाटा यांनी केलेले प्रयत्नही निश्चितच निर्णायक होते. रतन टाटा यांना टाटा समूहाच्या शिखराकडे नेण्यात हा पेचप्रसंग एक प्रकारे उपयुक्तच ठरला.

टाटा ग्रुपवरील पकड घट्ट करताना, रतन टाटा यांनी समूहातील कंपन्यांच्या गुंतवणुकीतील टाटा सन्सचा वाटा वाढवला आणि कंपनीच्या धोरणात महत्त्वपूर्ण बदल करताना अध्यक्षांच्या निवृत्तीचे वय ७५ हे निश्चित केले. कंपनीतील जुन्या चाली-रीतींपेक्षा हा एक वेगळा पायंडा होता. यानुसार जेव्हा स्वत: रतन टाटा यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली, तेव्हा ते टाटा ग्रुपच्या अध्यक्षपदावरून निवृत्त झाले. त्यांच्या जागी सायरस मिस्त्री यांच्याकडे कंपनीची सूत्रे देण्यात आली. रतन टाटा यांच्या कार्यकाळात टाटा ग्रुपच्या महसुलात सुमारे ५ अब्जांनी वाढ झाली. लँडरोव्हर, टेटली, कोरस आणि जॅग्वार यासारखे परदेशी ब्रँड्स आपल्या ताब्यात घेत टाटा समूहाने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला.

रतन टाटांनी जे काही बदल टाटा समूहात केले त्यामागे छुपे हेतू नव्हते. आपली ताकद वाढावी, प्रतिमा आणखी मोठी व्हावी या वा अशा कुठल्याही हेतूने त्यांनी हे बदल केले नव्हते. टाटा समूहाचा प्रवास एक आधुनिक आणि जागतिक पातळीवरील समूह या दिशेने व्हावा, यासाठी त्यांनी हे सर्व बदल केले. त्यांना टाटा व्यवस्थापनातही काही बदल करावे लागले. टाटा समूह स्पर्धेला तोंड देण्यासाठी अधिक सज्ज व्हावा, क्रियाशील आणि अभिनव-कल्पक व्हावा यासाठी ते बदल त्यांनी केले. टाटा समूहाच्या सर्वोच्च पदावर असताना त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे या उद्योगसमूहाच्या प्रवासाची दिशा

लक्षणीयरीत्या बदलली आणि त्याला गतीही मिळाली.

जेआरडी यांचे आमंत्रण स्वीकारून टाटा समूहात येताना रतन टाटा म्हणाले होते की, मी या आमंत्रणाबद्दल आपले आभार शब्दांत न मांडता जितके चांगले काम करता येईल, तितके करून मी मानण्याचा प्रयत्न करेन. मला हे आमंत्रण दिल्याचा तुम्हाला कधीही पश्चाताप होऊ नये, अशा प्रकारे काम करण्याचा मी नेहमीच प्रयत्न करेन. आपल्या कारकर्दीत त्यांनी हे शब्द सार्थ करून दाखवले.

टाटा समूहाबद्दलचा दृष्टीकोन त्यांनी २००४ मध्ये विषद केला होता. ते म्हणाले होते की, आजपासून १०० वर्षांनंतर टाटा समूह आज आहे त्यापेक्षा कितीतरी मोठा आणि शक्तीशाली असेल, अशी मी आशा करतो. पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे आपला समूह भारतातील अग्रगण्य आणि सर्वोत्तम समूह म्हणून ओळखला जायला हवा. आपण काम करतो ती पद्धत सर्वोत्तम असावी, आपण तयार केलेली उत्पादने सर्वोत्तम असावीत आणि नीतिमत्ता तसेच ज्या मूल्यांवर आपली निष्ठा आहे, त्या कसोटीवरही आपण सर्वोत्तम असावे. मी आशा करतो की पुढील शंभर वर्षांत टाटा समूहाने भारताबाहेरही भरारी घेतलेली असावी. ज्यामुळे अनेक देशांत असलेला उद्योगसमूह म्हणून आपण नावलौकिक मिळवू. देशात आपण जी विश्वासार्हता मिळवली आहे, ती जागतिक पातळीवरही मिळवू.

भारताच्या आर्थिक विकासात दिलेल्या भरीव योगदानाबद्दल श्री. रतन टाटा यांना यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१४ने सन्मानित करणे हा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यासाठीही बहुमान आहे.

मुंबई, १२ मार्च २०१५

**डॉ. अनिल काकोडकर,**
अध्यक्ष,
परीक्षक मंडळ, मुंबई

**श्री. शरद पवार**
अध्यक्ष,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# रतन टाटा एक उत्तुंग व्यक्तिमत्व - उदय तारदळकर

भारतात उदारीकरणाचे आणि जागतिकीकरणाचे वारे वाहायला सुरुवात झाली आणि त्याच सुमारास रतन टाटा यांनी टाटा उद्योग समूहाची सूत्रे हाती घेतली. टाटा समूहाची सुमारे बावीस वर्षे धुरा बाळगून आणि वयाची पंचाहत्तरी ओलांडल्यावर, अजूनही तरुणांना लाजवेल असा उत्साह असणाऱ्या रतन टाटा ह्या व्यक्तीचे वर्णन उत्तुंग असेच करावे लागेल. जगात कोठेही प्रवास करताना आपण भारतीय आहोत असे सांगितल्यावर कोणत्या ना कोणत्या टाटा कंपनीबरोबर भारताचे नाव घेतले जाते तेव्हा एक भारतीय म्हणून अभिमानाने आपली मान उंचावते. टेटली, युरोपमधली दुसऱ्या क्रमांकाची कंपनी कोरस, शिवाय जॅग्वार, लँड रोव्हर अशा एका मागोमाग एक कंपन्या टाटा समूहाने विकत घेऊन खऱ्या अर्थाने आपल्या पावलांचा ठसा सर्व जगात उमटवलेला आहे. ह्या जोडीला साथ आहे ती सर्वव्यापी टाटा कन्सल्टन्सीची. आणि ह्याचे श्रेय सर्वस्वी आपल्या नेतृत्वाखाली टाटा समूहाची धुरा दोन दशकाहून अधिक काळ संभाळणाऱ्या श्री. रतन टाटा ह्यांच्याकडे जाते. आजच्या घडीला टाटा समूहाच्या एकूण उत्पन्नापैकी सुमारे ६५ टक्के उत्पन्न हे परदेशातील व्यवसायातून प्राप्त होते ह्यात काहीच नवल नाही. रतन टाटा ह्यांच्या कारकीर्दीत भागधारकांची संख्या २६ लाखांवरून सुमारे ३८ लाखांवर गेली. त्यांनी टाटा समूहाचा आंतरराष्ट्रीय व्यापार ४.७ बिलियन डॉलरवरून ५८.५ बिलियन डॉलरवर नेऊन ठेवला आणि नफा १४ हजार कोटींवरून तब्बल ४ लाख ७५ हजार कोटी.

रतन ह्याचा अर्थ रत्न आणि ते नाव त्यांनी सार्थ केले आहे, याची प्रचीती आली ते टाटा स्टीलच्या वार्षिक सभेच्या वेळी. टाटा समूहासाठी त्यांचा वारसदार शोधण्याच्या मोहिमेची जेव्हा घोषणा झाली तेव्हाची एक प्रतिक्रिया अत्यंत बोलकी होती. तेव्हा टाटा स्टीलच्या एका भागधारकाने सांगितले की आम्हाला हे रत्न गमवायचे नाही आणि श्री. रतन टाटा ह्यांनी टाटा समूहाचे अध्यक्षपद कायम भूषवावे अशी माझी इच्छा आहे.

बॉम्बे हाऊस (टाटा मुख्यालय) ह्या त्यांच्या कर्मभूमीतून असे काही निर्णय झाले की, ते सरसकट सर्वच उद्योग समूहांना आपलेसे करावे लागले.

टाटा कन्सल्टन्सी ह्या कंपनीचा जेव्हा प्रथम पब्लिक इश्यू आला तेव्हा त्यातील काही भाग हा टाटा सन्सच्या हिश्शातील होता. अशावेळी टाटा समूहाच्या कोणत्याही कंपनीला ह्या इश्यूमध्ये भाग घेण्यास मनाई करणारा हुकूम समूहाचे अध्यक्ष ह्या नात्याने रतन टाटांच्या बॉम्बे हाउसमधून आला, तेव्हा शेअर बाजारातील काही मंडळींना आश्चर्य वाटले. आपल्या समूहातील एक कंपनी बाजारातून भांडवल उभारत असताना त्यात टाटा सन्स ही कंपनी आपले भांडवल विकत असल्याने सर्व साधारण गुंतवणूकदाराला प्राधान्य मिळावे ह्या उद्देशाने असा निर्णय घेण्यात आला. शिवाय समूहातील ज्या कंपन्याना टाटा सन्सचे शेअर्स घ्यायचे असतील त्यांनी ते खुल्या बाजारातून घ्यावेत असा दंडक त्यांनी काढला. शेअर बाजारातील कॉर्पोरेट गव्हर्नन्सचे हे सर्वोत्तम उदाहरण आहे.

कंपनीच्या अप्रकाशित आणि संवेदनशील माहितीबाबत शेअर बाजारात सूचीबद्ध झालेल्या कंपन्यांसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्याला इनसायडर ट्रेडिंगचे नियम म्हणतात. इनसायडर ट्रेडिंग संबंधी त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने घातलेली बंधने हे कॉर्पोरेट गव्हर्नन्सचे आणखी एक उदाहरण. टाटा समूहातील कोणत्याही कंपनीचे शेअर्स समूहातील कंपनीने खरेदी किंवा विक्री करण्यापूर्वी टाटांच्या मुख्य कार्यालयातून (बॉम्बे हाऊस) एका प्रतिकात्मक 'ट्रेडिंग विंडो' संकल्पनेप्रमाणे खरेदी किंवा विक्रीस परवानगी दिली जाते. जर एखाद्या काळात समूहातील कोणत्याही

कंपनीमध्ये जर अशी काही घडामोड असेल की ज्यामुळे कंपनीच्या बाजारभावात चढउतार होऊ शकेल तर त्या कंपनीचे शेअर खरेदीस किंवा विक्रीस परवानगी दिली जात नाही. अशा स्वघोषित बंधनांमुळे टाटा समूहाची विश्वासार्हता उंचावत गेली आहे आणि त्यामुळेच टाटा समूहाची गणना सर्वोत्तम समूह म्हणून का केली जाते ह्याचे उत्तर मिळते. अशा नियमावलीला सेबीसारखे नियंत्रक नंतर कायदा म्हणून मूर्त रूप देते, ह्यातच समूहाच्या नैतिक मूल्यांची बीजे दडलेली आहेत.

टाटा गट आणि त्यांचे कर्मचारी ज्या पद्धतीने टाटा कोड (TCOC) शासित मूल्ये आणि तत्त्वे जपत आपला कार्यभार चालवितात हे पहाणे उद्बोधक आहे. टाटा कोडद्वारे समूहाने वैयक्तिक आणि व्यावसायिक मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातून नैतिक मूल्ये सशक्त करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. टाटा कंपन्या वेगाने आपल्या पावलांचा ठसा विदेशात उमटवत असताना अशी मूल्ये निश्चितच प्रभावी ठरतात.

टाटा हा ब्रँड वापरण्यासाठी समूहातील कंपन्यांना काही मानके साधावी लागतात. टाटा बिझनेस एक्सलन्स मॉडेल (TBEM) हे एक प्रमुख मानक आहे. टाटा बिझनेस एक्सलन्स मॉडेल (TBEM) ही एक सतत सुधारणा करणारी व्यावसायिक दर्जेदार प्रक्रिया आहे. जागतिक स्तरावर प्रसिद्ध माल्कम बालब्रीज मॉडेल (Malcom Balbridge Model) वर आधारित ही संकल्पना आहे. टाटा बिझनेस एक्सलन्स मॉडेल हे टाटा कंपन्यांसाठी ऐच्छिक आहे. टाटा बिझनेस एक्सलन्स मॉडेलची तत्वे सात श्रेणी मध्ये दिलेली आहेत. नेतृत्व, व्यूहात्मक योजना, ग्राहकधार्जिण्या योजना, ज्ञानाचे विश्लेषण आणि व्यवस्थापन, मानवी संसाधन, प्रक्रिया व्यवस्थापन, आणि व्यवसाय क्षेत्रात परिणाम ही ती सात तत्वे आहेत. टाटा बिझनेस एक्सलन्स मॉडेलमध्ये दरवर्षी संस्थात्मक मोजमाप करून गुणवत्ता पुरस्कार देण्यात येतो. स्वर्गीय जमशेटजी टाटा ह्यांच्या नावे हा पुरस्कार १००० पैकी ६५० पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या कंपनीस देण्यात येतो. टाटा समूहाच्या प्रत्येक कंपनीला हवाहवासा वाटणारा हा गुणवत्ता पुरस्कार आहे.

श्री. टाटा ह्यांच्या निवृत्तीनंतरची एका रंजक अनुभवाची आठवण येथे नमूद कराविशी वाटते. श्री. टाटा ह्यांनी निवृत्ती घेतल्यानंतर काही दिवसानंतरची ही हकीकत. काही कार्यक्रमासाठी त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण देण्यासाठी त्यांच्या ई-मेल आयडीवर संपर्क साधला, तेव्हा ई-मेल बाउन्स होऊन परत आला, म्हणून मला आश्चर्य वाटले. त्यांच्या कार्यालयात संपर्क साधल्यावर असे सांगण्यात आले की ते आता टाटा समूहात नसल्याने त्यांचा ई मेलआयडी रद्द करण्यात आला असून त्यांच्या वैयक्तिक ई-मेल आयडीवर संपर्क साधावा. जी व्यक्ती समूहाची अध्यक्ष आहे त्या व्यक्तीने असा आदर्श घालावा ह्यातच त्यांच्या टाटा घराण्याची महती दिसून आली. आजच्या पिढीला ह्यापेक्षा चांगला आदर्श शोधूनही सापडणार नाही.

(प्रस्तुत लेखक अर्थविषयक सल्लागार आहेत. टाटा कॅपिटल या संस्थेचे शीर्षपद त्यांनी भूषवलेले आहे.)

# नवमहाराष्ट्र युवा अभियान
## कार्यवृत्त

दरवर्षी नवमहाराष्ट्र युवा अभियान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने राज्यस्तरीय सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कार दिले जातात. सामाजिक व क्रीडा विभागात एक युवक व एक युवती यांना विशेष कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो. 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार' (युवक व युवती) व 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार' (युवक व युवती) तसेच क्रीडा क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल एक विशेष क्रीडा पुरस्कार दिले जातात व यावर्षीपासून सामाजिक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल एक विशेष सामाजिक युवा पुरस्कार देण्यात आला, असे एकूण सहा पुरस्कार दिले गेले. महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे हे या क्रीडा पुरस्कारांचे उद्दिष्ट आहे. तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व भरीव कार्य करणाऱ्या युवक-युवतींना हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्काराचे हे सोळावे वर्ष असून या पूर्वी पल्लवी रेणके, लतिका माने, वीरधवल खडे, कविता राऊत, कृष्णा पाटील, सागर बडवे, तेजस्विनी मुळे, अमोल बराटे यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. क्रीडा व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी करून इतर युवांसमोर एक आदर्श ठेवणाऱ्या युवा वर्गाच्या कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात येते.

२०१५ सालचा यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार विदित गुजराथी यांना सर्वात लहान वयातील ग्रँड मास्टर व बुद्धिबळ मधील उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप २५,००० रु. रोख, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे. २०१५ सालपासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विशेष सामाजिक युवा पुरस्काराची सुरुवात करण्यात आली; यंदाचा पुरस्कार शेवंता बाजीराव राठोड यांना बालविवाह रोखण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप २५,००० रु. रोख, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे.

या वर्षीचा यशवंतरावच चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्रद्धा घुले (लांब उडी आणि तिहेरी उडी) व अमोल करचे (अंध क्रिकेटपटू) यांना तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल संदीप गुंड (शिक्षक, शहापूर-ठाणे) व सुनंदा मांदळे (मुख्य प्रशिक्षक - यशदा राजीव गांधी महिला सशक्तीकरण) यांना यशवंतराव चव्हण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक व क्रीडा पुरस्कारांचे स्वरूप प्रत्येकी २१ हजार रु. रोख स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे.

**यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे दर वर्षी सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या एका युवकास व एका युवतीस 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक/क्रीडा पुरस्कार' देऊन गौरविण्यात येते. १९९७ पासून ही परंपरा सुरू असून हा पुरस्कार दरवर्षी १२ जानेवारी या युवा दिनी दिला जातो. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व भरीव कार्य करणाऱ्या युवक-युवतींची समाजाला ओळख व्हावी हे या सामाजिक युवा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. तर क्रीडा क्षेत्रात असामान्य कर्तृत्वाने आणि अपार मेहनतीने आपला ठसा उमटवणाऱ्या खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे हा युवा क्रीडा पुरस्काराचा उद्देश आहे.

## 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक पुरस्कार'

राज्यातील विद्यार्थ्यांच्या विचारांचे आणि भावनांचे प्रतिबिंब असंख्य महाविद्यालयीन नियतकालिकांमध्ये पडलेले पाहण्यास मिळते. या नियतकालिकांमध्ये आपले लेख, कविता लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांमधूनच उद्याचे साहित्यिक घडत असतात. युवांना आपले मत मांडायची संधी देतानाच त्यांच्यातील कलागुणांना वाव देणाऱ्या नियतकालिकांचे महत्व लक्षात घेऊन राज्यातील उत्कृष्ट महाविद्यालयीन नियतकालिकांचा सन्मान करणारा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक पुरस्कार' हा महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम आहे.

२०१४ मधील यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक पुरस्कार' विजेती नियतकालिके :

### विजेत्या महाविद्यालयांची नावे

| क्र. | नियतकालिक | कॉलेजचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | बांधिलकी | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा | प्रथम |
| २. | पारिजात | लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, पंचवटी, नाशिक | द्वितीय |
| ३. | अक्षर | के.आर. टी. आर्टस, बी. एच. कॉमर्स ऑफ ए. एम. सायन्स कॉलेज, नाशिक | तृतीय |
| ४. | मानवता | कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी. आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय मानवता. | उत्तेजनार्थ |
| ५. | सुभानमंगल | श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ | उत्तेजनार्थ |
| ६. | प्रेरणा | नूतन महाविद्यालय, सेतू, जि. परभणी | उत्तेजनार्थ |

सदर पुरस्कार वितरण सोहळा दि. १२ जानेवारी २०१५ रोजी मत्स्योदरी महाविद्यालय, जालना येथे मा. सुप्रिया सुळे, नव महाराष्ट्र युवा अभियानचे संयोजक दत्ता बाळसराफ, मा. आ. राजेश टोपे, मा. निलेश राऊत, मा. विजय कान्हेकर, मा. सुहास तेंडुलकर, मा. दिनेश शिंदे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

### 'नवमहाराष्ट्र युवा अभियान' आणि 'पिनॅकल क्लब' यांचे संयुक्त गिर्यारोहण मोहीम

कल्याण येथील शाळेत सप्टेंबर महिन्यात इयत्ता ८, ९, १०वी च्या विद्यार्थ्यांना गिर्यारोहणात वापरण्यात येणाऱ्या साहित्यांची माहिती देण्यात आली. तसेच शाळेच्या इमारतीतून रॅपलिंग, झुमारिंग आणि रिव्हर क्रासिंगचे प्रात्यक्षिके करून दाखविण्यात आले.

'दि. ०७.९.२०१४ रोजी कर्नाळा,
दि. १४.९.२०१४ कोहोज किल्ला,
दि. २८.९.२०१४ बळवंतगड,
दि. ०५.१०.२०१४ भैरवगड,
दि. १९.१०.२०१४ अंकाई किल्ला,
दि. ०९.११.२०१४ घोसाळगठ,
दि. २३.११.२०१४ गंभीरगड,
दि. ०७.१२.२०१४ कामनदुर्ग,
दि. १४.१२.२०१४ कवनाई,
दि. २१.१२.२०१४ कोरलाई किल्ला,
दि. २४.१२.२०१४ ते २८.१२.२०१४ राजगड ते तोरणा
दि. ११.०१.२०१५ राजमाची,
दि. १८.०१.२०१५ इरशाल गड
दि. २५.०१.२०१५ वसई टकमक

असे पदभ्रमणाच मोहीम यशस्वी करण्यात आली. संस्थेतील तीन सभासदांनी गरजूंना रक्तदान केले. पदभ्रमण कार्यक्रमाचा लाभ एकूण ११४ गिर्यारोहकांनी घेतला. वरील सर्व कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये संतोष कल्याणपूर, सचिन आयरे, यतिन कोरे, ललिता टेंगळे यांनी पुढाकार घेतला.

## यशवंत युवा फेलोशिप

घसरलेली शैक्षणिक गुणवत्ता, अपुऱ्या शैक्षणिक सोयीसुविधा, शाळा गळतीचे वाढते प्रमाण, विद्यार्थी आत्महत्या, व्यावसायिक कौशल्यांचा अभाव, वाढती बेरोजगारी, ढासळलेले शारीरिक व मानसिक आरोग्य, अपुऱ्या आरोग्य सुविधा, शेतकरी आत्महत्या, शेतमालाला न मिळणारा भाव. वाढती रासायनिक शेती, नष्ट होत चाललेली जैवविविधता, वाढते तापमान, पाणी व विजेचा अनावश्यक वापर, वाढती व्यसनाधीनता, जातीयता अशा एक ना अनेक समस्या आज आ वासून उभ्या आहेत. सध्या या समस्यांना अनेक सामाजिक संस्था, संघटना आपापल्या परीने उत्तरे शोधत आहेत. या संस्था संघटनांबरोबरच काही नव्या दमाचे युवकदेखील स्पर्धात्मक जगाच्या चाकोरीतून बाहेर पडून आपापल्या परीने धडपड करीत आहेत. खऱ्या अर्थाने सामाजिक बदलांची धुरा सांभाळणाऱ्या या युवांना आर्थिक सक्षम करण्यासाठी पुरेसे ज्ञान, आर्थिक पाठबळ व योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. युवांची ही गरज ओळखून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने यशवंत युवा फेलोशिप २०१० पासून सुरू करण्यात आली आहे.

समाजाला भेडसावणाऱ्या प्रश्नांवर मात करण्यासाठी सामाजिक क्षेत्रात रचनात्मक कार्य सुरू केलेल्या युवांना मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन देणे हा यशवंत युवा फेलोशिपचा उद्देश आहे.

## यशवंत फेलो शिप २०१४-१५
## कार्यरत फेलो

| क्र. | फेलोचे नाव | विवरण |
|---|---|---|
| १. | **श्री. सिद्धार्थ रामचंद्र खरात** | सामाजिक क्षेत्रामध्ये स्वयंसेवक म्हणून गेली अनेक वर्षे कार्यरत. दलित इलेक्शन वॉच व एस.सी.एस.टी सबप्लॅन अमलबजावणीकरिता काम. बांधकाम मजदूर सभा, महाराष्ट्र या संघटनेचे नितीन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा जिल्यातील ११ पैकी ८ तालुक्यात असंघटीत कामगारासोबत काम सुरू आहे. असंघटित कामगारांत त्यांचे हक्क आणि शोषणाबाबत प्रबोधन करणे, तसेच त्यांच्या न्यायिक आणि मूलभूत प्रश्नांवर काम. |
| २. | **श्री. अमोल काटकर** | मौजे किरकसाल या गावी आदर्श गाव योजनेमध्ये डॉ. अविनाश पोळ आणि श्री. पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत. फेलोशिपच्या माध्यमातून वृक्षारोपण, जलसंधारण, मृद संधारण याबावत जनजागृती करणे, किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक शिक्षण क्षेत्रात कार्य व प्रसार, ग्रामीण भागातील नागरिकांचे स्थलांतर थांबविण्यासाठी संस्थात्मक कामे उभी करणे. याशिवाय आदर्श गाव निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस. मौजे किरकसाल या गावचा महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गाव योजनेत समावेश होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान. |
| ३. | **कु. अमृता ढगे** | 'आनंदनिकेतन' या नाशिकमधल्या प्रयोगशील शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत. 'आनंदनिकेतन' या शाळेची प्रयोगशील शिक्षण पद्धती समजून घेऊन सर्जनशील काम करण्यासाठी फेलोशिपच्या माध्यमातून काम करण्याची इच्छा. |
| ४. | **श्री. कैलास मालखेडे** | मुंबई विद्यापीठातून मास्टर ऑफ फाइन आर्ट ही पदवी. सध्या तंबाखू नियंत्रणासाठी विविध प्रकारचे कार्य. फेलोशिपच्या माध्यमातून तंबाखूमुक्त गाव, परिसर, संस्था, कार्यालय इत्यादी मोहिमा राबवण्याचा मानस. तंबाखू नियंत्रण कायद्यात सुधारणा व्हाव्यात म्हणून प्रयत्नशील. ठाणे, जळगाव येथे विद्यार्थी-शिक्षकांसाठी कार्यशाळा. स्पर्धा, प्रदर्शने या माध्यमातून जनजागृती. |

# तंबाखू नियंत्रण अभियान

तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन आणि त्यामुळे निर्माण होणारी व्यसनाधीनता ही समाजापुढील फार मोठी समस्या आहे. तंबाखू वा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनात दिवसेंदिवस वाढ होत असून प्रामुख्याने युवा वर्ग हा मोठ्या संख्येने व्यसनाधीनतेला बळी पडत आहे. व्यसनाधीनतेचे हे अतिशय गंभीर चित्र आहे. तंबाखू जीवघेणी आहे. परंतु अधिकधिक लोक तंबाखूजन्य पदार्थांच्या अधीन होताना दिसतात. तंबाखूमुळे असंख्य लोकांचा जीव जात आहे, जो आपण वाचवू शकतो. तंबाखू आणि धुम्रपानात ४,००० हून अधिक घातक रसायने आहेत. ज्यात २०० विषारी तर ६० कर्कजन्य आहेत. तंबाखूमुळे कॅन्सरसोबत हृदयविकार, मेंदूचा धक्का, फुफ्फुसाचे आजार, अंधत्व, नपुंसकत्व, वंध्यत्व आणि इतर अनेक रोग होतात. यात असंख्य लोक यापूर्वी बळी पडले आहेत आणि दिवसेंदिवस बळींची संख्या वाढत आहे. याचा तपशील पुढीलप्रमाणे

**जागतिक पातळी :** तंबाखूमुळे दरवर्षी जगात जवळ जवळ ५५ लाख व्यक्ती मरण पावतात आणि ही संख्या इतर कारणांमुळे म्हणजे एड्स, टी.बी., मलेरिया, दारूचे सेवन, आत्महत्या, अमली पदार्थ सेवन, आदींमुळे मरण्यापेक्षा अधिक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगात २०३० पर्यंत तंबाखूमुळे मरणाऱ्यांचे प्रमाण एक कोटी होईल, ही चिंताजनक बाब आहे.

**भारत :** तंबाखूमुळे मरणाऱ्यांपैकी जगातील ७० टक्के लोक विकसनशील देशातील आहेत, ज्यात भारताचा अंतर्भाव होतो. भारतात दररोज २,२०० लोकांचा मृत्यू तंबाखूमुळे होतो, तर दरवर्षी ८ लाखांहून अधिक लोक तंबाखूमुळे होणाऱ्या तोंडाच्या कॅन्सरचे सर्वाधिक रुग्ण भारतात आहेत. भारतात दर ३ सेकंदाला एक युवा पहिल्यांदा तंबाखू सेवन करतो. मोठ्या प्रमाणावर तरुण पिढी तंबाखूच्या आहारी जात आहे.

**महाराष्ट्र :** महाराष्ट्रात तंबाखूमुळे ३१.४ टक्के सेवन होते. महाराष्ट्रात तंबाखू सेवनामध्ये पुरुषांचे प्रमाण ४२.५ टक्के आहे तर स्त्रियांचे प्रमाण १९.९ टक्के आहे. शहरात २५.२ टक्के आणि ग्रामीण भागात ३६.९ टक्के प्रमाण आहे. महाराष्ट्रात मुलांमध्ये १३.२ टक्के तर मुलींमध्ये ११.१ टक्के प्रमाण आहे.

वरील आकडेवारीवरून असे लक्षात येते की, जगात आणि खासकरून भारतात तंबाखू सेवनाची समस्या अत्यंत गंभीर आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तंबाखूमुळे होणार व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, आरोग्य आणि पर्यावरण पातळीवरील नुकसान देशाच्या विकासासाठी हानिकारक आहे. तंबाखूमुळे मरणाऱ्यांपैकी बहुतांश व्यक्ती प्रौढ आणि युवा वयोगटातील असल्याने हे राष्ट्राच्या दृष्टीनेही योग्य नाही. पाहणीत असे आढळून आले आहे की कुमारावस्थेत व यौवनावस्थेत तंबाखू सेवनाची सवय लागलेल्या व्यक्तीचेच मृत्यूचे प्रमाण जास्त आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील मुड्झा नावाच्या एका गावात केलेल्या सर्वेक्षणात एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे. ११०० लोकसंख्या असलेल्या या गावात जवळपास ५३ टक्के लोक विविध स्वरूपात तंबाखू अथवा तत्सम पदार्थांचे सेवन करतात. वर्षाला अंदाजे १० लाख रुपये इतका खर्च तंबाखू सेवनावर होतो. जो या गावातील ग्रामपंचायतीच्या एकूण वार्षिक खर्चापेक्षाही जास्त आहे. तंबाखू सेवनामुळे आरोग्याच्या समस्यांवर होणाऱ्या खर्चाचा भाग तर वेगळाच. खरं तर ही परीस्थिती फक्त या एका गावाची नाही तर महाराष्ट्रातील अनेक गावांची आहे. आपली युवा पिढी ही देशाचे भविष्य आहे. ती निरोगी, व्यसनमुक्त आणि सुदृढ हवी असेल तर त्यांना तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांपासून या युवा पिढीला दूर ठेवले पाहिजे. या सगळ्यावर उपाययोजना म्हणून यासाठी या पदार्थांमुळे

होणारे दुष्परिणाम समाजातील सर्व घटकांपर्यंत पोचविण्याची गरज आहे, तसेच विविध घटकांसोबत तंबाखू मुक्तीसाठी काम मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे. तंबाखू नियंत्रण अभियान राज्यभर राबविण्याची गरज आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने सामाजिक विधायक कामांसाठी कायम पुढाकार घेतला आहे. याच कार्यप्रणालीचा भाग म्हणून तंबाखू नियंत्रण अभियान आज महाराष्ट्रात राबविले जात आहे. तंबाखू आणि तंबाखूचे सेवन आपल्याला सर्रास दिसते. त्यासोबत तंबाखूसेवनाच्या घातक परिणामांची जाणीव करून देणाऱ्या जाहिरातीदेखील दिसतात. तंबाखूच्या विक्रीवर नियंत्रण आणणारे कायदे झाले आहेत. मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महाराष्ट्रात गुटखाबंदीची घोषणा केली आणि लगेच ती अमलात देखील आणली. इतक्या आघाड्यांवर तंबाखू विरोधी मोहीम उघडून देखील महाराष्ट्रातील तंबाखू सेवनाचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही. काही अभ्यासकांच्या मते १८ वर्षे वयापर्यंत एखादी व्यक्ती तंबाखूचे सेवन करीत नाही ती व्यक्ती तंबाखूपासून दूर राहते.

१८ वर्षाखालील व्यक्तींना तंबाखूची विक्री करण्यावर कायद्याने बंदी असून देखील अनेक मुले लहान वयातच तंबाखूच्या आहारी गेलेली दिसतात. प्रौढांमध्येदेखील तंबाखू सेवनाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. तंबाखू विरोधी कायद्यामधील दंडाची रक्कम वाढवणे. तसेच या तरतुदींची प्रभावी अमलबजावणी होणे आवश्यक आहे. शाळा- कॉलेजच्या आसपास १०० यार्डाच्या परिसरात एकही तंबाखू विक्रीचे केंद्र असू नये, तसेच तंबाखू विक्री केंद्रावर तंबाखूजन्य पदार्थ प्रदर्शनाप्रमाणे मांडले जाऊ नये या गोष्टी काटेकोरपणे पाळल्या जाव्यात यासाठी प्रतिष्ठान तंबाखू नियंत्रण अभियान उपक्रमाद्वारे सतत पाठपुरावा करत आहे.

कायद्याची अमलबजावणी काटेकोरपणे झाली तरीही तंबाखूविरोधी व्यापक जनजागरण मोहिमेला पर्याय नाही. तंबाखूमुळे व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय असे कोणते दुष्परिणाम होतात, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करण्यामागील कारणे, तंबाखू सेवन दुष्परिणाम संदर्भातील काही सत्यता, तंबाखू निर्मूलनाबाबत होत असलेली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्ये, तंबाखू नियंत्रणासाठी वेळोवेळी बनवलेले कायदे, इत्यादी माहिती तंबाखू नियंत्रण अभियानाद्वारे राज्यातील जनतेपर्यंत, तसेच युवा पिढीपर्यंत पोहचवणे हे प्रतिष्ठानचे उद्दिष्ट आहे.

**या उपक्रमांतर्गत पार पडलेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे**

दि. ०६ सप्टेंबर २०१४

कच्छ युवक संघाच्या संयुक्त विद्यमाने विक्रोळी येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात पोस्टर प्रदर्शनाचे व माहितीपट दाखविण्याचे, विभागातर्फे आयोजन करण्यात आले.

लाभार्थी संख्या : ४५०

दि. १ ऑक्टोबर २०१४

**पोस्टर प्रदर्शन व स्लाईड शो**

शिरगांव बदलापूर (पूर्व) येथे कोल्हापूर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले. व स्लाइड शो दाखविण्यात आला.

लाभार्थी संख्या : २५०

दि. १ डिसेंबर २०१४

**शिक्षक कार्यशाळा**

लाभार्थी संख्या: ४२

स्थळ: जि.प. शाळा, अंबरनाथ (प.) जि. ठाणे.

दि. १० डिसेंबर २०१४

भारत कॉलेज बदलापूर (प.) येथे पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आल. तसेच माहितीपट दाखविण्यात आला.

लाभार्थी संख्या : ४००

दि. १२ डिसेंबर २०१४

**पथनाट्य मोहीम व पोस्टर प्रदर्शन**

'स्थळ: जि. रायगड, ठाणे व मुंबई

संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री. शरदचंद्र पवार यांच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पणानिमित्त राज्यात दि. १२ डिसेंबर २०१४ ते १२ जानेवारी २०१५ पर्यंत जि. रायगड, ठाणे, व मुंबई येथे पथनाटय सादरीकरण व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संयोजन राज्य समन्वयक कैलास मालखेडे, रायगड जिल्हा संघटक, अभिजित देशमुख व सहकारी यांनी केले.

दि. १३ डिसेंबर २०१४

**पोस्टर प्रदर्शन**

स्थळ: साई चॅरिटेबल ट्रस्ट शिवाजी नगर, गोवंडी

लाभार्थी संख्या : ३००

दि. १५ डिसेंबर २०१४ ते १६ डिसेंबर २०१४

**'नॅशनल कॉन्फरन्स मध्ये सहभाग'**

तंबाखू नियंत्रण विभागाच्या वतीने कैलास मालखेडे, उमेश खाडे, निता घ्यार यांनी 'नॅशनल कॉन्फरंस ऑन टोबॅको ऑर हेल्थ'मध्ये सहभाग घेतला. विविध राज्यातील तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, दुष्परिणाम, कायदे व पुढील काळात संस्थांची व शासनाची भूमिका यावर दोन दिवस सविस्तर चर्चा करण्यात आली. या विषयावर आधारित मराठी भाषेत जनप्रबोधन करणारे काही प्रभावी पर्याय योजणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन विभागाच्या वतीने त्यात पुढाकार घ्यावा, असे ठरले.

दि. २८ डिसेंबर २०१४

**पोस्टर प्रदर्शन**

स्थळ: तरूण मित्र मंडळ, टिळक नगर, चेंबुर

लाभार्थी संख्या : ४५०

दि. १२ जानेवारी २०१४

**जागतिक युवा दिनानिमित्त, पोस्टर प्रदर्शन**

स्थळ: सर जे.जे स्कुल ऑफ आर्ट, मुंबई.

लाभार्थी संख्या : ५५०

दि. १४ जानेवारी २०१४

**पथनाट्य सादरीकरण व पोस्टर प्रदर्शन**

तंबाखू नियंत्रणासंदर्भात जनजागृतीसाठी पोस्टर प्रदर्शन व पथनाट्य आयोजित केले होते. कार्यक्रमास श्री. बी. आय. आजरी (प्रादेशिक परिवहन अधिकारी), अशोक दुधे (पोलीस उपायुक्त), संजय ससाणे, नव महाराष्ट्र युवा अभियानचे दत्ता बाळसराफ, विजय कान्हेकर, उमाकांत जगदाळे, कैलास मालखेडे, सूरज चव्हाण, रमेश मोरे इ. उपस्थित होते.

स्थळ : वडाळा ट्रक टर्मिनल

लाभार्थी संख्या : ५५०

दि. २० ते २१ जानेवारी २०१५

**'तंबाखूमुक्त गाव' मोहीम.**

सांसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत समाविष्ट गाव

१) एनकुल ता. खटाव

२) मुर्टी ता. बारामती

३) गुळुंचे ता. पुरंदर

४) दापोली ता. दौड

येथे सदर संकल्पना मांडण्यासाठी सलाम मुंबई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक गावात प्राथमिक सर्व्हे करण्यात आला. प्रत्येक गावातील ग्रामपंचायत, महिला बचतगट, शाळा, आरोग्य केंद्र यांच्या भेटी घेऊन आपले गाव तंबाखू मुक्त करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला. गावात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री बंद व्हावी, यासाठी ग्रामसभा घेऊन,

असा ठराव मांडावा असे ठरले. तसेच वर्षभर गावात विविध उपक्रमाद्वारे गाव तंबाखूमुक्त व्हावे यासाठी शपथ घेण्यात आली.

दि. २३ जानेवारी २०१५

**जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त,**

**'निबंध व हस्ताक्षर स्पर्धा'**

शाळांमध्ये तंबाखूजन्य पदार्थांची माहिती व त्यांचे दुष्परिणाम मुलांना माहिती व्हावी व हा विषय मुलांच्या मनावर बिंबवला जावा यासाठी स्पर्धा राबविण्यात आली.

मालदाभाडी येथे ग्रामस्थांनी देखील स्पर्धेत सहभाग घेतला.

स्थळ: एनकुल ता. खटाव, जि. सांगली

मालदाभाडी, ता. जामनेर, जि. जळगाव

दि. २६ डिसेंबर २०१५

**'शालेय वस्तू व बक्षीस वितरण सोहळा'**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व सोशल डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या हस्ताक्षर व निबंध स्पर्धेची बक्षीस वितरण करण्यात आले. गरजू विद्यार्थांना शालेय उपयोगी वस्तूंची व गावातील अपंगाना व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले. तंबाखू नियंत्रण कार्यक्रमात मुलांनी गीते व नाटिका सादर केल्या. गावातील सरपंच सौ. उषाताई परखड, एस.डी.एफ. चे अध्यक्ष श्री. दामु मालखेडे, शाळांमधील मुख्याध्यापक व तंबाखू नियंत्रण विभागाचे समन्वयक कैलास मालखेडे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लाभार्थी संख्या : ५५०

तंबाखू नियंत्रण अभियान या उपक्रमाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांच्या मार्गदर्शनाखाली कें. आशिष दामले, अभिजीत देशमुख कैलाश मालखेडे आणि सारिका देशमुख नीता ग्यार हे समन्वयक म्हणून काम पाहतात.

दि. १ डिसेंबर २०१४

**शिक्षक कार्यशाळा**

लाभार्थी संख्या : ४२

स्थळ : जि.प. शाळा, अंबरनाथ (प.) जि. ठाणे.

## वाहतूक सुरक्षा अभियान

या वर्षीच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी एक लाख किलोमीटर नवीन महामार्ग निर्माण करण्याची घोषणा केली आहे. नव्या आधुनिक भारताला त्याची आवश्यकता आहेच. दररोज सतत नवनवीन गतिमान वाहने रस्त्यावर येत आहेत. जीवनाची एकूणच गती वाढत असताना रस्त्यावरील अपघातांची संख्या त्याहून अधिक गतीने वाढत आहे. रस्त्यावरील मृत्यूचे तांडव सुरूच आहे. अगदी रोजच नव्हे, तर दर तासाला ते सुरू आहे.

अगदी साध्या-सुध्या गोष्टी समाजात सगळयांचे लक्ष वेधून घेत असताना हा एवढा गंभीर विषय दुर्लक्षित का राहतो याची खंत वाटल्यावाचून राहत नाही. दरवर्षी भारतात लक्षावधी आणि महाराष्ट्रात हजारो कुटुंबे आपली जीवा-भावाची व्यक्ती अशा अपघातात गमावून दु:खाचे वाटेकरी होत असतात एका क्षणात त्यांचे भविष्य उद्ध्वस्त होऊन जाते. मात्र हे सर्व जणू काही निसर्गाचा प्रकोप आहे असे समजून आपण वागत असतो. खरं तर निसर्गाची अवकृपा अशी रोज होत नाही. तरीही आपण हा जीवघेणा खेळ शांतपणे पाहत राहतो. एका किल्लारीच्या भूकंपात जेवढी माणसं आपण गमावली त्याहून जास्त बळी दरवर्षी महाराष्ट्रातील रस्त्यांवर आपणां सर्वांच्या समोर जात असतात. महाराष्ट्रातील रस्त्यांवर दरवर्षी जवळपास ७० हजार अपघातात सुमारे १२ हजारांहून अधिक मृत्यू आणि ४० हजारांहून अधिक माणसे जखमी होत असतात. जखमींमधील जवळपास निम्मे लोक कायमचे अपंग होऊन बसतात. राज्यातील याबाबतची सन २००० ते २०१० पर्यंतची सविस्तर आकडेवारी पुढीलप्रमाणे :-

**महाराष्ट्र राज्यातील रस्त्यावरील अपघात**

२००० ते (जाने. ते नोव्हें.) २०१०

| अ. क्र. | वर्ष | जीवितहानी | गंभीर जखमी | किरकोळ जखमी | अपघातांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | २००० | ९८४० | १९,३७८ | ३०,३८५ | ७१५५० |
| २. | २००१ | ९७६९ | १९,८१४ | २९,५२६ | ७०,१९३ |
| ३. | २००२ | ९५३० | १९,१३२ | २८,६८३ | ६६,९१० |
| ४. | २००३ | ९४८३ | १९,७५६ | २७,२३६ | ६५,६८६ |
| ५. | २००४ | ९८२२ | २१०८९ | २६,२४६ | ६७,५३४ |
| ६. | २००५ | १०,३५४ | २२,७५१ | २७,७७७ | ७२,२४२ |
| ७. | २००६ | ११,२४२ | २४,९४७ | २८,४७२ | ७५,७७९ |
| ८. | २००७ | १२,०५१ | २५,०१७ | २७,४६१ | ७६,५७३ |
| ९. | २००८ | १२,३९७ | २६,६०५ | २६,१७५ | ७५,५२७ |
| १०. | २००९ | ११,३९६ | २३,९४७ | २३,९३१ | ७१,९९५ |
| ११. | २०१० | १२,०७८ | २१,७६५ | २०,६४९ | ६९,२८० |

२०१४ या वर्षात रस्ते अपघातातील बळींची संख्या १४ हजारांवर पोहचली आहे. तर देशपातळीवर हीच अपघातांची संख्या ३.५ लाखांवर असून त्यात जवळजवळ १ लक्ष ४० हजार मृत्यू आणि सुमारे ५ लक्ष लोक जखमी होत असतात. या प्रकारे आपला देश या अपघातांची जबरदस्त किंमत मोजत आहे.

या विषयाचा अभ्यास करणाऱ्या दिल्ली आय.आय.टी. व विविध विद्यापीठातील अभ्यासकांनी या अपघातांमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानाचा अंदाज केला आहे. २०००-२००१ साली याचे मोल ५५,००० कोटी रुपये होते. जे तत्कालीन एकूण घरेलू उत्पन्नाच्या (जी.डी.पी) ३ टक्के इतके भरते.

२०१० साली या नुकसानाचे आर्थिक मूल्य एकूण ७५,००० कोटी रुपये झाले आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचे झाले तर आपण जवळपास ७,५०० कोटी रुपयांचे मोल या रस्त्यांवरील अपघातांच्यामुळे मोजत असतो. आणि यातील अजून क्लेशदायक गोष्ट अशी की, राज्यातील १२,००० मृत्यूपैकी जवळपास ६० टक्के मृत्यू हे १९ ते ४४ या वयोगटांतील व्यक्तींचे असतात. एवढ्या मोठया संख्येने युवा पिढी यात जीव गमावते त्यांचे मोल कोण व कसे करणार? त्यांच्या मृत्यूच्या दु:खाने ज्यांच्या काळजांना घरे पडलीत त्यात कुटुंबियांखेरीज इतरांना त्याची अनुभूती येणे कठीण आहे.

मात्र याबाबत राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने १९९७ साली निवृत्त सचिव श. रा. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली रस्ते अपघात प्रतिबंधक समिती स्थापन केली. श्री. तांबे सरांसारख्या संवेदनशील व अभ्यासू अधिकाऱ्यामुळे समितीने ७-८ वर्षे खपून बारकाईने अपघातांच्या कारणांचा अभ्यास केला. राज्यभर दौरा करून सर्व स्तरांवरील रस्त्यांचे अवलोकन केले. त्यातील दोष व त्रुटी शोधल्या. विविध क्षेत्रातील व्यक्तींशी संवाद साधला आणि २००५ साली आपला अहवाल अनेक उत्तम शिफारशीसह सादर केला. सार्वजनिक बांधकाम खात्याबरोबर गृहविभाग, शालेय शिक्षण विभाग, जनसंपर्क, महसूल व वन विभाग, नगरविकास विभाग, सहकार विभाग तसेच अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि वित्त विभाग यांच्यासाठी मार्गदर्शनपर सूचना या अहवालात समाविष्ट केल्या आहेत. मात्र सर्वात महत्वाच्या परिवहन विभागासाठीच्या मार्गदर्शक सूचना त्यात नाहीत. या सर्व संबंधित विभागांच्या जबाबदार अधिकाऱ्यांची संयुक्त समिती नेमून सदर शिफारशींची तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे. केंद्रीय नियोजन आयोगाने देखील मे-२००० मध्ये एक कार्यकारी गट स्थापन करून या विषयाबाबत अभ्यासपूर्ण अहवाल जुलै -२००१ मध्ये प्रसिद्ध केला आहे. श्री. श. रा. तांबे हेही त्या कार्यकारी गटाचे सदस्य होते. त्यात कार्यकारी गटाने राज्याने करावयाच्या अनेक आवश्यक व उपयुक्त गोष्टींची चर्चा केली आहे. त्यानुसार धोरणात्मक निर्णय व संस्थात्मक यंत्रणा यांची उभारणी होणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील अनेक व्यक्तींनी या विषयाचा सांगोपांग अभ्यास केला आहे. त्यात श्री. श. रा. तांबे जसे आहेत तसेच स्वत:च्या एकुलत्या एका मुलीच्या

अपघाती मृत्यूने व्यथित होऊन घरात न बसता अपघात निवारण कार्यासाठी गेली दोन दशके सतत झगडणारे श्री. चांदमल परमार आहेत. निवृत्त पोलीस महानिरीक्षक मा. डॉ. पसरिचा, श्री. विवेक फणसळकर, श्री. शेखर, श्री. मनोज पाटील आदी पोलीस अधिकारी आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्याचे अपघात निवारण समितीचे प्रमुख श्री. पी. डी. ममदापुरे, परिवहन विभागात धडाडीने नाविन्यपूर्ण काम करणारे श्री. भरत कळसकर, श्री. योगेश बाग, श्री. वळवी यासह इतर अनेक मंडळी आहेत. विचारी, संवेदनशील, नागरी समाजातील श्री. अशोक दातार, श्री. पद्माकर हेळेकर, श्री. विनायक जोशी, श्री. सुनील पटवर्धन, श्री. नितीन डोसा, ए.आर.ए.आय.चे श्री. श्रीकांत मराठे, सी.आय.आर.टी.चे श्री. मिश्रा, राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे महासंचालक श्री. व्ही. आर. बी. संत अशा अनेक आजी-माजी अधिकारी, अभ्यासक, राजकीय नेते, पत्रकार व स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांच्या सहभागाने समिती गठीत करून राज्याचे वाहतूक सुरक्षा धोरण तातडीने आखणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार राज्यस्तरीय वाहतूक सुरक्षा परिषद व जिल्हा पातळीवर मंडळाची स्थापना करून त्यासाठी विशेष निधीची व आवश्यक यंत्रणेची उभारणी केली पाहिजे. खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत पुढाकार घेऊन संबंधितांच्या अनेक बैठका मुंबईतील चव्हाण सेंटरमध्ये घेतल्या. सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शनासाठी एक नवीन 'वाहतूक सुरक्षा धोरण' तयार केले. या धोरणाची प्रत दि. १४ जून २०११ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री मा. अजित पवार यांनाही देण्यात आली. या संदर्भात सरकारबरोबर काही बैठकाही घेण्यात आल्या. पण निश्चित असे अजून काहीही साध्य झाले नाही. दरम्यानच्या काळात राज्य सरकार बदलले असल्याने वाहतूक सुरक्षा धोरणाची एक प्रत सध्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनाही दि. १२ डिसेंबर २०१४ रोजी देण्यात आली आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई; सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ते सुरक्षा संबधात सतत पाठपुरावा करत आहे.

## संपन्न झालेले कार्यक्रम

### २४ जानेवारी २०१५

२६व्या रस्ता वाहतूक सुरक्षा अभियाना अंतर्गत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) आदित्य ज्योत फाउंडेशन फॉर ट्विंकलिंग लिटील आईज् यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. २४ जानेवारी २०१५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मानखुर्द जकातनाका येथे वाहन चालकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदित्य ज्योत फाउंडेशनच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने १५० वाहनचालकांची नेत्र तपासणी करून आवश्यकतेनुसार चष्मा वाटपसुद्धा करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठान, मुंबईच्या कार्यकर्त्यांसोबत प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) चे रस्ता वाहतूक अधिकारी श्री. चव्हाण यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांची उपस्थिती होती. हे नेत्र तपासणी शिबीर सुरू असताना उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व) श्री. संजय ससाणे यांनी भेट देऊन उपस्थित डॉक्टर्स, प्रतिष्ठान, मुंबईचे समन्वयक उमाकांत जगदाळे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानचे समन्वयक रमेश सांगळे, सूरज चव्हाण यांचे विशेष सहकार्य मिळाले.

### १४ जानेवारी २०१५

२६ व्या रस्ता वाहतूक सुरक्षा अभियाना अंतर्गत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रादेशिक परिवहन कार्यालय मुंबई (पूर्व), मुंबई पोलीस उपायुक्त, परिमंडळ ४, आदित्य ज्योत फाऊंडेशन, यशवंत सामाजिक केंद्र व जे. जे. रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. १४ जाने. २०१५ रोजी, स. ११.०० वा. प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) येथील पटांगणात वाहन चालकांसाठी नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रस्त्यावर वाहन चालविताना नियमांचे, आदेश चिन्हे, संदेश चिन्हे यांचे व्यवस्थित पालन झाले तर अपघात निश्चित कमी होती, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मुंबई (पूर्व) श्री. संजय ससाणे म्हणाले.

किल्लारी येथील भूकंपात जेवढे लोक मृत्युमुखी पडले असतील त्यापेक्षा अधिक बळी रस्त्यावरील अपघातात जातात. वाहन चालकांनी कोणत्याही प्रकारचे व्यसन न करता वाहन चालवावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले.

रस्ता सुरक्षा अभियान केवळ पंधरवडा म्हणून मर्यादित न राहता, संपूर्ण वर्षभर विविध विभागांत राबविला पाहिजे, तसेच केवळ दंड भरून वाहन नियम तोडण्याची मानसिकता बदलली पाहिजे, असा संदेश मुंबई पोलीस उपायुक्त (परिमंडळ ४) श्री. अशोक दुधे यांनी दिला.

याच प्रसंगी बोलतांना श्री. बी. आय. आजरा प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) अधिकारी म्हणाले की, सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन नागरिकांमध्ये 'रस्ता सुरक्षा' बाबत प्रबोधन केले पाहिजे.

या कार्यक्रमाची सुरुवात व्यसन विरोधी पथनाट्य सादरीकरणाने करण्यात आली. या शिबिरात आदित्य ज्योत फाउंडेशन फॉर ट्विंकलिंग लिटील आईज् यांच्या तज्ज्ञ डॉक्टर्सनी २५०-३०० वाहन चालकांची नेत्र तपासणी केली, तर जे. जे. रुग्णालय यांच्या डॉक्टरांनी १५०-२०० वाहन चालकांची आरोग्य तपासणी केली.

वाहतूक सुरक्षा अभियान या उपक्रमाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांच्या मार्गदर्शनाखाली उमाकांत जगदाळे, सूरज चव्हाण, रमेश सांगळे हे समन्वयक म्हणून काम पाहतात.

# अपंग हक्क विकास मंच
## वाटचाल

भारतातील २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या २.२६ टक्के लोकसंख्या ही अपंग प्रवर्गात मोडते. अपंगत्व हे शारीरिक अपंगत्व, कर्णबधिरत्व, किंवा मतिमंदत्व अशा विविध प्रकारात मोडते.

अपंगत्वाचे एकूण आठ प्रकार मानले आहेत, आणि हे अपंगत्व सर्व प्रकारच्या वयोगटात दिसून येते. त्यादृष्टीने हा प्रवर्ग मोठा असला तरी अतिशय विस्कळीत स्वरूपाचा आहे.

ह्या प्रवर्गाचे प्रश्न अनेक आहेत. सुविधा, अपंगत्वाचे दाखले, शैक्षणिक पुनर्वसन, कौटुंबिक आणि सामाजिक पुनर्वसन ह्या सर्व अंगाने यांचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

असा एकसंध विचार २००६पर्यंत एकत्रितरीत्या झाला नव्हता. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे जे अनेक विविध कार्यक्रम राबविले जातात, त्यामध्ये 'अपंग हक्क विकास मंच' असे एक व्यासपीठ सुप्रियाताई सुळे यांनी निमंत्रक म्हणून तयार केले.

२००६ पासून ह्या मंचाने अपंगांच्या अनेक प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा केला आहे.

मंच अपंग व्यक्ती, संस्था, संघटना ह्या सर्वांसाठी एक दुवा (catalyst) म्हणून कार्यरत आहे. अपंग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना त्यांच्या गरजेनुसार सोयीसुविधा, शासनाच्या विविध योजना यांची माहिती करून देणे, त्याकरिता जनजागृती करणे अशा प्रकारची कामे करत आहे. त्यामध्ये ग्रामीण भागातील अपंग व्यक्तीचे शैक्षणिक, शारीरिक आणि सामाजिक पुनर्वसनाचे विशेष प्रयत्न होत आहेत.

ह्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून ग्रामीण भागातील अपंगासाठी कृत्रिम अवयव, साह्यभूत साधने उपलब्ध करून देण्यासाठी एक नाविन्य पूर्ण बस ( Mobile Van ) २०१०-२०११ मध्ये कार्यान्वित केली.

ह्या माध्यमातून आजपर्यंत महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यातून ४०,००० लाभार्थीपर्यंत अपंग हक्क विकास मंच पोचला आहे

अपंग हक्क विकास मंचातर्फे अपंग मुले-मुली, प्रौढ व्यक्ती, वृद्ध व्यक्ती ह्या सर्वाना समाजाचा अविभाज्य घटक मानून मदत केली जाते.

समाजाच्या अशा एका अविभाज्य घटकासाठी काही निश्चित ध्येय धोरणे असावीत, ह्या विचारांनी ह्या मंचा तर्फे, 'अपंगासाठी धोरण निर्मिती प्रक्रिया' २०१२ मध्ये सुरू केली.

त्यामध्ये तज्ज्ञ व्यक्ती, शासनाचे प्रतिनिधी यांचा एकत्रित अभ्यासगट तयार केला, त्या अभ्यासगटाने अपंगाचे धोरण हा मसुदा २०१२ मध्ये तत्कालीन सरकारला सादर केला आहे. आता प्रतीक्षा आहे त्याच्या अमलबजावणीची !!

मंचातर्फे विविध प्रकारचे प्रशिक्षण वर्ग राबविले जातात, त्यामध्ये अपंग शेतकरी बांधवासाठी विशेष कौशल्य विकसन शिबिरे घेण्यात आली. ह्या मंचातर्फे २००६ पासून आतापर्यंत तीन अधिवेशने घेण्यात आली.

प्रत्येक वेळी १५००-२००० अपंग व्यक्तींची उपस्थिती हा त्यातील लक्षवेधी भाग होता, प्रत्येक अधिवेशनाला माननीय श्री. शरद पवार यांनी मार्गदर्शन देऊन अपंग बांधवाना ऊर्जा दिली आहे.

मंचातर्फे अपंग स्त्रियांचे प्रश्न लक्षात घेऊन त्यांचे बचत गट करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. अपंगासाठी विवाह समुपदेशन, कौटुंबिक प्रश्न, सामाजिक समायोजन ह्याचाही विचार केला आहे.

अपंग हक्क विकास मंचाने अपंगांचा एकही प्रश्न न हाताळता सोडलेला नाही. त्यातील सर्वात अभिनव उपक्रम म्हणजे कर्णबधीर मुलांना, आणि व्यक्तींना ऐकण्याच्या आनंदासाठी श्रवणयंत्रांचे वाटप !!

हा कार्यक्रम नोव्हेंबर २०१३ पासून सुरू करण्यात आला आहे.

भारतात दरवर्षी दर हजारी मुलांमागे चार बालके कर्णबधीर म्हणून जन्माला येतात. याचाच अर्थ भारतात दर वर्षी ३०,००० कर्णबधीर बालके जन्माला येतात.

जन्मापासून नंतरच्या काळात काही आजारामुळे उदा. तीव्र कावीळ, मेंदूज्वर मुळे श्रवण दोष येऊन या संख्येत वाढ होते.

कर्णबधीरत्व हा एक न दिसणारा अपंगत्वाचा प्रकार आहे, कर्णबधीरतेमुळे व्यक्ती आवाजाच्या जगापासून वंचित राहते, आणि ऐकू न येण्यामुळे कानावर भाषा पडत नाही , आणि मुले भाषा विकासापासून वंचित राहतात.

भाषा विकास न झाल्यामुळे ह्या मुलांची शिक्षणाची दारे बंद होतात, ह्या सर्व प्रश्नाचे एक उत्तर म्हणजे सर्व कर्णबधीर मुलांना लवकरात लवकर आवाजाच्या जगात आणणे!!

स्टारकी हिअरिंग फाउंडेशन, अमेरिका (Starkey Hearing Foundation, USA) च्या मदतीने आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान च्या सौजन्याने आज पर्यंत ३५०० मुलांना दोन्ही कानासाठी अत्याधुनिक डिजिटल श्रवण यंत्रे देण्यात आली.

सर्व प्रथम औरंगाबाद येथे नोव्हेंबर २०१३ मध्ये १५०० मुलांना ऐकण्याचा आनंद मिळाला, त्यानंतर सप्टेंबर २०१४ मध्ये पुणे येथे ५०० मुलांना, आणि ५०० वृद्ध व्यक्तींना लाभ मिळाला.

फेब्रुवारी २०१५ मध्ये ठाणे जिल्ह्यातील १००० आदिवासी मुलांना आवाजाची अनोखी भेट मिळाली.

हा कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने राबविला जातो, सर्व प्रथम विशेष शाळामधून जाऊन कर्णबधीर मुलांची कानाची तपासणी केली जाते, त्यांची कानाची मापे घेतली जातात.

दोन महिन्याच्या कालावधीमध्ये त्यांच्या कानाचे साचे तयार केले जातात. श्रवणयंत्रे बसविण्याच्या दिवशी पुन्हा एकदा कान तपासून कानात मळ नाही याची खात्री केली जाते.

मुलांना दोन्ही कानाला श्रवणयंत्रे दिली जातात. श्रवणयंत्रे देताना मुलांना आवाजाचा त्रास होत नाही न याची खात्री केली जाते, तसेच दोन्ही कानाला श्रवणयंत्राचा आवाज सारखा आहे ना याची खात्री केली जाते.

कर्णबधीर मुले, त्यांचे शिक्षक यांना श्रवणयंत्र लावायचे कसे, त्याची स्वच्छता, आणि काळजी कशी घ्यायची, ह्याचे मार्गदर्शन केले जाते.

दोन श्रवणयंत्रे, कानाचे रबरी साचे, एक वर्षासाठी लागणाऱ्या बॅटरी इ. सर्व गोष्टी म्हणजे रु २५,०००/- किमतीची भेट !

ह्या सर्व बाबतीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने अतिशय सढळ हाताने मदत करून वंचितातील वंचित वर्गासाठी देखील आम्ही आहोत हे दाखवून दिले आहे.

हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी स्वयंसेवकांची एक मोठी फळी उभी असणे, ही आणखी एक कौतुकाची गोष्ट आहे. मंचाने स्वयंसेवकांची एक फळी तयार केली आहे.

ह्या स्वयंसेवकांना प्रश्नाची जाण आहे, सर्व वयोगटातील व्यक्तींबरोबर सजगतेने काम करण्याची वृत्ती आहे आणि आपले प्रश्न आपण सोडवायचे याचे भान आहे.

२००६ पासून आजपर्यंत म्हणजे सुमारे नऊ वर्षात अपंग हक्क मंचाने अतिशय भरीव कामगिरी केली आहे.

सध्या ह्या सर्व श्रवणयंत्र लाभार्थींना किती फायदा झाला आहे, त्यांच्या मध्ये कशा प्रकारची शैक्षणिक प्रगती झाली आहे, याच्या नोंदी घेतल्या जात आहेत. पुढील पाच वर्षात महाराष्ट्रातील सर्व कर्णबधीर मुलांना श्रवणयंत्रे देण्याचा प्रतिष्ठानचा मानस आहे, महारष्ट्रातील एकही कर्णबधीर मुलगा किंवा मुलगी आवाजापासून वंचित राहता कामा नये, ह्या ध्येयाने सुप्रियाताई व त्यांचे सहकारी कटीबद्ध आहेत.

## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती करण्यात आली. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत आणि संघटक सुकेशनी मर्चंडे-शेवडे हे काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात शिबिराचे आयोजन करून सर्व प्रवर्गातील अपंगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कृत्रिम अवयव व साहित्य साधनांसाठीचे मोजमाप घेऊन अपंगांना कृत्रिम अवयव व साधने मोफत उपलब्ध करून दिली जातात. तसेच या मंचामार्फत प्रत्येक अपंग व्यक्तीला तिच्या अपेक्षेनुसार योग्य ती माहिती पुरविली जाते. तसेच अपंगांना मदत करण्याचा आपल्या स्तरावरून योग्य ते सहकार्य करण्याचा मंचाचा सतत प्रयत्न असतो.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, यांच्या संयुक्त विद्यमाने आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने एडीप योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व प्रवर्गातील अपंगांसाठी कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व अपंग हक्क विकास मंचाचे कर्मचारीवृंद व कार्यकर्ते आणि सहकारी यांनी परिश्रम घेतले. त्याची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे.

### १) कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर

(धुळे, दि. १३ सप्टेंबर २०१४)

जिल्हा धुळे येथे आयोजित शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य रूपसिंग चौधरी, देवीसिंग सोनवणे, प्रा. संजय पाटील, समाज कल्याण अधिकारी वासुदेव पाटील, अपंग कल्याण विभागाचे विजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण १०५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून ८३ गरजू लाभार्थ्यांना साहित्यवाटप करण्यात आले. यामध्ये जयपूर फुट, कॅलिपर, व्हीलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंधकाठी, गॉगल, ब्रेलकिट, एम. आर. किट इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिक विषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

### २) कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर

(सिंधुदुर्ग, दि. ३ डिसेंबर, २०१४)

जिल्हा सिंधुदुर्ग येथे जागतिक अपंग दिनानिमित्त आयोजित या शिबिरासाठी विशेष अतिथी म्हणून जिल्हा परिषद सभापती अंकुश जाधव, वै.सा.का. यतिन अहिरे, फादर सीबीचेन जोसेफ, जिल्हा परिषद अध्यक्ष संदेश सावंत उपाध्यक्ष रणजित देसाई जि. प. सदस्य जनार्दन तेली, प्रभारी सुनिल रेडकर, अशोक भारती, सर्व शिक्षा अभियानच्या वैशाली देसाई यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई हे मान्यवर उपस्थित होते. १०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून ८१ गरजू लाभार्थ्यांना साहित्यवाटप करण्यात आले. जयपूर फुट, कॅलिपर, व्हीलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंधकाठी, गॉगल ब्रेलकिट, एम.आर. किट इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिक विषयाचे मार्गदर्शन करण्यात आले.

### ३) कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर

(मुंबई, दि. ३ डिसेंबर, २०१४)

मुंबई शहर येथे जागतिक अपंग दिनानिमित्त आयोजित या शिबिरासाठी प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. शरद

काळे, मुंबई अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ व समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर यांच्यासह अनिल चाळके, विजय कसबे, रमेश सांगळे, सुरेश पाटील, सूरज चव्हाण, उमाकांत जगदाळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या शिबिरात एकूण ६० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून ४३ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फुट, कॅलिपर, व्हीलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंधकाठी, गॉगल इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिक विषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

**४) कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर** (रत्नागिरी, दि. ५ डिसेंबर, २०१४)

जिल्हा रत्नागिरी येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे वै.सा.का. श्री. कांबळे, मुख्याध्यापक श्रीमती ताटके, वै.सा.का. यतीन अहिरे शिक्षक व विद्यार्थी लाभार्थी यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या शिबिरात एकूण ७६ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून ५४ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फुट, कॅलिपर, व्हीलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंधकाठी, अंध गॉगल, ब्रेलकिट, एम.आर. किट इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील साहित्याचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

**५) कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर** (दापोडी, पुणे, दि. १२ डिसेंबर, २०१४)

दापोडी जिल्हा पुणे येथे आयोजित या शिबिरासाठी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. खा. सुप्रियाताई सुळे, प्रभारी समाज कल्याण अधिकारी, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर व समन्वयक सुहास तेंडुलकर यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या शिबिरात एकूण ७५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करून त्यापैकी ४५ गरजू लाभार्थ्यांना साहित्यवाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हीलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेलकीट, एम.आर. कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.

**६) कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर** (एनकुळ, सातारा दि. १२ डिसेंबर, २०१४)

एनकुळ, जिल्हा सातारा येथे आयोजित या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन ग्रामपंचायत समिति सदस्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ व श्री. विजय कान्हेकर, श्री. अर्जुन खाडे आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात एकूण ७० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून ३४ गरजू लाभार्थ्यांना साहित्यवाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हीलचेअर, अंध गॉगल, अंध काठी ब्रेलकिट, एम. आर. किट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.

**७) 'महाराष्ट्रातील अपंगांसाठी धोरण - चर्चासत्र'** (नागपूर, दि. १५ डिसेंबर, २०१४)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अपंग हक्क विकास मंच, अपंग आर्थिक विकास महामंडळ, महात्मा गांधी सेवा संघ व्दारा संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, नागपूर आणि राष्ट्रीय विकलांग कल्याणकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी स्थळ : विदर्भ साहित्य संघ सभागृह, झाशी रानी चौक, सिताबर्डी, नागपूर येथे सायंकाळी 'महाराष्ट्रातील अपंगांसाठी धोरण' हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या चर्चासत्राकरिता प्रमुख पाहुणे म्हणुन मा. आमदार बच्चू कडू, मा. आमदार हेमंत टकले, मा. न्यायमंत्री राजकुमार बडोले, महाराष्ट्र अपंग आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक - श्री. सुहास काळे, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक -

विजय कान्हेकर, समन्वयक सुहास तेंडुलकर, समन्वयक - अभिजीत राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. या चर्चासत्रात १०० अपंगांनी सहभाग घेतला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अभिजीत राऊत, गजानन वाघ, हनुमान तेलंग आणि कोअर ग्रुप आदींनी परिश्रम घेतले.

८) **अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाइंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षांपासून नियमित दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी अंध प्रवर्गासाठी चर्चासत्राचा उपक्रम राबविला जातो. या सत्रात अंधांना विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनपर चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातील झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. यामुळे या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य कसे सोप्या पद्धतीने जगता येऊ शकते याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदतही होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपंग हक्क विकास मंचाच्या संघटक सुकेशनी मर्चंडे-शेवडे विशेष परिश्रम घेतात.

# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

शिक्षण विकास मंचाने आपल्या कतृत्त्वाच्या जोरावर महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे ह्या शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक म्हणून तर डॉ. वसंत काळपांडे, मुख्य संयोजक आणि श्रीमती बसंती रॉय विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी संभाळत आहेत. श्री. दत्ता बाळसराफ हे संयोजक, श्री. सुरेश पाटील, माधव सूर्यवंशी समन्वयक व मिनल सावंत व रमेश मोरे, हे सहाय्यक म्हणून काम पहातात तर श्रीमती शुभदा चौकर व श्री. विकास कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभते.

### मुख्याध्यापक प्रशिक्षण

शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी मुख्याध्यापकाची भूमिका खूप महत्त्वाची ठरते. त्यास अनुसरून बदलत्या काळात मुख्याध्यापकांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या आदीबाबत प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक १० ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर २०१४ या तीन दिवसाच्या कालावधीत रयत शिक्षण संस्था, सातारा व शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रयत शिक्षण संस्थेच्या सर्व विभागातील काही निवडक मुख्याध्यापकांचे प्रशिक्षण पुणे येथे आयोजित करण्यात आले होते.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन स्वर्गीय ॲड. रावसाहेब शिंदे व मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे तसेच श्रीमती बसंती रॉय व इतर सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत व प्रशिक्षण वर्गाची सुरुवात करण्यात आली. या प्रशिक्षण वर्गात मुख्याध्यापक व शाळा आणि विद्यार्थी यांचा संयुक्त सर्वांगीण विकास या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

शाळेचा मुख्य घटक विद्यार्थी आहे. त्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन व संस्थेमार्फत आवश्यक ते बदल केलेले आहेत. त्या बदलाची, नियमांची अमलबजावणी मुख्याध्यापक व शिक्षकांनी कशा पद्धतीने करावी याबाबतचे मार्गदर्शन करण्यात आले.

मुख्याध्यापक हा शाळेचा कणा आहे त्यामुळे मुख्याध्यापकांमध्ये अनेक गुण व कौशल्ये असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचा विकास म्हणजे समाजाचा विकास असतो. त्या विद्यार्थ्यांतील त्रुटी, दोष दूर करून त्यांना सकारात्मक विचार दिल्यास प्रगती साधना येऊ शकते. यासाठी व मुख्याध्यापकांनी काय करावे याबाबतची चर्चा प्रामुख्याने या प्रशिक्षणात झाली.

### विशेष बैठक - ३० सप्टेंबर २०१४

मंगळवार दिनांक ३० सप्टेंबर २०१४ रोजी शिक्षण विकास मंचची विशेष बैठक डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली या बैठकीत २०, २१ सप्टेंबर २०१४ रोजी सुयश शैक्षणिक गुणवत्ता विकास प्रकल्पाअंतर्गत ते दोन दिवसीय कृतिसत्र संपन्न झाले. त्याबाबतची चर्चा करण्यात आली. कृतिसत्रास कसा प्रतिसाद मिळाला, कृतिसत्रानंतर गुणवत्ता विकास करण्यासाठी आणखी आपणास काय करता येईल, याबाबतची सांगोपांग चर्चा या विशेष बैठकीत करण्यात आली,

दि. २५ नोव्हेंबर २०१४ रोजी जिल्हा राज्यस्तरीय शिक्षण परिषद घेण्यात येणार आहे. त्यासंदर्भात पूर्वतयारीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. या परिषदेसाठी निमंत्रण पाठविणे, तज्ज्ञ वक्ते यांची निवड करणे, निमंत्रितांची यादी करणे, शिक्षण परिषदेत शैक्षणिक विषयावरच्या पुस्तकास जे पुरस्कार देण्यात येणार आहेत, याबाबतची चर्चा करण्यात आली. 'वाटचाल इ-शिक्षणाची' हे पुस्तक प्रकाशित करण्यात

येणार आहे. यासंदर्भात योग्य ते निर्णय घेण्यात आले. या बैठकीस श्रीमती बसंती रॉय, दत्ता बाळसराफ, माधव सूर्यवंशी, विकास कांबळे, सुरेश पाटील, निलेश पुराडकर आदींची उपस्थिती होती.

**विशेष बैठक - दि. ६ नोव्हेंबर २०१४**

गुरुवार दिनांक ६ नोव्हेंबर २०१४ रोजी शिक्षण विकास मंचची विशेष बैठक ठेवण्यात आली होती. ही बैठक प्रामुख्याने २५ नोव्हेंबर २०१४ रोजी जी राज्यस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली आहे. यासंदर्भातील कामाचा आढावा घेण्यासाठी घेण्यात आली होती.

या वर्षाची परिषद 'सरकारी आणि अनुदानित शाळांपुढील आव्हाने' या विषयावर ठेवण्यात आली होती. या परिषदेसाठी विशेष निमंत्रितांची यादी निश्चित करण्यात आली, प्रमुख पाहुणे, उद्घाटक, सादरीकरण करणारे तज्ज्ञ यांच्याशी झालेला संवाद याबाबतची माहिती डॉ. वसंत काळपांडे यांनी सांगितली. आपणास याबाबतीत आणखी काय काम करावे लागेल यासाठीची सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. या परिषदेनिमित्त शिक्षण विकास मंचाकडून डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक प्रयास दिला जाणारा पुरस्कार या संबंधित चर्चा करण्यात आली याची जबाबदारी श्री. विकास कांबळे यांच्याकडे देण्यात आली.

शिक्षण परिषदेत वाटचाल ई-शिक्षणाची हे पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरले होते. या पुस्तकाच्या संपादनाची मुख्य जबाबदारी श्रीमती बसंती रॉय यांच्याकडे होती. त्यांनी पुस्तकाबाबतीत सुरू असलेल्या कामाचा आढावा सर्वांना सांगितला. आणखी यात कोणते काम बाकी आहे याचीही चर्चा यावेळी झाली. परिषद कशाप्रकारे यशस्वी होईल, याची सर्वांगीण चर्चा यावेळी करण्यात आली आणि संदर्भातील कामाच्या जबाबदारीचे वाटप संबंधितांना यावेळी करण्यात आले.

**विशेष बैठक - दि. १२ जानेवारी २०१५**

डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'आदर्श शाळा योजना' सुयश गुणवत्ता विकासासाठी ज्या शाळांची निवड झाली आहे तेथे कशी राबवता येईल. यासाठी क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया या संस्थेचे मुंबई विभागाचे संयुक्त सचिव विजय लाड आणि जयेश यांना निमंत्रित करण्यात आले होते.

**राष्ट्रीय शिक्षक दिन - ( २५ नोव्हेंबर २०१४ )**

भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी शिक्षण विकास मंच राष्ट्रीय शिक्षण दिनाचे आयोजन करत आहे. यावर्षी ११ नोव्हेंबर हा दिवस दिवाळी सुट्टीच्या कालावधीत येत असल्याने हा कार्यक्रम या वर्षी दिनांक २५ नोव्हेंबर २०१४ रोजी मंगळवार या दिवशी 'रंगस्वर' यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यथे आयोजित करण्यात आला होता. २५ नोव्हेंबर हा दिवस मा. यशवंतराव चव्हण यांचा स्मृतिदिन आहे.

दरवर्षी घेण्यात येणारी शिक्षण परिषद ही राज्यस्तरीय असते. या वर्षी परिषदेचा विषय 'सरकारी आणि अनुदानित शाळांपुढील आव्हान' हा होता. ह्या परिषदेस राज्यभरातून शिक्षणावर काम करणारे कार्यकर्ते, शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक आणि शिक्षण-तज्ञ यांना निमंत्रित करण्यात आले होते. गेल्या दहा वर्षात विनाअनुदानित शाळांचे प्रमाण दुपटीने वाढले आहे तर सरकारी आणि अनुदानित शाळांचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे. इंग्रजी माध्यमांचे वाढते आकर्षण व शासनाचे धोरण यामुळे विनाअनुदानित शाळा वाढत आहेत. सरकारी आणि अनुदानित शाळांच्या अडचणी समजून घेऊन त्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी बरेच काही करण्याची आणि तातडीची उपाययोजना करण्याची गरज आहे. या अनुषंगाने या परिषदेत दिवसभर विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

या परिषदेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

१. सरकारी आणि अनुदानित शाळांच्या महाराष्ट्रातील सद्यस्थितीचा आढावा घेणे;

२. या शाळांपुढील अडचणी आणि आव्हाने यांचे त्यांच्याशी निगडित असलेल्या विविध गटांचे पुढील विषयांबाबतचे आकलन समजावून घेणे:

a. शिक्षण हक्क कायदा;
b. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान;
c. अध्ययन - अध्यापन प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांचे मूल्यमापन;
d. शिक्षकांच्या नेमणुका;
e. शिक्षक प्रशिक्षण;
f. भौतिक सुविधा आणि अनुदान;
g. शाळांशी संबंधित विविध कायदे आणि नियम;
h. सरकारी, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांची तुलना;
i. विविध शिक्षण मंडळांच्या शाळांची तुलना;
j. शाळांची तपासणी आणि मूल्यांकन;
k. संस्थाचालक, पालक, लोकप्रतिनिधी, विविध संघटना (शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक आणि इतर)
l. शिक्षणाचे भाषामाध्यम
m. शाळांशी संबंधित इतर विषय

३. सरकारी आणि अनुदानित शाळा टिकवण्यासाठी आणि त्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठी शाळा, शिक्षक, पालक, व्यवस्थापन आणि शासन यांच्या स्तरावर कोणती उपाययोजना करता येईल याबाबत शासनाला धोरणात्मक शिफारशी करणे.

शिक्षण विकास मंचाने आतापर्यंत वेगवेगळ्या विषयावर सातत्याने पाच परिषदा घेऊन या विषयावरचे विचारमंथन संपूर्ण राज्यभर घडवून आणले आहे. आजची परिषद ही सहावी आहे. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी, या परिषदेची भूमिका यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे यांनी स्पष्ट केली. तर प्रास्ताविक शिक्षण विकास मंचाचे संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले. प्रास्ताविक करीत असताना शिक्षण विकास मंचाचे कार्य आणि आजची परिषद या विषयावर आयोजित करण्यात आली आहे, हे सांगितले. शिक्षण विकास मंचाने विविध शिक्षणातील विषय घेऊन याच्या शिफारशी शासनाकडे सादर केल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून शिक्षण विकास मंचाकडून दरवर्षी दिले जाणारे जे पुरस्कार आहेत त्याचेही वितरण यावेळी करण्यात आले. मान्यवर पाहुणे व राज्याचे शिक्षणमंत्री ना. विनोद तावडे यांच्या हस्त डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार 'मनुष्य घडणीसाठी आव्हान' या ग्रंथासाठी लेखक श्री. गिरीश बापट पुणे यांना देण्यात आला. 'ज्ञानरचनावाद एक कल्पवृक्ष' लेखक राजेश कोगदे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला. आज शिक्षणात मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला आहे. यास अनुसरून शैक्षणिक विषयावर ब्लॉग लिहणाऱ्यास 'उत्कृष्ट शैक्षणिक ब्लॉग हा पुरस्कार देण्यात येतो. या वर्षाचा पुरस्कार प्राथमिक शिक्षक श्री. बालाजी जाधव यांना देण्यात आला. याच सोबत 'ई लर्निंग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे शमशुद्दीन आत्तार यांनाही इ-लर्निंगवरील प्रकल्पासंदर्भात पुरस्कार देण्यात आला. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, ग्रंथ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मान्यवरांच्या हस्ते अतिशय उत्साहाच्या भरात पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

आजच्या परिषदेचे उद्घाटक राज्याचे शिक्षणमंत्री ना. विनोद तावडे यांनी केले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी शिक्षण हक्क कायदा आणि राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान याबाबत विचार व्यक्त करताना सांगितले की, हा कायदा राज्यास लागू करीत असतांना त्यात राज्यानुरूप बदल होणे आवश्यक होते पण ते झाले नाहीत, मात्र आगामी काळात यात योग्य ते बदल करण्यात येतील असे नमूद केले. शिवाय सरकारी आणि अनुदानित शाळांसमोरील आव्हानांबाबत बोलतांना ते म्हणाले की, शासन म्हणून जी जबाबदारी शालेय गुणवत्तेखाली आवश्यक आहे ती आपण करणार आहोत, शिवाय शिक्षकांचे प्रशिक्षण अद्ययावत

करण्यावर त्यांनी भर दिला. एकाही शिक्षकाची नोकरी जाणार नाही, पण जेवढा पगार दिला जातो तेवढे काम शिक्षकांनी करावे असा चिमटाही काढण्यास ते विसरले नाहीत. दिवसभरात या परिषदेत जी चर्चा होईल, ज्या सूचना, शिफारशी येतील त्या आपण शासनाकडे सादर कराव्यात त्याचा आम्हांस धोरण बनविताना नक्कीच फायदा होईल हे सांगून परिषद यशस्वितेसाठी शुभेच्छा दिल्या.

उद्घाटनपर सत्रास उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे आभार श्रीमती बसंती रॉय यांनी मानले.

परिषदेचे उद्घाटन झाल्यानंतर परिषदेस मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित करण्यात आलेल्या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे सादरीकरण झाले. सरकारी आणि अनुदानित शाळा यावर शासनाची काय भूमिका आहे? शासनाने आजपर्यंत बजावलेली कर्तव्ये या संदर्भात शासनाची भूमिका या विषयावरची मांडणी महाराष्ट्र शासनाचे माध्यमिक शिक्षण विभागाचे सहसंचालक श्री. दिनकर पाटील यांनी केली. शासनाने वेळोवेळी नवनवीन प्रयोग शिक्षण क्षेत्रात राबविले त्यामुळेच आज शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्र एक पुढारलेले राज्य आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. अजूनही सरकारी आणि अनुदानित शाळांच्या प्रश्नांच्या बाबतीत शासन संवेदनशील असल्याचे त्यांनी सांगितले, सरकारी आणि अनुदानित शाळा आणि शिक्षकांची भूमिका या विषयावरील सादरीकरणासाठी कोकण विभागाचे शिक्षक आमदार रामनाथ मोनेसर यांना निमंत्रित करण्यात आले होते. शिक्षकांची भूमिका मांडतांना ते म्हणाले की, सरकारी शाळांतील शिक्षकांने आजपर्यंत शाळाबाह्य कामाबरोबरच शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. सरकारी शाळेत येणारी मुले जरी भिन्न वर्गातील असली तरी त्यांना अध्ययनाची गोडी लावण्याचे काम शिक्षकांनी केले आहे, हे सांगताना शिक्षकांनी परिवर्तनशील असावे, काळाबरोबर स्वत:ला अपडेट ठेवावे असाही सल्ला त्यांनी उपस्थित शिक्षकांना दिला. शिक्षकांनी मुलांच्या भवितव्याबाबत विचार करून त्यांना अध्यापनास उद्युक्त करावे. आपण शिक्षकांसाठी सरकारकडे भांडण्यास कमी पडणार नाही, असेही ते म्हणाले. श्री. आप्पा सावंत यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवत्तापूर्वक शिक्षण सध्या कसे दिले जात आहे, याची काही उदाहरणे दिली, आज जि. प. शाळांचा दर्जा सुधारत असल्याचे सांगितले. श्री. रमाकांत पांडे, उपाध्यक्ष व कायदेशीर सल्लागार, शैक्षणिक संस्था व्यवस्थापक मंडळ यांनी, माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. शासन आज अनुदानित शाळांना शिक्षकेतर कसलेही अनुदान देत नाही व त्याचबरोबर शिक्षकाव्यतिरिक्त शिपाई, लिपिक ही पदे भरण्यासी परवानगी देत नाही याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर झाला आहे. अनुदान नसल्याने दैनंदिन खर्च भागविणे संस्थाचालकांना गंभीर होऊन बसले आहे. आज बहुतेक अनुदानित शाळा ह्या आर्थिक संकटात सापडल्या आहेत. कोणत्याही पायाभूत सुविधा आर्थिक अडचणीमुळे व्यवस्थापक मंडळ शाळांना अर्थातच विद्यार्थ्यांस देऊ शकत नसल्याचे त्यांनी सांगितले व नवीन शासनाने त्वरीत आमचे अनुदान द्यावे अशीही मागणी यावेळी त्यांनी केली. अनुदानित माध्यमिक शाळा या संदर्भात श्री. अरुण थोरात अध्यक्ष मुख्याध्यापक महामंडळ यांनी आपले विचार व्यक्त केले.

भोजनोत्तर सत्रामध्ये दोन तज्ज्ञांची सादरीकणे झाली त्यात पहिले सादरीकरण 'अल्पसंख्याकांच्या शाळा' या विषयावर अंजुमन इस्लाम संस्था समूहाचे चेअरमन श्री. जहीर काझी यांचे झाले. काझी सरांनी आपल्या व्यासंगी आणि अभ्यासपूर्ण मांडणीत अल्पसंख्याकांच्या शाळांसमोरील आव्हाने यावर प्रमुख भर दिला. अल्पसंख्याक समाजात खऱ्या अर्थाने शिक्षणाची खूप गरज आहे, मात्र शासनाचे यासंदर्भातील धोरण धरसोड वृत्तीचे आहे यात बदल व्हायला हवा असे मत त्यांनी मांडले. विद्यार्थी आणि व्यवस्थापन मंडळ यासंदर्भात अनेक नियामक कायदे हे कालबाह्य

झाले असून नव्याने कायदे बनविण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. महानगरपालिका शाळांची शैक्षणिक गुणवत्ता या विषयावर डॉ. श्रुती पानसे (शिक्षण क्षेत्रातील एक अध्यापक) यांनी मते मांडली. मनपा शाळामध्ये सुविधा असुनही ही मुले अभ्यासात का मागे पडतात, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मनपा शाळेतील शिक्षकांनी, मुख्याध्यापकांनी यावर गंभीरपणे विचार करावा असेही आव्हान त्यांनी केले.

उत्साहात व तितक्याच गंभीरपणे चर्चा झालेल्या राज्यस्तरीय परिषदेच्या समारोपाच्या सत्रात दिवसभर झालेल्या चर्चेचा आढावा डॉ. वसंत काळपांडे यांनी घेतला मात्र समारोपाचे सत्र खऱ्या अर्थाने लक्षात राहीले ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा आणि शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रण सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाने, त्यांनी या परिषदेचा समारोप करीत असताना राज्यभरातून आलेल्या शिक्षकांचे कौतुक केले, पण त्याचबरोबर शालेय शिक्षणात शिक्षक इंग्रजीसारखा विषय चुकीच्या पद्धतीने कसा शिकवितात याचा त्यांना आलेला मजेदार अनुभव सांगितला. सरकारी शाळेत येणारी मुले ही गरीब घरातून आलेली असतात. त्यांचा विकास खऱ्या अर्थाने समाजाचा व देशाचा विकास आहे यासाठी शिक्षकाने अतिशय जबाबदारीने त्यांच्याबरोबर अध्यापन प्रक्रियेत समाविष्ट झाले पाहिजे; व त्यांना जीवनात उपयोगी पडतील असे अध्ययन अनुभव दिले पाहिजे असे त्यांनी नमूद केले. शिक्षणाच्या क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान येत आहे त्याचा अंगीकार शिक्षकांनी करायला हवा व आपल्या ज्ञानात नवनवीन बाबीची भर टाकावी असे त्यांनी सांगितले. परिषदेत उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे, तज्ज्ञांचे, शिक्षकांचे आभार श्रीमती बसंती रॉय यांनी मानले. ही परिषद यशस्वी करण्यासाठी दत्ता बाळसराफ, माधव सूर्यवंशी, विकास कांबळे, सुरेश पाटील, मीनल सावंत, रमेश मोरे आदींनी परिश्रम घेतले.

## पुस्तक परिचय - वाटचाल ई शिक्षणाची

आधुनिक काळात तंत्रज्ञानात झालेली प्रचंड प्रगती हे जागतिकीकरणाचे प्रमुख कारण आहे. ह्या प्रगतीमुळे आपले संपूर्ण सामाजिक जीवनसुद्धा ढवळून निघत आहे. नवनवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत. आज तंत्रज्ञान जीवनातील प्रत्येक अंग व्यापत आहे. तरीदेखील शिक्षण प्रणालीत तंत्रज्ञानाचा फार मोठा शिरकाव अगदी आतापर्यंत तरी झालेला नव्हता. आता शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल होण्यास सुरुवात झालेली आहे. वर्ष २०१२ मध्ये माहिती व दूरसंचार तंत्रज्ञानाच्या राष्ट्रीय धोरणानुसार आता शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आय.सी.टी.चा कमाल उपयोग करण्यावर भर देण्यात आलेला आहे. त्यातून भविष्यामध्ये राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेत आय.सी.टी. बद्दल समाजात जागरूकता आणून आय.सी.टी. साक्षर समाज घडवण्याचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होणार आहे. आय.सी.टी.च्या राष्ट्रीय धोरणाबाबत झालेल्या परिषदेच्या निमित्ताने या विषयावरील माहितीपर लेख व शालेय स्तरावरील उपक्रमांचे संकलन 'वाटचाल ई-शिक्षणाची' पुस्तकामध्ये वाचावयास मिळेल. याच संदर्भात जॉन ड्युई या शिक्षणतज्ज्ञाचे विचार उद्‌बोधक आहेत.

'काल शिकवित होतो तसंच आजही शिकवित राहिलो तर आपण आपल्या मुलांपासून त्यांचा भविष्यकाळ हिरावून घेऊ.'

# रंगस्वर सृजन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर सृजन विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करून त्याचे विद्यार्थी जीवन समृद्ध व्हावे याकरता सृजनचा हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे. सृजनची संकल्पना व संयोजन सौ. सुप्रिया सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंत जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहे.

सृजन २०१४ या सृजनच्या वार्षिक कार्यक्रमांची सांगता ७ डिसेंबर २०१४ मध्ये श्री. राजीव राणे यांच्या पार्टी कार्यक्रमाने झाली. मुलांचे विविध सांघिक खेळ, नृत्य गोष्टी आणि मिमिक्री अशा विविध मनोरंजनाचा कार्यक्रमाचा सहभाग होता.

२ नोव्हेंबर २०१४ राजी पैंजणांचे रुणूझुणू या नृत्याच्या कार्यशाळेत रोशनी पालांडे आणि सिद्धेश पालांडे यांनी मुलांना मॉब डान्स म्हणजे काय हे सांगितले. विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या नृत्यांच्या विविध लकबीची प्रात्यक्षिके दाखवून करून घेतल्या.

२१ ऑक्टोबर २०१४ रोजी श्रीमती रेखा दिवेकर यांनी आहार नियोजन या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत सकाळी शाळेत जाताना नाश्ता करून जाणे किती महत्वाचे आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. स्वच्छतेच्या बेसिक गोष्टी पाळणे आवश्यक आहे. निरोगी राहण्याकरीता पोषक आहाराची गरज आणि जंक फूड खाण्याचे होणारे शरीराची हानी याचा फरक समजवून सांगितला. निरोगी आणि सशक्त राहण्याकरीता जेवणाच्या वेळा, सकस आणि स्वच्छ आहार याबाबत मुलांची चार्चात्मक कार्यक्रमामधून माहिती दिली.

७ सप्टेंबर २०१४ रोजी 'सफर आवाजाची' या कार्यशाळेत आवाजाचे विविध प्रकारे कसे असतात. आवाजाची चढउतार कशी करावी. समोरच्या व्यक्तिशी संवाद साधताना आवाजाचा पातळीचा योग्य उपयोग कसा करावा हे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह दाखविले. सृजनच्या कार्यशाळेच्या प्रत्येक सत्रात १०० ते १५० च्या आसपास विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

## सृजन बाल चित्रपट महोत्सव

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या वतीने **'सृजन' बालचित्रपट महोत्सव** आयोजित करण्यात आला. आजवर शालेय मुलांसाठी प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रम आयोजित केले गेले आहेत. लहान मुलांच्या सृजनशीलतेला वाव मिळून अभिरुचीसंपन्न विद्यार्थी घडविण्याच्या दृष्टीने विविध विषयांवरील बालचित्रपट दाखवून विद्यार्थ्यांना रंजकतेतून विविध विषयांची अनुभूती देणे या भूमिकेतून सदर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

शालेय मुलांमध्ये पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त ज्ञान व कल्पकता ठासून भरलेली असते. मुलांमधील सृजनशीलतेला तंत्रज्ञान, माहिती, ज्ञान यांची जोड दिली तर निश्चितच भविष्यात अभिरुचीसंपन्न व्यक्ती घडू शकतो. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने आजवर अशा अनेक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचा कल जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. सदर उपक्रमातून विविध विषयांवरील बालचित्रपट विद्यार्थ्यांना दाखविणे व त्यातून भविष्यातील सृजनशील व्यक्ती घडविण्याचा प्रयत्न करणे ही आमची भूमिका आहे.

**आयोजनाचा तपशील**

- मंगळवार, दि. ९, बुधवार, दि. १० व गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०१४ असा तीन दिवसीय उपक्रम आयोजित करण्यात आला.
- शहरातील विविध भागांमधील वेगवेगळ्या सभागृहांमध्ये महोत्सव घेण्यात आला जेणेकरून

जास्तीतजास्त शाळा या उपक्रमात सहभागी होऊ शकल्या.

- रोज ५ दर्जेदार बालचित्रपट दाखविण्यात आले.
- प्रत्येक खेळासाठी शाळा व विद्यार्थी वेगळे होते.
- चित्रपट झाल्यावर प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना राजगिऱ्याचे लाडू व सृजन उपक्रमाचे माहितीपत्रक देण्यात आले.
- प्रत्येक चित्रपटाचा अवधी साधारण १ तास ३० मिनिटे एवढा होता. सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत महोत्सव घेण्यात आला.

**सहयोगी संस्था :**

- चिल्ड्रन फिल्म सोसायटी ऑफ इंडिया.
- नवमहाराष्ट्र युवा अभियान.
- महात्मा गांधी मिशन, औरंगाबाद.
- अभ्युदय फाउंडेशन, औरंगाबाद.

## महोत्सव

### दिवस पहिला

मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०१४ रोजी तीन दिवसीय सृजन बालचित्रपट महोत्सवाचे उद्घाटन तापडिया नाट्य मंदिर येथे सहभागी शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून व फिल्म क्लॅप करून करण्यात आले. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत, सुहास तेंडुलकर, क्लोव्हरडेल स्कूलच्या मीता कपूर, महात्मा गांधी मिशनच्या रेखा शेळके, सुबोध जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

'सृजन' महोत्सवात पहिल्या दिवशी सकाळी ९ ते १०.३० या वेळेत आ. कृ. वाघमारे, सरस्वती भुवन प्रशाला व रविंद्रनाथ टागोर विद्यालय या शाळांना 'द ब्लू अम्ब्रेला' हा विशाल भारद्वाज दिग्दर्शित रस्कीन बॉंड यांच्या कादंबरीवर आधारित चित्रपट दाखविण्यात आला. त्यानंतर सकाळी १०.३० ते १२ या वेळेत शारदा मंदिर विद्यालय, शिवाजी हायस्कूल, जि.प. कन्या प्रशाला, म.न.पा. प्रशाला नागेश्वरवाडी या शाळांना 'अप' हा वॉल्ट डिस्ने निर्मित पेट डॉक्टर दिग्दर्शित चित्रपट दाखविण्यात आला. त्यानंतर दुपारी दीड ते तीन या वेळेत बाल ज्ञान मंदिर, शारदा मंदिर कन्या प्रशाला या शाळेस 'जलपरी' हा निला माधब पांडा दिग्दर्शित स्त्रीभ्रूण हत्या विरोधी चित्रपट दाखविण्यात आला. दुपारी ३ ते ४.३० या वेळेत आ. कृ. वाघमारे, सरस्वती भुवन प्रशाला व मराठा हायस्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांना 'रॅटिट्यूली' हा ब्रॅड बर्ड दिग्दर्शित ॲनिमेटेड चित्रपट दाखविण्यात आला.

### दिवस दुसरा

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी बुधवार, दि, १० डिसेंबर २०१४ रोजी सहभागी शालेय विद्यार्थ्यांनी धम्माल केली. 'रिओ' या ॲनिमेटेड चित्रपटातील ब्लू या पोपटाने विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले. तसेच 'टॉय स्टोरी' या खेळण्यांवर आधारित चित्रपट पाहण्यात मुले दंग झाली होती. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

दुसऱ्या दिवशी भानुदासराव चव्हाण सभागृह येथे सकाळी ९ ते १०.३० या वेळेत जागृती प्राथमिक व माध्यमिक विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांना 'हाथी का अंडा' हा चिल्ड्रन फिल्म सोसायटी निर्मित चित्रपट दाखविण्यात आला. त्यानंतर सकाळी १०.३० ते १२ या वेळेत महात्मा फुले विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांना 'टॉय स्टोरी' हा वॉल्ट डिस्ने आणि पिक्सार निर्मित मुलांच्या खेळण्यांवर आधारित चित्रपट दाखविण्यात आला. त्यानंतर दुपारी १२.३० ते २ या वेळेत श्री गुरू तेगबहादूर इंग्लिश विद्यालय व देवगिरी ग्लोबल विद्यालय या शाळांना 'रिओ' हा ॲनिमेटेड सिनेमा दाखविण्यात आला. दुपारी ३ ते ४.३० या वेळेत भागिरथीबाई प्राथमिक विद्यालय व जागृती विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांना 'शार्क टेल' हा ॲनिमेटेड चित्रपट दाखविण्यात आला.

### दिवस तिसरा

महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी सहभागी शालेय विद्यार्थ्यांनी धम्माल केली. 'स्टॅनली का डिब्बा' मुलांनी

खूप एन्जॉय केला. आवडलेल्या प्रसंगावर मुलांनी भरभरून दाद तर दिलीच शिवाय भावनिक प्रसंगी डोळ्यांच्या कडा ओलावल्या. 'स्टॅनली' या अत्यंत भावनाप्रधान भूमिकेने विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले. 'द लायन किंग' या कार्टून चित्रपटातील 'सिंबा'ने उपस्थित विद्यार्थ्यांना खळखळून हसायला लावले. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत, सुहास तेंडुलकर, विजय कान्हेकर, सुबोध जाधव, महेश अचिंतलवार आदींची उपस्थिती होती.

महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी महात्मा गांधी मिशनच्या 'रुक्मिणी सभागृह' येथे सकाळी ९ ते ४.३० या वेळेत संपन्न झालेल्या महोत्सवात क्लोव्हरडेल इंग्लिश हायस्कूल, संस्कार विद्यालय, धर्मवीर संभाजी विद्यालय, जिजामाता हायस्कूल, तेरणा हायस्कूल, बळीराम पाटील हायस्कूल या शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना 'स्टॅनली का डब्बा', 'द लायन किंग', 'फाइंडिंग निमो' व 'आय यम कलाम' हे चित्रपट दाखविण्यात आले. प्रत्येक शाळेतील एक शिक्षक एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी प्रतिनीधी मंचावर बोलावून चित्रपटाच्या सुरुवातीलाच संयोजकांच्या वतीने त्यांना स्मृतिचिन्ह व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे वार्तापत्र देऊन सन्मान करण्यात आला. आपल्या शाळेसाठी स्मृतिचिन्ह भेट मिळाल्याचे पाहून विद्यार्थ्यांमध्ये हुरूप येत होता. प्रत्येक वेळी विद्यार्थी मोठ्या उत्साहात टाळ्यांच्या गजरात आनंद व्यक्त करत होते. अतिशय उत्साहात पार पडलेल्या या बालचित्रपट महोत्सवात शहरातील सुमारे ६,९०२ शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्र औरंगाबादचे सुबोध जाधव, दीपक जाधव, मंगेश निरंतर, महेश अचिंतलवार, श्रीकांत देशपांडे, त्रिशूल कुलकर्णी, राहूल तायडे, आर्या तेंडुलकर, समृद्धी कान्हेकर, प्रतीक राऊत, प्रथमेश सामंत, अमन राऊत, नीलेश निकम आदींनी परिश्रम घेतले.

## चित्रपट महोत्सवात सहभागी शाळा

| अ.क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| | **मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०१४** | |
| १. | श्री. शारदा मंदिर कन्या प्रशाला | ३३२ |
| २. | रविंद्रनाथ टागोर हायस्कूल | १५० |
| ३. | रविंद्र प्राथमिक शाळा | ३५० |
| ४. | शारदा मंदिर पूर्व माध्यमिक प्रशाला | ९५० |
| ५. | श्री सरस्वती भुवन प्रशाला | ३५० |
| ६. | मॉटेसरी बालक मंदीर | १५० |
| ७. | मॉटेसरी प्राथमिक विभाग | ३०० |
| ८. | शिवाजी हायस्कूल २५० | |
| ९. | मराठा हायस्कूल | २५० |
| १०. | जिल्हा परिषद कन्या प्रशाला | १०० |
| ११. | म.न.पा. नागेश्वरवाडी प्रशाला | ५० |
| | **बुधवार, दि. १० डिसेंबर २०१४** | |
| १२. | देवगिरी ग्लोबल अकादमी | २२० |
| १३. | महात्मा फुले हायस्कूल | २५० |
| १४. | जागृती प्राथमिक शाळा | ३५० |
| १५. | जागृती हायस्कूल | २०० |
| १६. | जागृती माध्यमिक शाळा | १५० |
| १७. | भागिरथीबाई प्राथमिक शाळा | ३०० |
| १८. | श्री गुरू तेगबहादूर हायस्कूल | २०० |
| | **गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०१४** | |
| १९. | क्लोव्हरडेल हायस्कूल | २०० |
| २०. | संस्कार विद्यालय | ३०० |
| २१. | एम.जी.एम. स्कूल | २०० |
| २२. | तेरणा हायस्कूल | २५० |
| २३. | जिजामाता कन्या विद्यालय | ३०० |
| २४. | धर्मवीर संभाजी विद्यालय | ४०० |
| २५. | बळीराम पाटील विद्यालय | ३५० |
| | **एकूण विद्यार्थी** | **६९०२** |

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान

## कार्यवृत्त

हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ या जगाला भेडसावणाऱ्या समस्या आहेत. पृथ्वीच्या वाढत्या तापमानावर सर्वात प्रभावी उपाय म्हणजे वृक्षसंवर्धन होय. एक वृक्ष प्रति वर्ष जवळ जवळ १० किलो. कार्बनडाय ऑक्साइड वायू शोषून घेतो. वातावरणात असह्य उष्णता निर्माण करणाऱ्या कार्बनडाय ऑक्साइड, नायट्रस ऑक्साइड आणि मिथेनसारख्या वायूंना आटोक्यात ठेवण्यासाठी जास्तीत जास्त जमीन वृक्षलागवडीखाली आणणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या मातीत वाढणाऱ्या आणि बदलत्या तापमानात टिकून राहतील अशा वनस्पतींची लागवड आणि संवर्धन मोठ्या प्रमाणात घडवून आणणे हे वाढत्या तापमानाला आवर घालण्याचे थेट उत्तर आहे. औषधी वनस्पतींचे आपल्या जीवनातील स्थान कालातीत आहे. या सर्व गोष्टींचा समग्र विचार करून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने यशवंत औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प राबविण्याचा संकल्प केला आहे. महाराष्ट्राचे भवितव्य घडविणारी विद्यार्थी पिढी निसर्गरम्य आणि निरोगी वातावरणात वाढावी हे या प्रकल्पाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

या उद्देशाने शैक्षणिक वर्ष जून २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीमध्ये शाळांच्या परिसरात सावली देणाऱ्या आणि औषधी गुणधर्म असणाऱ्या वनस्पतींची लागवड करण्यासाठी मुंबईतील १० व पुणे जिल्ह्यातील ४० शाळा निवडण्यात आल्या. त्यापैकी मुंबईतील १० शाळांमध्ये जागेची अडचण लक्षात घेऊन कुंड्यांमध्ये कोरफड, अडुळसा व तुळस यांची प्रत्येकी १० म्हणजे एकूण ३० रोपांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी या झाडांची नुसतीच काळजी घेतली नाही तर त्यापासून सर्दी खोकल्यावर उपयुक्त तुळस व अडुळशाचा काढा, पित्त व कफ नाशक कोरफडीचा रस यासारख्या विविध उत्पादनेही बनविली. पुण्यामधील शाळांमध्येही वृक्षारोपणाची कामे सुरू आहेत.

या व्यतिरिक्त जानेवारी महिन्यातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे दिनांक २४ जानेवारी २०१५ रोजी पार पडलेली हवामान बदल विषयक विद्यार्थ्यांची परिषद. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि स्वीडन येथील क्लायमेट ॲक्शन व सृष्टीज्ञान संस्था यांनी या परिषदेचे आयोजन केले होते. मुंबईतील नऊ शाळा, एम. डी. कॉलेज व स्वीडन येतील ग्लोबल कॉलेज यांनी जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१४ या कालावधीमध्ये हवामान बदल विषयक विविध उपक्रम राबविले. क्लायमेट ॲबॅसॅडर्स मुंबई-स्टॉकहोम नावाच्या या प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थ्यांनी बियाणांची बँक, ग्लोबल वीज व पाण्याचे ऑडिट, वृक्षारोपण, जैवविविधतेचा अभ्यास असे अनेक उपक्रम राबविले होते. त्याचा समारोप या परिषदेने झाला. त्याकरिता स्वीडन येथील ग्लोबल कॉलेजचे २० विद्यार्थी व दोन शिक्षकही उपस्थित होते. मा. खासदार सुप्रिया सुळे या परिषदेला प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. सर्वप्रथम प्राणी बनलेल्या विद्यार्थ्यांचा मोर्चा समोर आला व त्यांनी घटत चाललेल्या अधिवासांबद्दल तक्रार करून त्यांचे अस्तित्व सुरक्षित राखण्याचे निवेदन सुप्रिया सुळे यांना दिले. या परिषदेत विद्यार्थ्यांनी हवामान बदलाला उत्तर म्हणून मांडलेल्या प्रकल्प प्रदर्शनाचे उद्घाटन सुप्रियाताईंनी कले. त्यात त्यांना एम. डी. महाविद्यालयाचा हरिशचंद निशाद याचा खराब झालेल्या मोबाइल बॅटरीपासून बनविलेला दिवा व सरस्वती मंदिर हायस्कूलचा तन्मय कोळी याचा रस्त्यावरील वाहून जाणाऱ्या पावसाच्या पाण्याचे संचयन हे प्रकल्प विशेष आवडले.

सभागृहात आल्यावर स्वीडन येथील आयोजक संस्था क्लायमेट ॲक्शनच्या प्रतिनिधींनी परिषदेला शुभेच्छा पाठविलेला संदेश प्रसारीत करण्यात आला. त्यानंतर प्रकल्पात सहभागी शाळा, कॉलेज, विशेष उल्लेखनीय सहभाग असलेले शालेय विद्यार्थी, कॉलेजचे

विद्यार्थी, शिक्षक व प्रकल्पात सर्वोत्कृष्ट ठरलेल्या तीन शाळा यांना सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. अशी परिषद ही महाराष्ट्रातील सर्वच महत्त्वाच्या शहरांमध्ये व्हावी व हवामान बदल या समस्येवर उपाययोजना करण्यात महाराष्ट्र आघाडीवर राहावा ही अपेक्षा सुप्रिया सुळे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केल. या परिषदेत प्रकाशित करण्यात आलेले 'हवामान बदलास आमचे उत्तर' हे पुस्तक राज्यातील सर्व पक्षाच्या नेत्यांकडे पोचवले जावे असेही त्यांनी सुचविले.

त्यानंतर या परिषदेसाठी आमंत्रित केलेले खास वक्ते गिरीश राऊत व अभिजीत घोरपडे यांना भाषणासाठी बोलावण्यात आले. २६ जुलैच्या मुंबईतील जलप्रलयाच्या आधीपासून मिठी नदीच्या संरक्षणाबद्दल अत्यंत अभ्यासू आणि पोटतिडकीने मांडणी करणारे गिरीश राऊत खरे तर द्रष्टे पर्यावरणवादी म्हणावे लागतील. तर लोकसत्तामध्ये पर्यावरण विषयक भवताल हे दर लिहिणारे पत्रकार अभिजीत घोरपडे यांचे हवामान बदल आणि महाराष्ट्रातील पाणी प्रश्न हे विशेष अभ्यासाचे विषय आहेत. या दोघांनीही हवामान बदलाचे आव्हान या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात फिल्म शो, चित्रकला, फेस पेंटीग, फॅशन शो असे विविध उपक्रम एकाचवेळी सुरू होते. या सर्व कार्यक्रमाचा आकर्षण आणि उत्कर्षबिंदू ठरला तो पर्यावरणस्नेही पारंपरिक वेशभूषेमध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी सादर केलेला फॅशन शो. प्राणी बनलेले विद्यार्थी, नऊवारी, बंगाली, गुजराथी अशा विविध प्रकारच्या साड्या तसेच पंजाबी सुट, अनारकली घातलेल्या मुली, शेरवानी, धोतर, पायजमा-सदरा, जॅकेटस्, फेटे, गांधी टोप्या अशा वेशात असलेली मुले व त्यांच्याबरोबरीने उत्साहाने रॅम्पवर उतरलेले शिक्षक आणि ग्लोबल कॉलेजचे विद्यार्थी यांनी शेवटची १५ मिनिटे अक्षरश: भारून टाकली होती.

समारोपाच्या कार्यक्रमाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कोषाध्यक्ष, आमदार हेमंत टकले हे पाहुणे म्हणून लाभले होते. त्यांनी केलेल्या भाषणात पर्यावरण या विषयामध्ये स्वीडन देशाने घेतलेला पुढाकार, त्यांच्या रस्त्यांवर राखीव असलेले सायकल ट्रॅक, कचरा व्यवस्थापन, सर्व सामान्य लोकांमध्ये असलेली पर्यावरणाबद्दलची आस्था व त्यांची पर्यावरणस्नेही जीवनशैली याबद्दल बोलले. यापासून आपल्या विद्यार्थ्यांना शिकण्यासारखे बरेच आहे असल्याने भारतीय विद्यार्थ्यांना त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली याबद्दल अभिनंदन केले व स्वीडनला प्रत्यक्ष जाण्याची संधी मिळावी अशा शुभेच्छा दिल्या.

परिषदेच्या आयोजनामध्ये वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियानचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच पुणे येथील श्रीम. सायली जगताप व श्री. प्रवीण देशमुख यांचेही सहकार्य लाभले. परिषद यशस्वी करण्याकरिता श्री. प्रशांत शिंदे, श्री. कुणाल अणेराव, श्रीमती ज्योती खोपकर व श्रीमती संगीता खरात यांनी विशेष परिश्रम घेतले.

## हवामान बदलास आमचे उत्तर

हवामान बदल रोखण्यासाठी केवळ विद्यार्थीच नव्हे तर समाजातील सर्वच नागरिक, संस्था आणि शासनाला आपापल्या पातळीवर पर्यावरणपूरक बदल आणावे लागणार आहेत. शहर असो की गाव किंवा बाई असो की राव, सर्वांनाच आपापल्या जीवनपद्धतीला पर्यावरणस्नेही बनवून हवामान बदल रोखण्याचे प्रयत्न करावे लागणार आहेत. यासाठी मार्गदर्शक ठरेल अशा विविध उपक्रमांचे अत्यंत उपयुक्त संकलन या प्रकल्पाच्या निमित्ताने झाले आहे. हे संकलन पुस्तकाच्या रूपात प्रतिष्ठान आणि सृष्टीज्ञान संस्थेने आपल्यासमोर आणले आहे. हवामान बदल रोखण्यासाठी या पुस्तकाचा नक्की उपयोग होईल असा विश्वास आहे!

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम

## कार्यवृत्त

समाजातील गोरगरीब, दीनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरून शासकीय संसदेने १९८७ मध्ये विधि सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

१९८७ च्या विधि सेवा प्राधिकरण अधिनियमात अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारची कामे केली जातात :-

- समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.
- प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करून गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
- कांही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
- पक्षकारांच्या तंट्यांमध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.
- विधि विषयामध्ये संशोधन करून प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारूप तयार करून वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
- कायद्यांची विशेष माहिती करून देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.
- सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करून देण्यासाठी राज्याच्या वेगवेगळया ठिकाणी वेळोवेळी विधि साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.
- संबंधित न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या सहकार्याने लोकन्यायालयाचे आयोजन करणे.
- विधि शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मॉक कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.

त्यानुसार गेल्या पाच महिन्यांत म्हणजेच १ सप्टेंबर २०१४ ते ३१ जानेवारी २०१५ या अवधीमध्ये फोरमकडून करण्यात आलेल्या कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**फोरमच्या बैठका :-**

कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अमलबजावणीबाबत विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. त्यानुसार गेल्या पाच महिन्यांमध्ये एकूण पाच बैठका झाल्या. सरासरी १२ सदस्य प्रत्येक बैठकीला उपस्थित होते. एकूण ९१ बाबीसंबंधी निर्णय घेण्यात आले. तसेच या बैठकांची एकूण उपस्थिती ६१ इतकी होती.

**उपसमितीच्या बैठका :-**

एखाद्या विषयांसंबंधी सखोल अभ्यास करून प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी फोरमच्या वेगवेगळ्या उपसमित्या नेमल्या जातात व आवश्यकतेनुसार त्यांच्या बैठका घेतल्या जातात. दिनांक १९ सप्टेंबर २०१४ रोजी ज्येष्ठ नागरिकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्याबाबत विचार करण्यासाठी कुलाबा ते माहिम या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक बी.एम.सी. वेल्फेअर असोसिएशन, दादर येथे संपन्न झाली. ३५ प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्री. विजय औंधे हे होते.

**कायदेविषयक सल्ला केंद्र :-**

गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजता चव्हाण केंद्राच्या दुसऱ्या मजल्यावर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या पाच महिन्यांमध्ये या केंद्राच्या २० बैठका झाल्या. अंदाजे ४० लोकांनी या केंद्रामध्ये येऊन मोफत सल्ल्याचा लाभ घेतला आहे. या केंद्राचे काम सर्वश्री म. बा. पवार, भूपेश सामंत व निलेश पावसकर इत्यादी वकिलांनी पाहिले.

**मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र :-**

दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत समुपदेशन व तडजोड केंद्राचे आयोजन करण्यात येते.

आपल्या कायद्याची माहिती करून घ्या (know your Law Lecture Series) :-

या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदेपंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

**विधि साक्षरता कार्यशाळा :-**

लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्यांची माहिती करून देण्यासाठी विविध प्रकारच्या विधि साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधि साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या पाच महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये खालील कार्यक्रमांचा समावेश आहे.

फोरम व मैत्री संस्था, करी रोड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी संकल्प प्रतिष्ठान सभागृह, महाराष्ट्र हायस्कूल मैदान, करी रोड, मुंबई येथे रविवार दिनांक १४ सप्टेंबर २०१४ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) एका विधि साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

फोरम व नवी मुंबई पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २१ सप्टेंबर २०१४ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) झोन दोन, नवी मुंबई येथे पोलिसांसाठी एका विधि साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त पोलीस कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. श्री. ऐनपुरे हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

फोरम व राष्ट्रपिता महात्मा गांधी प्रतिष्ठान, बदलापूर (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ३० नोव्हेंबर २०१४ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) बदलापूर येथे महिला व पुरुषांसाठी एका विधि साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त पुरुष व महिला कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

फोरम व पोलीस उपायुक्त, कळंबोली, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १३ डिसेंबर २०१४ रोजी पोलीस ट्रेनिंग सभागृह, पोलीस मुख्यालय, कळंबोली, नवी मुंबई येथे पोलीसांसाठी एका विधि साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त पोलीस (स्त्री व पुरुष) उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. श्री. महेश तरडे हे समारंभांच्या अध्यक्षस्थानी होते.

फोरम व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली, डोंबिवली (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २८ डिसेंबर २०१४ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) ज्येष्ठ नागरिकांसाठी एका विधि साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. श्री. तेजपाल सिंग हे समारंभाच्या अध्यक्ष होते.

फोरम व प्रज्ञा विकास संस्था, बदलापूर (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ११ जानेवारी २०१५ रोजी आदर्श महाविद्यालय, बदलापूर (पूर्व) येथे महिला व पुरुषांसाठी एका विधि साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त पुरुष व महिला कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. न्यायमूर्ती गुलाबराव माने हे समारंभाचे अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

फोरम व ओरिएंटल विधि महाविद्यालय, सानपाडा (पश्चिम), नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १८ जानेवारी २०१५ रोजी ओरिएंटल विधि महाविद्यालय, सानपाडा (पश्चिम), नवी मुंबई येथे विधि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एका विधि साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. न्यायमूर्ती जे. एन. पटेल हे प्रमुख पाहुणे होते. श्री. जावेद खान हे अध्यक्ष होते.

**शपथ कार्यक्रम :-**

सर्व विधि साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकाचे सांघिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मूलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेण्यात येतात. वरील सर्व कार्यक्रमांमध्ये हे सर्व काम करण्यात आले व शपथा घेण्यात आल्या.

**कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे :-**

विधि साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती वरून देण्यात येते त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश असतो.

(१) भारतीय संविधान, (२) विधि सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६० (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छापत्र कायदा, (८) गुंतवणुकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकीहक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बालविवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal

opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, १९९५ (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, १९५६ (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधि (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५० व (५३) कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१४.

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी उपक्रम, कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना पवार व मनिषा खिल्लारे यांचे सहकार्य असते.

### सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण

मुंबईमध्ये २० ते ४० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थाचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहीत असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे २०१० सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईमध्ये 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' दिले जाते. या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, मा. प्रशांत कानविंदे, ॲड. प्रमोद कुमार, मा. देवयानी गोरे, मा. विजय सामंत व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ/अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करू शकतात व आपल्या स्वत:च्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करू शकतात. तसेच सामाजिक ज्ञान/भान याची जाणीव होते. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षांच्या व ४०० च्या वर प्रशिक्षणार्थिंनी हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. या संदर्भात वेळोवेळी विनामूल्य व्याख्याने आयोजित केली जातात त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| क्र. | दिनांक | तपशिल | वक्ते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १. | १० सप्टेंबर २०१४ | विनामूल्य व्याख्यान | मा. प्रभाकर चुरी विजय सामंत | प्रास्तविक व्याख्यान-भाग प्रभाणपत्र, नाम निर्देशन, गाळा हस्तातंरण | १०० |
| २. | १२ सप्टेंबर २०१४ | विनामूल्य व्याख्यान | मा. चंद्रशेखर प्रभू | जुन्या इमारतींचा पुनर्विकास | ८२ |
| ३. | ११ सप्टेंबर २०१४ ते ३१ सप्टेंबर २०१४ | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र १२ | | | २२ |
| ४. | ९ सप्टेंबर २०१४ ते ११ सप्टेंबर २०१४ | ३ दिवसीय विनामूल्य व्याख्यानमाला | मा. चंद्रशेखर प्रभू | जुन्या इमारतींचा पुनर्विकास | २७५ |
| ५. | २७ जानेवारी २०१५ ते २ मार्च २०१५ | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र. १३ | | | |

सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र. १२ चा प्रमाणपत्र वितरण सोहळा दिनांक १४ नोव्हेंबर २०१४ रोजी झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष निवृत्त सनदी अधिकारी मा. यशवंत राजवाडे यांच्या हस्ते सर्व यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र व पहिल्या चार क्रमांकांना रोख बक्षीस देण्यात आले.

**हस्ताक्षरशास्त्र कार्यशाळा**

हस्ताक्षरावरून माणसाचा स्वभाव जाणून घेणे शक्य आहे का? Graphology - हस्ताक्षरशास्त्राच्या साह्याने हे सहजसाध्य होऊ शकते. माणसाच्या स्वभावाचा प्रत्येक पैलू उलगडून दाखवण्याची क्षमता ह्या शास्त्रात असल्याचे म्हटले जाते. तुमच्या मनाच्या गाभाऱ्यात लपलेल्या अनेक गोष्टी उलगडून तुमच्या स्वभावाचे कंगोरे आणि क्षमता जाणून घेण्याचा प्रयत्न या शास्त्राद्वारे केला जातो. दिनांक २६ सप्टेंबर २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, महाराष्ट्र महिला व्यासपीठ व इन्स्टिट्यूट ऑफ ग्राफोलॉजिकल रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने हस्ताक्षरशास्त्र या विषयावर विनामूल्य व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मा. अनल पंडित यांचे मार्गदर्शन लाभले. ६५ ते ७० लोकांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. लोकांच्या खास आग्रहास्तव दि. ८ नोव्हेंबर १४ ते २० डिसेंबर १४ या कालावधीत सात दिवसांचे प्रति दिन सात तास असे प्रशिक्षण घेतले. १२ प्रशिक्षणार्थींनींचा यात सहभाग होता.

**कीर्तन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, पुरस्कृत महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि रंगस्वर आयोजित सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर २०१४, रोजी सायं ६ वाजता रंगस्वर सभागृह, ४था मजला येथे युवा पिढीच्या प्रसिद्ध कीर्तनकार प्राची व्यास यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. गतिमान कालप्रवाहात स्त्रीशक्तीच्या कार्यकर्तृत्त्वाचे ठसे उमटवणारी, स्वतंत्र - सत्य - समर्थ जीवन जगणारी सीता, म्हणजेच जानकीची कथा कीर्तनातून त्यांनी मांडली. अनेक रसिकांनी या कीर्तनाचा लाभ घेतला.

**जनजागृती कार्यक्रम**

दिनांक १८ डिसेंबर २०१४ रोजी संध्याकाळी ४.३० वा. रमाबाई कॉलनी, घाटकोपर या ठिकाणी महिलांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. 'आहारातून कुटुंबाचे आरोग्य' या विषयावर हे प्रशिक्षण देण्यात आले. 'प्र. निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होम सायन्स'च्या प्राध्यापिका मा. वीणा यार्दी ह्या प्रशिक्षक म्हणून लाभल्या. २२ ते २५ महिलांनी याचा लाभ घेतला.

**बोन्साय**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत, महाराष्ट्र महिला व्यासपीठ व बोन्साय स्टडी ग्रुप ऑफ द इंडो-जापनीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती ज्योती पारेख यांचे शनिवार दिनांक ३१.१.२०१५ रोजी दुपारी ३ ते ४.३० या वेळेत बोन्साय या विषयावर विनामूल्य व्याख्यान आयोजित करण्यात आले. ६० ते ६५ लोकांची या विनामूल्य व्याख्यानाला उपस्थिती होती. लोकांच्या खास आग्रहास्तव पाच दिवसीय प्रशिक्षण मार्च महिन्यात आयोजित केले आहे.

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
## कार्यवृत्त

**ग्रंथालय : राष्ट्र विकासातील समृद्ध वाटचाल**

**प्रस्तावना :**

मानवाच्या विकास यात्रेविषयी नोबेल पुरस्कार विजेते जोसेफ स्टिगलीटंज यांचे 'क्रिएटिंग ए लर्निंग सोसायटी' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यात त्यांनी म्हटले की 'कोणत्याही देशाचा विकास हा त्यामध्ये भांडवली गुंतवणूक किती प्रमाणात होते यावर आवलंबून नसून त्या देशातील लोकांची, समाजाची शिकण्याची आणि ज्ञान घेण्याची किती जिज्ञासा आहे, क्षमता आहे आणि ती कशी आहे यावर अवलंबून असतो. तंत्रज्ञान, शोध आणि माहिती आधारित अर्थव्यवस्था निर्माण होत असून त्यामध्ये ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका घेऊन राष्ट्र विकासाची समृद्ध वाटचाल तयार करू शकते. भारत हे वाचनसंस्कृती आणि साहित्यपरंपरा लाभलेलं राष्ट्र आहे. राष्ट्र विकासातील समृद्ध वाटचालीत ग्रंथालय महत्वपूर्ण सहयोग देत आहेत. राष्ट्राच्या शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक व वैज्ञानिक अशा सर्वच क्षेत्रात ग्रंथालय समृद्ध होत आहेत. ग्रंथालयाचे राष्ट्र विकासातील महत्त्व सिद्ध करून लोकांना ग्रंथालयाकडे आदर्श, सृजनात्मक, सुसंस्कृत समाजाचा आधारस्तंभ म्हणून पाहायला लावणे हा या संशोधनाचा उद्देश असा आहे. ग्रंथालयातील अत्यावशक, नवीन आणि उपयुक्त विषयावर संशोधन करून त्याचे राष्ट्र विकासाच्या समृद्ध वाटचालीतील महत्त्व सांगून ग्रंथालयाचा राष्ट्र विकासातील सहभाग वाढवणे हे या संशोधनाचे वैशिष्ट्य आहे. ग्रंथालय आणि अन्य क्षेत्रातील वाचक, अभ्यासक, संशोधक व विद्यार्थी यांना हे संशोधन निश्चितच उपयुक्त ठरेल.

राष्ट्रीय ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय, विशेष ग्रंथालय, शैक्षणिक संशोधन ग्रंथालय, डिजिटल ग्रंथालय आणि ग्रंथालयीन माहिती केंद्र अशा विविध प्रकारचे ग्रंथालय आपल्या ग्रंथालयीन सेवा देऊन राष्ट्र विकासाला सहकार्य करतात. हे लक्षात घेऊन भारत शासनाने माहिती राष्ट्रीय धोरण स्वीकारले आणि राष्ट्रीय ज्ञान आयोग स्थापन केला. 'ग्रंथालय: राष्ट्र विकासातील समृद्ध वाटचाल एक अभ्यास' या संशोधनात आपल्याला खालील अभ्यास विषयावर उत्तम असे संशोधन करून ग्रंथालयाचे राष्ट्र विकासातील महत्व सिद्ध करता येईल.

१. राष्ट्रीय ग्रंथालय : राष्ट्र विकासात योगदान
२. सार्वजनिक ग्रंथालय :
   राष्ट्र विकासाचा आधारस्तंभ
३. शैक्षणिक ग्रंथालय :
   राष्ट्राच्या शैक्षणिक विकासाचा मानदंड
४. संशोधन ग्रंथालय :
   संशोधन विकासाच्या कार्याचा दीपस्तंभ
५. विशेष ग्रंथालय :
   समद्ध राष्ट्राची विशेष ओळख
६. डिजिटल ग्रंथालय :
   राष्ट्र विकासातील एक नवे क्षितिज
७. ग्रंथालय माहिती केंद्र :
   राष्ट्र विकासावर होणारा प्रभाव
८. ग्रंथालय संकल्पना :
   राष्ट्र विकासाचे गतिमान साधन
९. भारतीय माहिती धोरण :
   राष्ट्र विकासाचे नियोजन
१०. राष्ट्रीय ज्ञान आयोग :
   राष्ट्र विकासासाठी ज्ञानमय राष्ट्र
११. डिजिटल भारत :
   ज्ञानाधिष्ठित सामाजिक आणि आर्थिक क्रांती.

आजची अर्थव्यवस्था ज्ञानाधिष्ठित होत आहे. आज राष्ट्राची सर्व शासकीय व्यवस्था ही ज्ञानकेंद्रीत होत आहे. माहिती आणि तंत्रज्ञानात अग्रेसर राष्ट्र आज विकसित होत आहेत. त्यामुळे आपल्याला ज्ञाननिर्मितीची, संकलन आणि प्रसारांची केंद्रे असलेली

ग्रंथालये समृद्ध करून राष्ट्र विकासाला चालना द्यावी लागेल. तरच एक सुसंस्कृत, सुजाण, सर्जनशील, स्नेहमय राष्ट्र विकसित होईल.

ग्रंथालयातील माहिती व ज्ञान संग्रहण स्रोत अथवा वाचन साहित्य हे इलेक्ट्रॉनिक अथवा डिजिटल स्वरूपात असल्यास अशा ग्रंथालयांना इलेक्ट्रॉनिक ग्रंथालये म्हणून ओळखले जाते. अशा ग्रंथालयांकरिता पुढील संज्ञांचा वापर केला जातो.

इलेक्ट्रॉनिक ग्रंथालये

पेपरलेस ग्रंथालये

आभासी ग्रंथालये (व्हर्च्युअल ग्रंथालये)

ऑनलाइन ग्रंथालये

या ग्रंथालयातील वाचन साहित्याचे स्वरूप हे अस्पर्शी असते व ते केवळ पाहता येत नाही. प्रत्यक्ष हाताळता येत नाही. याचाच अर्थ यातील मजकूर वाचण्यासाठी तांत्रिक साधनांची आवश्यकता असते. अशा ग्रंथालयातील वाचन साहित्याचे स्वरूप पुढील स्वरूपाचे असते.

ई-वृत्तपत्रे

ई- जर्नल्स व नियतकालिके

ई-बुक्स

ऑनलाइन डाटा बेसिस

सीडी रॉमस्

**इंटरनेट सेवा :**

इंटरनेट म्हणजे जगातील लाखो संगणकांनी मिळून तयार झालेले जाळे होय. इंटरनेटद्वारे जगातून कोणतीही माहिती प्रसारित करता येते व माहितीचा शोध घेता येतो. यातील हायपर लिंकमुळे माहितीही योग्य वाचकांचा शोध घेत असते. इंटरनेटच्या साहाय्याने अनेक माहितीस्रोत मिळविता येतात. जे मुक्त स्वरूपातही उपलब्ध होतात. ह्याच्या साहाय्याने माहितीचा शोध, संग्रह व प्रसारण याबाबतचा नवीन मार्ग निर्माण झाला. इंटरनेटवर अनेक मुक्त स्वरूपातील साधने व सेवा उपलब्ध असल्यामुळे आणि याकरिता कोणत्याही प्रकारचे ग्रंथालय सदस्यांची गरज उरली नाही.

**न्यूजपेपर क्लिपिंग सेवा:**

इंटरनेटवर प्रकाशित झालेली वृत्तपत्रे पाहता, वाचता येतात. मात्र यासाठी संबंधित वृत्तपत्रांचा वेब, पत्ता माहीत असणे आवश्यक आहे. वृत्तपत्राच्या होमपेजवर मुख्य घटक देतात. मुख्य किंवा ठळक घटनेवर कर्सर गेला असता त्याचे हाताच्या आकारात रूपांतर होते. म्हणजेच आपण हायपर लिंकद्वारे वृत्तपत्रातील पुढील माहितीशी जोडले जातो. ग्रंथपालांना वृत्तपत्रांतील संबंधित माहितीची निवड संग्रहण आणि इंडेक्सिंग ही पारंपरिक कार्ये इंटरनेटच्या साहाय्यानेही करता येतात.

निवड : वृत्तपत्रातील जी माहिती सदर सेवे-करिता हवी आहे ती संबंधित माहिती ग्रंथपालाने निवडावयास हवी.

स्कॅनिंग व साठवण : निवडलेली संबंधित माहिती स्कॅनिंग करून विशिष्ट स्वरूपात वृत्तपत्राचे नाव, प्रकाशनाची अधिक माहिती यासह फाईलमध्ये संग्रहित करावयास हवी.

ऑनलाइन शोध आणि साठवण : ऑनलाइन स्वरूपात प्रकाशित झालेल्या वृत्तपत्रातील संबंधित माहिती शोधून ती विशिष्ट सॉफ्टवेअरच्या मदतीने संग्रहित करावयास हवी. ग्रंथपालांना उपलब्ध असलेला हा एक महत्त्वपूर्ण मार्ग होय.

शोध आणि प्रसारण - न्यूजपेपर क्लिपिंग सेवांचे सुयोग्य व्यवस्थापन केल्यानंतर त्यांचा शोध हा वृत्तपत्रांची नावे शीर्षक, लेखक, प्रकाशन व तारखेनुसार घेता येतो.

**विशेष ग्रंथसंग्रहाचे डिजिटायझेशन:**

ग्रंथालयात ऐतिहासिक महत्त्व असणारी अनेक ज्ञानस्रोत साधने असतात. त्यांना मुख्यत: संशोधनात्मक मूल्य असते. अशी साधने ही दुर्मीळ आणि अत्यल्प स्वरूपात असल्याने ती संशोधकांना मुक्त स्वरूपात वापरता येत नाहीत व ग्रंथालयाबाहेरही देता येत नाहीत. अशा साधनांचा कागद ठिसूळ बनल्याने प्रतिलिपीही करता येत नाही पण अशा साधनांचा वापर

वाढविण्यासाठी आणि मूळ प्रतिचे आहे त्या स्वरूपात जतन करण्यासाठी अशा साधनांचे डिजिटायझेशन करणे हा योग्य व उपयुक्त मार्ग होय. अशा साधनांमध्ये फोटोग्राफ, नकाशे, चित्रे, छायाचित्रे, प्रबंध यांचा समावेश होतो.

**इलेक्ट्रॉनिक संदर्भ सेवा:**

डॉ. रंगनाथन यांच्या मते ज्या कार्याद्वारे वाचकांला माहिती शोधण्यासाठी आणि अभ्यास व संशोधनासाठी ग्रंथालयातील साहित्यांचा उपयोग करण्यासाठी वैयक्तिक साह्य केले जाते ते म्हणजे संदर्भ सेवा, ऑनलाइन संदर्भ सेवांमध्ये फोनद्वारे चौकशी, ऑनलाईन चौकशी सेवा, ई. मेल, चॅट बेसेस व्हर्च्युअल रेफरन्स सेवा यासारख्या सेवांचा समावेश होतो.

**इंटर लायब्ररी लोन सेवा:**

वाचकांच्या प्रचंड गरजांचे स्वरूप पाहता त्यांचा सर्व प्रकारच्या गरजा पूर्ण करण्यासाठीचे सर्वच आवश्यक संदर्भ व इतर प्रकारचे साहित्य प्रत्येक ग्रंथालयाकडे असेलच असे नाही. अशा वेळी संबंधित साहित्य ज्या ग्रंथालयाकडे असेल तेथून ते उपलब्ध करून देणे म्हणजेच दोन ग्रंथालयामधील ही देवघेव आंतर ग्रंथालयीन देवघेव (इंटर लयब्ररी लोन) म्हणून ओळखली जाते.

**इलेक्ट्रॉनिक डॉक्युमेंट डिलिव्हरी सर्व्हिस :**

इलेक्ट्रॉनिक डॉक्युमेंट डिलिव्हरी सर्व्हिस हे ग्रंथालय देवघेवीसाठी उपयुक्त साधन म्हणून उदयास येत आहे. यामध्ये सध्यातरी मुद्रित स्वरूपातील माहिती ही फॅक्समध्ये रूपांतरित करून पाठविली जाते. यापुढील काळ हा डिजिटल ग्रंथालयांचा काळ असल्याने ग्रंथालयातील सर्व साहित्य नसले तरी बराचसा भाग हा डिजिटल स्वरूपात असणार आहे.

**ओपॅक**

ओपॅक म्हणजे पारंपरिक तालिकेचे संगणकीय स्वरूप होय. ओपॅक हा ऑनलाइन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग असून त्यांच्या सहाय्याने ग्रंथसूचीय माहिती अधिक सक्षमतेने मिळविणे शक्य झाले आहे. ओपॅकमुळे ग्रंथ व्यवहारात आमूलाग्र बदल झालेले आहेत. ओपॅकमुळे ग्रंथालयातील माहितीची उपलब्धता सहज शक्य झाली आहे आणि यामुळे ग्रंथालयाने त्यांच्या भौतिक मर्यादा पार केलेल्या आहेत.

**Digital Library Access**

http://wwww/new1/dli.ernet.in/

http://www.infolibrarian.com/dlib.html

http://www.sanskrit.nic.in/digitalbook/index.htm

http://doaj.org/

**यशवंतराव चव्हाण : लर्निंग रिर्सोस सेंटर (ग्रंथालय)**

सर्वसाधारणपणे ग्रंथालयाचे संगणकीकरण म्हणजेच आधुनिकीकरण अशी समजूत असते. ग्रंथालयाचे संगणकीकरण ही त्या दिशेने होणाऱ्या प्रगतीचा टप्पा निश्चितच आहे, ग्रंथालय संगणकीकरणापुढे ग्रंथालयाच्या काही प्रगतीचे मुद्देच उरत नाहीत हे मात्र खरे नाही. हे आज पाश्चिमात्य देशातील ग्रंथालयांनी दाखवून दिलेले आहे. आपल्यासारख्या विकसनशील देशामध्ये अजूनही ग्रंथालये संगणकीकरणाचा टप्पा गाठण्यापलीकडे काहीही विचार करत नाहीत किंवा त्यापुढील प्रगती अगदी कमी वेगाने होत आहे.

ग्रंथालयाचे सर्वकष संगणकीकरण, ग्रंथालय नेटवर्क स्थापने, ग्रंथालय संकेतस्थळाची निर्मिती करणे, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल ग्रंथालय अस्तित्वात आणणे व वाचकांना अत्याधुनिक सेवा पुरविणे या गोष्टी ग्रंथालय व्यवस्थापनात अपेक्षित आहेत.

**ग्रंथालयाविषयी माहिती:**

गेल्या वीस वर्षात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जी झेप घेतली आहे, या क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. सध्याचे युग हे माहिती-तंत्रज्ञानाचे युग असून या तंत्रज्ञानाचा विकास झपाट्याने होत आहे. ग्रंथालय व माहिती केंद्रे हे माहिती तंत्रज्ञानाचे जवळचे क्षेत्र असल्याने जास्तीत जास्त प्रगत माहिती-तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रात होत आहे. सध्या सर्वत्र ग्रंथालये व माहिती

केंद्रे स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर स्थापन झाली आहेत आणि ती ज्ञानप्रसाराच्या क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावत आहेत. ग्रंथालयामधून संदर्भ ग्रंथ, ग्रंथ पुस्तिका, नियतकालिके आणि इतर वाचन साहित्य विषयाप्रमाणे व्यवस्थित ठेवलेले असते. विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान युगात ग्रंथालयातून एखाद्या विषयावर विद्यार्थी विद्वान व संशोधक यांना स्थुल अथवा सूक्ष्म माहिती सेवा ग्रंथालयांना द्यावी लागते. ग्रंथालयांना माहिती जमवणे, तिचे प्रसारण व परिचलन करणे, प्रदर्शन करणे ती माहिती सुरक्षित ठेवणे आणि प्रतिप्राप्ती करणे ही कामे करावी लागतात.

ऑटोमेशन आणि ग्रंथालयातील जाळे (नेटवर्क) यांनी ग्रंथालयातील साधन संपत्तीच्या देवघेवीला नवी दिशा दिली आहे, या अनुषंगाने वाचकांना माहिती सेवेकरीता आपल्या ग्रंथालयांनी विविध ग्रंथालयीन नेटवर्कच्या सुविधा पैकी डेलनेटची (डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क) सुविधा देण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादी विषयांवरील पुस्तके, चरित्रे व आत्मचरित्रे, धर्मकोष, विश्वकोष, मराठी विश्वकोष, गॅझेटियर ॲटलॉस इअर बुक, डिक्शनरीज इत्यादी संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. तसेच वेळोवेळी संबंधित विषयाला अनुसरून नवीन पुस्तके ग्रंथालयासाठी घेण्यात येतात. ग्रंथालयामध्ये एकदंरीत २२,६९२ आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचकांना सहज उपलब्ध व्हवी याकरीता ओपॅक, कॅटलॉग सुरू केला आहे. यामध्ये लेखक, ग्रंथनाम, प्रकाशन, विषय, वर्गांक या संज्ञेच्या सहाय्याने वाचकांना माहिती मिळविता येते आणि पाहिजे त्या ग्रंथाचा शोध घेता येतो.

(डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क) सुविधा देण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

**ग्रंथालयाचे नियम:**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वत:च्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरून त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहे.

**अ) सर्वसाधारण सभासद :**

सर्वसाधारण सभासदाकरिता रु. २५०/- वार्षिक वर्गणी तसेच रु. २५०/- अनामत रक्कम (१९९६ पासून)

**ब) विद्यार्थी सभासद:**

महाविद्यालयीन/ उच्चशिक्षण/ संशोधक विद्यार्थ्यांकरिता वार्षिक रु. ५०/- नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु. १००/- (दि. १.८.०८ पासून)

**क)** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता काही विद्यार्थी एक आठवडा, एक महिना या कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्यांकडून रु. ५०/- एका आठवड्याला व एक महिन्याला फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डवर त्यांची वैयक्तिक माहिती भरून घेण्यात येते.

**ड)** माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरिता ग्रंथालय वेगळी फी आकारत नाही.

**इ-१) संयुक्त संस्था सभासदत्व**

कार्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. एकावेळची वर्गणी रु. ५०,०००/-, ५ वर्षासाठी.

**अनामत रक्कम :** सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मीळ व किमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल.

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके :** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

**इ-२) संस्था सभासदत्व**

यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी आय. सी. एस. एस. आर., आय. सी. सी.

आर. किंवा आय. सी. एच. आय. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभासदत्वासाठी :**

प्रवेश फी रु. १,०००/- ना परतावा

**वार्षिक वर्गणी :**

रु. ५,०००/-

**दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद :**

एकावेळी ५ वर्षांसाठी वर्गणी रु. २०,०००/-

**एकावेळी देण्यात येणारी पुस्तके :**

एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील.

इ-१ व इ-२ येथील सभासदत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्या वतीने पुस्तके घेण्यास/परत करण्यास नामनिर्देशित करू शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे यांची जबाबदारी संस्था प्रमुखांची असेल.

वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

**सर्वसाधारण सभासद :** सभासदांना एकावेळी एक पुस्तक/ ग्रंथ देण्यात येईल ते आठ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रकमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किमतीएवढी अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येईल.

महविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही.

**ग्रंथालयाच्या वेळा व सुट्ट्या :** सकाळी ११.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत ग्रंथालय वाचकांकरिता तसेच पुस्तके परत करणे/ नवीन घेणे यासाठी उघडे राहील. तसेच ऑगस्ट २०११ पासून दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय सुरू ठेवण्यात आले आहे.

सभासदाचे कार्ड हरविल्यास त्यांना पुस्तक/ग्रंथ देण्यात येणार नाही. सभासदत्व नियमित ठेवण्याकरिता, सभासदाने स्वत:च्या हस्ताक्षरात साध्या कागदावर अर्ज करून ग्रंथालयास सादर करावा, त्यानंतर कार्डाची दुसरी प्रत देण्याचा विचार केला जाईल.

सभासदांकडून ग्रंथ हरविल्यास त्यांनी १५ दिवसांत त्यांनी नवीन खरेदी करून द्यावा लागेल किंवा त्या ग्रंथाची अद्यावत रक्कम मूल्याइतकी रक्कम अनामत रकमेमधून वळती करण्यात येईल व गरज पडल्यास अधिकची रक्कम सभासदास भरावी लागेल. अनामत रक्कमेतून रक्कम भरणे अनिवार्य राहील.

सभासदांनी घरी नेलेले पुस्तक खराब केल्यास/वाचण्याच्या स्थितीत नसल्या वा पाने फाटलली आढळल्यास सभासदांनी वरीलप्रमाणे नवी पुस्तक आणून देणे किंवा रक्कम भरणे अनिवार्य राहील.

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

## वार्तापत्र

१) फेब्रुवारी २०१४ ते ऑगस्ट २०१५ दरम्यान झालेल्या प्रशिक्षणाची गणती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| सी-डॅक | - | ०५ |
| खास प्रशिक्षणे | - | ०९ |
| औद्योगिक प्रशिक्षण | - | ०२ |

### सी-डॅक कोर्सेस

२) PG-DAC कोर्सची नवीन बॅच ऑगस्ट २०१४ पासून सुरू झाली. ९२ विद्यार्थी ह्या कोर्समध्ये हजर होते. ऑगस्ट २०१४ बॅचच्या विद्यार्थ्यांचा कॉमन प्लेसमेंट प्रोग्राम ३ फेब्रुवारी २०१५ पासून सुरू झाला.

३) फेब्रुवारी २०१५ मध्ये PG-DAC कोर्सची नवीन बॅच सुरू झाली. त्यांत आजवर २८-३० ॲडमिशन झाल्या.

४) सप्टेंबर व नोव्हेंबर २०१४ मध्ये मल्टिमीडिया क्रिएशन कोर्सच्या नवीन बॅचेस सुरू करण्यात आल्या.

### कार्पोरेट कोर्सेस

५) एल.आय.सी.च्या अधिकारी वर्गासाठी खास JAVA टेक्नॉलॉजी चे प्रशिक्षण आयोजित केले गेले. ह्या प्रशिक्षणाद्वारे साधारण ५०-६० LIC अधिकाऱ्यांना ट्रेनिंग देण्यात आले.

### MKCL COURSES

६) प्रतिष्ठानतर्फे चालविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितचे खालील अभ्यासक्रम यशस्वी करण्यासाठी अकादमीने संपूर्ण सहाय्य केले. त्यांत प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| MS-CIT | - | 04 |
| WAVE Course | - | 01 |
| KLiC Diploma | - | 01 |

७) MS-CIT हा कोर्स लोकप्रिय असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

८) MKCL संयुक्त विद्यमाने MS-CIT, WAVE आणि KLiC अभ्यासक्रम २०१५ मध्ये आपल्याकडे चालविण्याची परवानगी मिळाली. याचा भविष्यात अनेक विद्यार्थ्यांना फायदा होईल.

### YCP COURSES

९) AIT ने CCACA कोर्स एक वर्षे चालविणार असे जाहीर केले. H.S.C. उत्तीर्ण झालेले विदयार्थी हा कोर्स करून ग्राफिक्स आणि ॲनिमेशन मध्ये कारकीर्द करू शकतात. CCACA कोर्सची एक बॅच सध्या प्रशिक्षित होत आहे.

१०) PG- DAC कोर्समध्ये ॲडमिशन मिळविण्याकरिता प्रवेश परीक्षा देणे आवश्यक असते. ही प्रवेश परीक्षा उतीर्ण होता यावी म्हणून आपल्याकडे Pre-DAC कोर्स चालविला जातो. ह्या कोर्सची एक बॅच घेण्यात आली.

### मोफत कार्यशाळा आणि सेमिनार

१२) खालील महाविद्यालयांमध्ये Android Technology च्या मोफत एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आल्या.

१. Bhavana College on 5Th December 2014.
२. ARMIET College, Asangaon on 10th January 2015
३. Dnyansadhana College, Thane on 17 th January 2015.
४. Viveknand College, Chembur on 23rd January 2015.
५. LALIT College, Badlapur on 28Th January 2015.

१३) S.I.W.S. कॉलेजमध्ये ता. १९ व २० जानेवारी २०१५ या दोन दिवसात Android Technology ची कार्यशाळा घेण्यात आली.

१४) PG-DAC च्या विद्यार्थ्यांसाठी ता. २४ ते ता. २६ जानेवारी २०१५ च्या दरम्यान Business Intelligence Using Oracle Reports and Graphics चे प्रशिक्षण आयोजित केले. विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद

मिळाला.

**विशेष प्रशिक्षण**

१५) जानेवारी २०१५ ला Rotary Club च्या सयुंक्त विद्यमाने महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलींना प्रशिक्षण दिले गेले.

**अभ्यासक्रमाव्यतिरिक्त उपक्रम**

१६) PG-DAC ऑगस्ट २०१४ बॅचचे विद्यार्थी water Kingdom ला सहलीसाठी गेले होते. सर्वांनी सहलीचा आनंद घेतला.

**आगामी कार्यक्रम**

१७) गरजू विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेस मध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणीनंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. तसेच ज्येष्ठ नागरिक व शारीरिक अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठीही खास सवलत देण्यात येते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येईल.

१८) Certificate Course In Advanced Computing (CCAC) या कोर्सची नवीन बॅच १७ फेब्रुवारी २०१५ला सुरू झाली.

१९) Diploma in Advanced Computing (PG-DAC) च्या कोर्सची नवीन बॅच १७ फेब्रुवारी २०१५ ला सुरू झाली.

२०) मोफत कार्यशाळा फेब्रुवारी व मार्च २०१५ला इंजिनिअरींग कॉलेजमध्ये चालविण्यात येणार आहेत.

२१) MKCL चा KLiC Diploma फेब्रुवारी २०१५. ला सुरू होणार असून हा कोर्स सहा महिन्याचा (अर्धवेळ) आहे.

**उद्देश :-**

२२) AIT ही संस्था मुलांची गुणवत्ता धोरण ठरवून मुलांना सर्वोत्तम प्रशिक्षण वितरित करण्यासाठी तयार असते.

# क्षणचित्रे












# क्षणचित्रे





























# ५ वा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - २०१५

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ५ वा 'यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१५' यावर्षी पार पडला. हा पाचवा चित्रपट महोत्सव ज्येष्ठ दिवंगत संगीतकार आनंदजी मोडक यांना समर्पित करण्यात आला होता. दिनांक १७ जानेवारी रोजी महोत्सवाचा उदघाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. शरद पवार, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा मा. खासदार सुप्रिया सुळे, उपाध्यक्ष अरुण गुजराथी, कोषाध्यक्ष हेमंत टकले, सरचिटणीस शरद काळे, महोत्सवाचे संचालक जब्बार पटेल, पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रथम पारितोषिक पटकावणारे इटलीतील 'लाइक द विंड' या सिनेमाचे दिग्दर्शक मार्को पुकिओनी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तसेच ज्येष्ठ सिनेकलावंत अनुपम खेर यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल विशेष पुरस्काराने शरद पवार यांच्याहस्ते गौरविण्यात आले. उदघाटन सोहळ्यापूर्वी प्रसिद्ध वाद्यवादक उस्ताद तौफिक कुरेशी यांनी सादर केलेल्या कलाविष्काराने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले होते.

खासदार सुप्रिया सुळे यांनी कार्यक्रमात ५व्या चित्रपट महोत्सवाची प्रस्तावना केली. 'आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हे सांस्कृतिक देवाणघेवाणीचे काम करतात. वेगवेगळ्या देशातील संस्कृती, तिथली भाषा, लोकांचे राहणीमान, सामाजिक-राजकीय परिस्थिती यासारख्या अनेक गोष्टी चित्रपटातून समजत असतात. खरंतर प्रेक्षकांना बसल्याजागी जगभर फिरवून आणण्याची ताकद चित्रपट महोत्सवात असते. त्यामुळेच यशवंत आंतराराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या पहिल्या वर्षांपासून विविध देशातल्या दर्जेदार चित्रपटांचे प्रदर्शन महोत्सवात करण्यात येत आहे. यावर्षी इजिप्त, फ्रान्स, इटली, अरेबिया, ऑस्ट्रेलिया आणि इतर देशांतील दर्जेदार चित्रपट या महोत्सवात पाहता येणार आहेत', अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने आपण हा महोत्सव करत आहोत. त्यांना स्वतःला सर्वप्रकारांच्या कलांची उत्तम जाण आणि आवड होती. राजकारणाच्या धकाधकीतून वेळ मिळाल्यावर ते आवर्जून नाटक आणि सिनेमा पाहायला जात असत. विशेषत: परदेशामध्ये न्यूयॉर्क, लंडन येथे त्यांना हि संधी जास्त मिळत असे, अशी पुस्तीही सुप्रिया सुळे यांनी जोडली.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात यशवंतराव चव्हाण आणि त्यांचे कलेवर असणारे असीम प्रेम याबद्दल आपले विचार मांडले. यशवंतराव चव्हाण देशात-परदेशात कुठेही असले तरी वाचन, नाटक आणि संगीताचा आस्वाद घेण्यासाठी वेळ काढत असत. त्यांचे दिल्लीतल्या घरी कलाकारांचा राबता असायचा. सर्व कलाकारांना, साहित्यिकांना चव्हाण साहेब आपल्या जवळचे वाटायचे. त्यामुळेच चित्रपटासारख्या कलेचा महोत्सव हा त्यांच्याच नावाने असावा असा आमचा आग्रह होता. हा महोत्सव उत्तरोत्तर चांगल्या कलाकृती सादर करत राहिल, असे प्रतिपादन श्री. पवार यांनी केले.

यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दिनांक १८ ते २३ जानेवारी दरम्यान ७१ विविध देशांतील चित्रपट यशवंतराव चव्हाण केंद्रातील मुख्य सभागृह, रंगस्वर सभागृह आणि सांस्कृतिक सभागृह येथे दाखविण्यात आले. डीसीपी, ब्लूरे, डीव्हीडी, ३५ एम.एम., डीजीबीटा याद्वारे वरील तीनही सभागृहात दिवसाला प्रत्येकी ५ चित्रपट दाखविण्यात आले. ग्लोबल सिनेमा, रिट्रॉस्पेक्टिव्ह, कंट्री फोकस, इंडियन सिनेमा, मराठी सिनेमा, स्टुडंट कॉम्पिटीशन अशा एकूण सुमारे ७१ फिल्म यावेळी दाखविण्यात आल्या.

या महोत्सवात सोशल मिडियाचा प्रभावी वापर करण्यात आला. महोत्सवाकरिता बुकमायशो.कॉम

(bookmyshow.com) या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेशिका आरक्षित करण्याची सुविधा प्राप्त करून देण्यात आली होती. तसेच फेसबुक पेज (https://www.facebook.com/YIFF2015), वेबसाईट (http://yiff2015.com) आणि ट्विटरच्या (@5thYIFF) माध्यमातून चित्रपट महोत्सवाची बित्तमबातमी नेटीझन्सच्या माध्यमातून सर्वदूर पसरविण्यात प्रतिष्ठानला यश आले. रोज'प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांचे वेळापत्रक, त्यातील काही खास चित्रपटांची फोटोसहित माहिती सोशल मिडियावर फिरू लागली. त्यामुळे चित्रपटांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

मराठी भाषेच्या वर्गवारित एक हजाराची नोट, सलाम, ख्वाडा आणि आभास हे चार चित्रपट दाखविण्यात आले. चारही चित्रपटांना प्रेक्षकांनी चागंली दाद दिली. मात्र एक हजाराची नोट चित्रपटाला अक्षरश: उचलूनच धरले. चारही चित्रपटाच्या निर्मितीत सहभागी असणारे कलाकार, लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते स्क्रिनिंगच्या वेळी उपस्थित होते. प्रतिष्ठानच्या वतीने प्रेक्षक आणि चित्रपटाच्या टीमसोबत छोटेखानी चर्चासत्रही आयोजित करण्यात आले होते. प्रेक्षक दिलखुलासपणे चित्रपटावर प्रश्न विचारत होते आणि तेवढ्याच मनमोकळेपणाने चित्रपटाच्या टीम त्यांना उत्तरे देताना दिसत होत्या.

महोत्सवाचे खास आकर्षण ठरली रशियाची 'टेस्ट' ही फिल्म. अगदी 'वन्स मोर'ची मागणी प्रेक्षकांनी केली होती. अणुबॉम्बच्या टेस्टने वाताहत झालेल्या एका कुटुंबाची अबोल कहाणी कलात्मक कॅमेऱ्याने यात टिपली आहे. असे चित्रपट पाहायला मिळणे, हेच आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा खरे यश आहे, अशा प्रतिक्रिया यावेळी प्रेक्षकांनी दिल्या. त्यासोबतच फोक्सवॅगन शॉर्ट फिल्म स्पर्धेतील आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे बनवलेल्या शॉर्टफिल्म्स दाखवल्या गेल्या. नवे विचार, नव्या वाटा धुंडाळणाऱ्या धडपड्या रंगकर्मींचे हक्काचे व्यासपीठ म्हणजे शॉर्टफिल्म. या दोन्ही प्रकारातील शॉर्टफिल्म्स, त्यांचे वेगळे विषय, ते हाताळण्याची हातोटी बऱ्याच अंशी प्रयोगशील असल्यामुळे सर्वच वयोगटातील प्रेक्षकांनी शॉर्टफिल्मसला चांगली दाद दिली.

५व्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची सांगता २३ जानेवरी रोजी 'यशवंतराव चव्हाण — बखर एका वादळाची' या चित्रपटाने झाली. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक आणि महोत्सवाचे संचालक जब्बार पटेल आणि चित्रपटातील कलाकार उपस्थित होते. यावर्षीप्रमाणे सहाव्या चित्रपट महोत्सवातही दर्जेदार सिनेमे पाहायला मिळतील अशी आशा व्यक्त करण्यात आली.

# कृषी व सहकार व्यासपीठ, विभागीय केंद्र पुणे

## कार्यवृत्त

**सहकारी गृहनिर्माण संस्था मॅन्युअल**

या संदर्भात प्रतिष्ठानच्या पुणे केंद्रात १० ऑक्टोबर २०१४ रोजी अॅड. जयंत कुलकर्णी पुणे जिल्हा गृहनिर्माण महासंघाचे सचिव व सदस्य गृहनिर्माण उपविधी समिती यांचे उपस्थितीत सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेमध्ये त्यांच्या समितीने तयार कलेल्या प्रारूप उपविधी बाबत चर्चा झाली. उपस्थितांनी उपविधी संबंधात आपल्या हरकती/आक्षेप/सूचना मांडल्या. अॅड. जयंत कुलकर्णी यांनीही उपस्थितांनी मांडलेल्या हरकती/आक्षेप/सूचनांची दखल घेऊन ते समितीपुढे मांडले जातील असे सांगितले. विशेषत: सहयोगी/सहसभासदाबाबत सुचविलेल्या दुरुस्तीबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली.

**सहकारी संस्था निवडणूक**

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ दि. ११ सप्टेंबर २०१४ रोजी शासनातर्फे राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले व सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली. या संदर्भात सूचना मागविण्यासंबंधी प्रतिष्ठानतर्फे दि. ७ नोव्हेंबर २०१५ रोजी सभा बोलविण्यात आली त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. या संबंधाने निदर्शनास आलेल्या त्रुटीचा मसुदा मा. सचिव सहकार यांना सादर करण्यात येत असून त्याच्या प्रती मा. सहकार आयुक्त व आयुक्त राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

**बियाणे वाटप**

वनराई येथे २६ सप्टेंबर २०१४ रोजी झालेल्या सभेत प्रतिष्ठानतर्फे ज्या शाळांना स्पर्धेमध्ये भाग घ्यावयाचा आहे तथापि त्यांना बियाणे मिळाले नाही त्यांना बियाणे वाटपाचा कार्यक्रम वनराई संस्थेचे सहकार्याने घेण्यात आला व चाळीस शाळांना बियाणे वाटप करण्यात आला.

**कृषी व्याख्याने व चर्चा सत्रे:**

माहे सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर २०१४ मध्ये बळीराजा शेतकरी मंडळाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी (नोव्हेंबर २०१४ वगळता) कृषी व्याख्याने प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयात आयोजित करण्यात आली. ती खालील प्रमाणे

१) ६.९.१४
शेतकऱ्याच्या आत्महत्या
- डॉ. प्रतिमा इंगोले

२) ४.१०१४
जी.एम. पिके शेतकऱ्यासाठी
व ग्राहकासाठी बाधक की साधक
- श्री. अजित नागेंद्र नरदे

३) ८.११.१४
नॅशनल डेअरी प्लॅन
-डॉ. रामनाथ सडेकर
(कर्नाल, डेअरी प्रोजेक्ट)

४) ६.१२.१४
दाभोळकर प्रणित परिवार पद्धती
- श्री. मनोहर ठाकूर

५) ३.१.१५
शेतीतील अंधश्रद्धा / शेतीसाठी शास्त्रीय विचार
-श्री. मनोहर रवके

**राजर्षि शाहू महाराज जीवन व कार्य:**

इयत्ता ८ वी व ९ वी चे विद्यार्थी यांजकडून ४४ शाळांकडून २६७४ उत्तरप्रत्रिका प्राप्त झाल्या असून छाननी अंतर ४२ शाळातील १५५ मुले व मुली यांची निवड करून २२ नोव्हेंबर १४ रोजी कै. वसंतदादा पाटील विद्या निकेतन, पुणे २; येथे एक दिवशीय शिबीर आयोजित करण्यात आले.

राजर्षि शाहू महराज जीवन व कार्य या संदर्भात

शिक्षकांकडून निबंध मागविण्यात आले होते. १९ शाळांकडून ३१ निबंध प्राप्त झाले असून त्याची छाननी माजी प्राचार्य, वाडीया कॉलेज यांचे मार्फत केली आहे, त्यानुसार गुणानुक्रमे बक्षिसे दि. २२ नोव्हेंबर १४ रोजी वाटप करण्यात आली ती खालील प्रमाणे.

**पारितोषिक पात्र शिक्षक / शिक्षिका यादी**

**प्रथम पारिंतोषिक विभागून प्रत्येक रु. ७५०**

१ (अ) प्रा. दत्तात्रय रघुनात नार्खकडे (९८८१२४६०४१)
नवीन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मरकळ, ता. खेड, जिल्हा पणे.

१ (ब) सौ. माया कोथळीकर (९८७२३३६८६७)
सहायक शिक्षिका, ना. दा. ठाकरसी कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नारायण पेठ, पुणे ३०

**द्वितीय पारितोषिक विभागून प्रत्येकी रु. ५००/-**

२ (अ) श्रीमती सुवर्णा शरद काळे (९२२६३७७८८३)
सौ. विमलाबाई गरवारे प्रशाला, डेक्कन जिमखाना, पुणे ४

२ (ब) श्रीमती प्रेमला अरुण बराठे, विद्यापीठ हायस्कूल, पुणे ७

**तृतीय पारितोषिक विभागून प्रत्येकी रु. ४००/-**

३ (अ) सौ. पुष्पलता चंद्रकांत फरांदे (९७६३६५८०४२)
विद्यापीठ हायस्कूल, गणेशखिंड, पुणे ७

३ (ब) सौ. सुषमा प्रकाश निरगुडकर (९६५७८४५२४८)
श्रीमती ना.द. ठाकरशी कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ३०

**उत्तेजनार्थ पारितोषिक प्रत्येकी रु. ३००/-**

७) कु. सोनाली सुदाम कुंजीर (२६९९९२५३)
साने गुरुजी प्राथमिक विद्यांमदिर, माळवाडी, हडपसर, पुणे २८.

**उत्तेजनार्थ पारितोषिक प्रत्येकी रु. ३००/-**

८) सौ. वैशाली अशोक रामटेके (२४४७१६८१)
सहशिक्षिका डॉ. न.का. घारपुरे प्रशाला, १३५९, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, पुणे २

९) श्री. नवेश साहेबराव पाटील (९८८१०४८९९३)
मॉडर्न हायस्कूल, शिवाजीनगर, पुणे ५

१०) श्री. निलम कुंडलीक खोमणे (९२७२९५९५८५)
कै. सुंदराबाई राठी प्रशाला, लक्ष्मी रोड, पुणे ३०

**दिवाळी पहाट**

दरवर्षीप्रमाणे दिवाळी रंगारंग पहाट २०१४ हा कार्यक्रम गुरुवार दि. २३ ऑक्टोबर २०१४ रोजी पहाटे ५.०० सारस बागेत अत्यंत उत्साहात हजारो श्रोत्यांच्या सहभागाने पार पडला.

संगीत कार्यक्रमात बासरी, व्हायोलीन, तबला या वाद्यांवर अनुक्रमे मा. रोहित बनकर, तेजस उपाध्ये व मिलिंद बनकर यांनी जुगलबंदीचा सुश्राव्य कार्यक्रम पार पाडला. गीतों का सफर हा कार्यक्रम श्री. जितेंद्र भुरूक व सहकारी यांनी सादर केला आणि प्रेक्षकांनी त्याला भरभरून दाद दिली.

दहा वर्षाचा कुमार आर्य काकडे याने आपल्या ताशा वादनाने आणि लाठी-काठी प्रात्यक्षिकाने प्रेक्षकांची मने जिंकली. 'आता थोडे हसू यां' हा हास्य कार्यक्रम श्री. मकरंद टिल्लू यांनी सादर केला.

नृत्य क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सौ. मनीषा साठे यांना तर श्री. विजय केळकर यांना यशवंतराव चव्हाण कलासाधन पुरस्कार श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास श्री. अजीत निंबाळकर हजर होते. कार्यक्रमाचे आयोजन श्री. सुरतवाला आणि श्री. अंकुश काकडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.

### पर्वती चढणे स्पर्धा

नेहमीप्रमाणे १४ नोव्हेंबर २०१४ रोजी पर्वती चढणे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये १००हून अधिक वृद्धांनी भाग घेतला. बक्षीस वाटप समारंभ दि. २५.११.१४ रोजी आयोजित केला गेला. स्वागत श्री. अंकुश काकडे यांनी केले.

स्पर्धकांचे कौतुक श्री. अजीत निंबाळकर, श्री. जयप्रकाश सुराणा यांनी केले. बक्षीस वाटप दि. २५.११.१४ रोजी मा. भाई वैद्य यांचे हस्ते करण्यात आले. ८१ वर्षावरील महिलांमध्ये श्रीमती मंगला अष्टपुत्रे या ८२ वर्षांच्या महिलेने ५ वेळा पर्वती एका तासात चढून प्रथम क्रमांक मिळविला तर ८७ वर्षाचे श्री. बाबूराव गायकवाड यांनी पर्वतीवर एका तासात १० फेऱ्या चढून जाऊन पुरुषांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. आमंत्रितांचे स्वागत श्री. अंकुशराव काकडे यांनी केले. कार्यक्रम आयोजन व प्रास्ताविक श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी केले.

मा. भाई वैद्य यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर श्री. प्रल्हाद तापकीर यांनी आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

### करिअर गायडन्स व्याख्यानमाला

विद्यार्थांना वेळीच मार्गदर्शन मिळून त्यांना योग्य ते कोर्सेस निवडता यावेत या दृष्टिकोनातून खालील शाळेतील विद्यार्थी व पालकांसाठी श्री. विवेक वेलणकर अध्यक्ष सजग नागरिक मंच यांची व्याख्याने खालील शाळात घेण्यात आली.

डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यानिकेतन,

लोणकर माध्यमिक विद्यालय,

विद्यापीठ हायस्कूल

त्याचप्रमाणे व्यसनमुक्ती यावर डॉ. दिलीप देवधर यांचे व्याख्यान तर वयात येतानाच्या समस्या यावर राष्ट्रपती पदक विजेत्या सौ. उर्मिला भिडे यांची व्याख्याने दि. २२.११.१४ चे विद्यार्थी/शिक्षक शिबिरात आयोजण्यात आली.

### सहकारी संस्था निवडणुका

दि. २ जानेवारी २०१५ रोजी सहकारी संस्था निवडणुका या विषयावर एक चर्चासत्र घेण्यात आले त्या चर्चेच्या अनुषंगाने खालील प्रस्ताव सादर केले.

दि. ५ जानेवारी २०१५ रोजी श्री. मधुकरराव चौधरी आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांना ज्या क व ड वर्गातील संस्थांकडे उदा. जंगल कामगार संस्था, मजूर सहकारी संस्था इत्यादीकडे निवडणूक फंड भरण्यासाठी रक्कम उपलब्ध नाही त्यांना तो माफ करण्यासंबंधी नियमात तरतूद व्हावी असा प्रस्ताव सादर केला.

ज्या क व ड वर्ग सहकारी संस्थाची निवडणूक बिनविरोध होते त्यांच्यासाठी वार्षिक सभेस वैधानिक लेखा परीक्षकाने हजर राहून तसा अहवाल द्यावा व अशा संस्थांकडून रु. ५००/- फक्त भरून घ्यावेत. त्यातून लेखा परीक्षकास ६० टक्के व निवडणूक फंडास ४० टक्के रक्कम वर्ग करावी हा प्रस्ताव दिला आहे. त्यामुळे प्रामुख्याने छोट्या गृहनिर्माण सहकारी संस्था व अन्य संस्था यांना मोठा दिलासा मिळेल.

दि. १२.१.१५ चे प्रस्तावाने मा. चंद्रकांत दळवी आयुक्त सहकार व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य यांना वरील प्रस्तावाची प्रत पाठवून सदर प्रस्तावाबाबत आयुक्त सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्याशी चर्चा करून, वैधानिक लेखा परीक्षकांना जरूर त्या सूचना देण्याबाबत सुचविले आहे.

दि. १५.१.१५ चे पत्राने ड वर्गातील सहकारी संस्थासाठी ज्या परीपत्रकीय सूचना आयुक्त सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी निर्गमित केल्या आहेत त्यात सहकार कायदा कलम १५२ अे बाबत मौन असल्याने, त्याबाबत सदर संस्थाना सदर कलमातून सूट मिळाली आहे की काय याची चौकशी करून ते शासकीय आदेश असल्यास त्याची प्रत उपलब्ध होणेबाबात कळविले आहे.

दि. ९.२.१५ रोजी ९७ व्या घटना दुरुस्तीचा सहकारी संस्थांवरील परिणाम यावर चार्टर्ड अकौंटंट

असोसिएशन ऑफ इंडिया राज्य टास्क फोर्सचे माजी संयोजक श्री. बी. बी. माने यांनी कृषी व सहकार व्यासपीठात आपले विचार मांडले.

**प्रसिद्धी**

संयोजक कृषी व सहकार व्यासपीठ श्री. शं. त्रि भिडे यांचे खालील लेख प्रसिद्ध झाले.

१) सहकारी संस्था लेखा परीक्षण कथा आणि व्यथा - महाराष्ट्र को-ऑप. क्रेडिट न्यूज ऑक्टोबर १४.

२) सहकारी संस्था निवडणुका काही यक्ष प्रश्न - बँकिंग आशय अभिप्राय - डिसेंबर १४.

३) अडत गुंता कसा सोडवाल? - ॲग्रोवन - दि. ३१ डिसेंबर १४

४) सहकारी निवडणूक नियम महत्वाच्या तरतुदी - पुणे जिल्हा नागरी सह. बँक डायरी - जानेवारी १५.

**गृहनिर्माण संस्था मानीव हस्तांतरण**

शासनाने बिल्डर डेव्हलपरकडील गाळे यासाठी गृहनिर्माण मानीव हस्तांतरणात स्टॅम्प ड्यूटीची सूट दिली आहे. कणकवली स्थित सिंधु प्रथमेश हाउसिंग सोसायटी मर्यादितला स्थानिक शासकीय कार्यालय तसेच, राज्यस्तरीय सहकारी संस्था कार्यालयातही माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रतिष्ठानचे कृषी व सहकार व्यासपीठाकडे मार्गदर्शन मागितले. त्यास अनुसरून त्यांना संबंधित परिपत्रकीय आदेशाच्या प्रती उपलब्ध केल्या. त्यामुळे सदर संस्थेचे रु. १,३१,०००/- वाचले व गृहनिर्माण संस्थेच्या जागेच मानीव हस्तांतरण पूर्ण झाले. याबाबतचे जावक क्र. ३६/१४ दि. ११.१२.२०१४ चे पत्र आले आहे. अशाच प्रकारे नागपूरहूनही निवडणुकीच्या माहितीसंबंधी दूरध्वनीवरून चौकशी झाली. सदर माहिती केंद्र शासकीय गृहनिर्माण संस्थेच्या सभासदास देण्यात आली.

**वक्तृत्व स्पर्धा पारितोषिक वितरण**

महाराष्ट्र शासनाचे माजी मुख्य सचिव श्री. अजित निंबाळकर यांचे हस्ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नित्यूदंन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, वनराई यांचे संयुक्त विद्यमाने इयत्ता आठवी व नववीचे विद्यार्थ्यांचे वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि. २७.१.१४ रोजी विशाल सह्याद्री सभागृहात संपन्न झाला. या स्पर्धा श्री. अंकुशराव काकडे यांचे पुढाकाराने घेण्यात आल्या.

स्पर्धेमध्ये सव्वीस शाळांतील ८वीच्या ६७ आणि ९वीच्या ५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ८वी व ९वी च्या मुला-मुलींसाठी स्वतंत्रपणे पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रथम क्रमांक रु. ५००/-, द्वितीय क्रमांक रु. ४००/-, तृतीय क्रमांक रु. ३००/- व उत्तेजनार्थ रु. २५०/- एकूण ८वीच्या पाच व ९वीसाठी पाच उत्तेजनार्थ पारितोषिके वाटण्यात आली. परीक्षक म्हणून डॉ. दिलीप गरूड, प्रा. प्रभाकर पंडित, सर्वश्री सुरज कुलकर्णी आणि श्री. बी.एम. देशपांडे यांनी काम पाहिले.

खालील विद्यार्थ्यांनी मुलां-मुलींमध्ये ८वी व ९वीत प्रथम क्रमांक पटकावले.

प्रथम क्रमांक ८वी मुली - कु. कृतिका हाके, चं.पा. तुपे साधना कन्या विद्यालय

प्रथम क्रमांक ८वी मुले - कु. प्रक्षिक राक्षे, मॉडर्न हायस्कूल

प्रथम क्रमांक ९वी मुली - कु. प्रियांका सुपेकर, एरंडवणा माध्यमिक हायस्कूल

प्रथम क्रमांक ९वी मुले - कु. जगदीश प्रजापती, एस. एम. जोशी हायस्कूल, पुणे.

भिडे प्रतिष्ठानतर्फे वक्तृत्व कलेची साधना हे पुस्तक सप्रेम भेट म्हणून सर्व विजेत्या २२ विद्यार्थ्यांना वाटण्यात आले.

श्री. शं. त्रि. भिडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्वश्री सुनिल कदम व रवि सरनाईक यांनी मोठा हातभार लावला.

# विभागीय केंद्र, कोकण
# कार्यवृत्त

**शिक्षण दिन कार्यक्रम :**

विभागीय केंद्र कोकण - जिल्हा समिती रत्नागिरीच्या वतीने दि. १० सप्टेंबर २०१४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून खरे-ढेरे महाविद्यालय, गुहागर येथे शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय, चिपळूणचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाश देशपांडे यांना निमंत्रित करण्यात आले होते.

मा. जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे यांनी कार्यक्रकामचे प्रास्ताविक केले. महाविद्यालयातील शिक्षक मा. श्री. बाळासाहेब दबडे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले, "ज्ञान हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येत असते. देवापेक्षा गुरू श्रेष्ठ आहे. गुरूच्या अंगी त्याग असला पाहिजे. दुसऱ्याला देण्याची वृत्ती असली पाहिजे. प्रत्येक टप्प्यांवर विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे काम गुरू करीत असतात. गुरू व शिष्य या जुन्या परंपरा आहेत. पूर्वी संतच गुरूचे काम करित असत." असे त्यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे प्रा. मा. श्री. आनंदराव पवार यांनी सांगितले की, पूर्वी विद्यार्थ्याला गुरूच्या घरी जाऊन शिक्षण घ्यावं लागत असे. आज शिक्षणाकडे बघण्याची मानसिकता बदललेली आहे. मुलांना खूप सोयीसुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. शिक्षकही कष्ट घेऊन मुलांना शिकवत असतात. याची आठवण मुलांनी ठेवली पाहिजे.

मा. श्री. प्रकाश देशपांडे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की हल्ली पालक आपला मुलगा कोण होणार, हे ठरवत असतात. प्रत्येक पालकाला आपला मुलगा हा डॉक्टर, इंजिनीअर, मोठा उद्योगपती झालेला आवडत असतो. आजच्या युगातील मुलांकडे यंत्र म्हणून पाहिले जात आहे. ज्याप्रमाणे आपण खाणीत हिऱ्याचा शोध घेत असतो त्याचप्रमाणे शिक्षकांनीही आपल्या विद्यार्थ्यांमध्ये आदर्श विद्यार्थ्याचा शोध घेतला पाहिजे.

पूर्वी कष्ट करून मुले शिकत असत. आता मात्र मुलांना सर्व काही सहज मिळते. ज्ञान हे वेगवेगळ्या प्रकारे सर्व बाजूने उपलब्ध होत आहे ते मिळविण्यासाठी विद्यार्थी वर्गाने सतत प्रयत्न केले पाहिजेत.

कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा समिती सदस्य मा. डॉ. अनिल जोशी यांनी उपस्थित मान्यवरांचे व शिक्षकांचे आभार मानले.

जिल्हा समितीचे सदस्य मा. श्री. विराज महाजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**माहे ऑक्टोबर २०१४**

**ज्येष्ठ नागरिक दिन कार्यक्रम**

कोकण विभागीय केंद्र व रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघ यांचे संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून रविवार दि. १२ ऑक्टोबर २०१४ रोजी ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा संपन्न झाला. यादिवशी सकाळी ६.३० वा. ज्येष्ठ नागरिकांकरिता चालण्याची स्पर्धा घेण्यात आली. कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेचे उद्घाटन केले. या स्पर्धेचे पुरुष गट व महिला गट असे दोन गट करून तीन विजयी क्रमांक काढण्यात आले. खेडशी हायस्कूल रत्नागिरीचे क्रीडाशिक्षक श्री. सुभाष बाबू पाटील व पटवर्धन हायस्कूल रत्नागिरीचे क्रीडाशिक्षक श्री. राजेंद्र सदाशिव कांबळे यांनी व त्यांचे सहकारी क्रीडा शिक्षकांनी पंच म्हणून काम पाहून सहकार्य केले. या स्पर्धेत ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

चालण्याच्या स्पर्धेचा बक्षीस समारंभ व ज्येष्ठ नागरिकांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम सायं. ४.०० वा.

राणी लक्ष्मीबाई सभागृह, टिळक आळी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला ९९ वर्षीय श्री. महादेव ना. वांदरकर गुरुजी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन मा. श्री. वांदरकर गुरुजी यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर सकाळी घेण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या चालण्याच्या स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले.

**पुरुष गट**

श्री. विजय आंबेरकर - प्रथम क्रमांक
श्री. नरेश वाडेकर - द्वितीय क्रमांक
श्री मुकुंद फडके - तृतीय क्रमांक
श्री. कांतीचंद टेंकडे - उत्तेजनार्थ

**महिला गट**

श्रीम. अनुराधा तारगांवकर - प्रथम क्रमांक
श्रीम. सुनंदा दामले - द्वितीय क्रमांक
श्रीम. सुनंदा कंळबटे - तृतीय क्रमांक

यांना रोख रक्कमेचे पारितोषिक व गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. श्री. वांदरकर गुरुजी यांनी मनोगत व्यक्त केले. मनोगतामध्ये त्यांनी आपल्या शालेय जीवनातील तसेच तरुणपणातील आठवणींना उजाळा दिला. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत सहभाग घेतल्याचे अविस्मरणीय अनभव सांगितले. हरीजन बंधुभगिनी व सर्व हिंदू बांधवांसाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे रत्नागिरीत वास्तव्य असताना त्यांनी दानशूर श्रीमान भागोजीशेठ कीर यांची भेट घेऊन पतित पावन मंदिर बांधले याची आठवण तसेच १९३४ साली संत गाडगे महाराजांनी पतित पावन मंदिराच्या आवार खराटा घेऊन साफ केले त्यावेळी सोबत आपण असल्याची आठवणही त्यांनी सांगितली.

विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी सांगितले की, यशवंतराव चव्हाण साहेबांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रतिष्ठान मार्फत केले जाते. वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्या जातात. आजही ज्येष्ठ नागरिकांसाठी स्पर्धा घेतली गेली. त्यानिमित्ताने ज्येष्ठ नागरिक एकत्र येतात. ज्येष्ठांच्या आनंद मेळाव्यासाठी वेगवेगळ्या सन्माननीय व्यक्तींना बोलावले जाते. त्यामुळे ज्येष्ठांना एकप्रकारचा दिलासा, आधार मिळतो.

उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की ९९ वर्षीय वांदरकर गुरुजींचा आजचा उत्साह तरुणांना लाजवणारा असाच आहे. त्यांच्याकडून खूप काही शिकण्यासारखे आहे.

ज्येष्ठ नागरिकांचे मनोरंजनाकरिता श्री. मनोज ठीक यांचा हिंदी व मराठी गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. उपस्थित काही ज्येष्ठ नागरिकांनी नाट्यगीते व भजनही सादर केले. शेवटी जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे यांनी उपस्थितांचे, कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या सदस्यांचे व शिक्षकांचे आभार मानले.

## माहे नोव्हेंबर २०१४

**महिला मेळावा**

डी. बी. जे. महाविद्यालय चिपळूणच्या राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर) यांचे सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ग्रामीण पुनर्रचना शिबीर कार्यक्रम दि. २२ नोव्हेंबर २०१४ ते २८ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत मोडक वाडी, कान्हे, ता. चिपळूण येथे आयोजित करण्यात आले होते. सदर NSS कॅम्पने कान्हे हे गाव दत्तक घेऊन विविध उपक्रम राबविले. सलग सात दिवस व्याख्यान, उपासना, आरोग्य शिबिरे, संस्कार, विद्यार्थ्यांच्या संघर्षकथा, प्रतिथयश लेखक शिक्षकांचे मार्गदर्शन, कथाकथन, सांस्कृतिक कार्यक्रम वगैरे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तसेच या कालावधीत जलसाक्षरता, पर्यावरण जागृती, लेक वाचवा जनजागरण, आपत्ती व्यवस्थापन, रस्ते तयार करणे, अंधश्रद्धा निर्मूलन यासारखे विशेष कार्यक्रम राबविण्यात आले. त्या अनुषंगाने दि. २३ नोव्हेंबर २०१४ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण

विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने महिला व विद्यार्थिनींसाठी मेळावा व विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी ग्रामीण भागातील महिलांसाठी विविध मसाले तयार करण्याचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह देण्यात आले. उदा. गरम मसाला, चहा मसाला, सांबार मसाला, पनीर मसाला, बिर्याणी मसाला इ. मसाल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच महिलांसाठी स्पॉट गेम्स, विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी प्रश्नमंजूषा हे कार्यक्रम घेण्यात आले. तसेच यशवंतराव चव्हाणांच्या जीवनातील विविध पैलूंविषयी जिल्हाध्यक्षा प्राची शिंदे व सदस्य श्री. सिद्धेश लाड यांनी माहिती दिली.

कान्हे या ग्रामीण भागातील वयोवृद्ध महिलांनीही प्रश्नमंजूषा या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेऊन बक्षिसे मिळवली. अतिशय उत्साहाच्या वातावरणात सदरचा कार्यक्रम पार पाडला. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने अतिशय सुंदर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल डी. बी. जे महाविद्यालयातर्फे प्रतिष्ठानचे स्मृतिचिन्ह देऊन आभार मानले.

**रेखाचित्र प्रदर्शन :**

स्व. यशवंतराव चव्हाण यांचे ३०व्या पुण्यतिथीनिमित्त दि. २५ नोव्हेंबर २०१४ रोजी गावदेवी मैदान नौपाडा, ठाणे येथे चव्हाण साहेबांच्या जीवनावरील रेखाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन मा. आमदार श्री. निरंजन डावखरे यांचे हस्ते करण्यात आले. हे प्रदर्शन दि. २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०१४ या कालावधीत भरविण्यात आले. या प्रदर्शनाला कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, श्री. सुरेश ठाणेकर, श्री. तुकाराम खुटवड, श्री. माळी, श्री. आनंदराव थोरात, श्री. विलास निकम, श्री. बबन अडसुळ, श्री. दशरथ माळी, श्री. जयसिंग हिंगे इ. मान्यवरांसह अनेक विद्यार्थी व लोकांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला.

**पुण्यतिथी कार्यक्रम :**

स्व. यशवंतराव चव्हाण यांचे ३०व्या पुण्यतिथीनिमित्त कोकण विभागीय केंद्राच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे, जिल्हा समिती सदस्य श्री. कृ. आ. पाटील, श्री. अविनाश काळे व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

**स्पर्धापरीक्षा बक्षीस वितरण कार्यक्रम :**

यशवंतराव चव्हाण यांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय समिती व जिंदाल समूह, जयगड यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी पालघर, ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातून काही निवडक माध्यमिक शाळातील इ. ८ वी व ९वी तील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धापरीक्षा घेण्यात आली. यासाठी विद्यार्थ्यांना चव्हाण साहेबांच्या जीवनावरील पुस्तके वाचनाकरिता देण्यात आली. सदर पुस्तकांवर प्रश्नपत्रिका तयार करून सहभागी शाळांतील विद्यार्थ्यांकडून सोडवून घेण्यात आली. रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर या जिल्ह्यातून एकूण २३ शाळांनी सहभाग घेतला. जवळजवळ ७०० विद्यार्थी स्पर्धा परीक्षेला बसले होते.

या स्पर्धा परीक्षेची प्रश्नपत्रिका काढण्याकरिता श्री. कृ. आ. पाटील, रोटरी क्लब रत्नागिरीचे अध्यक्ष श्री. विनायक हातखंबकर व स. रा. देसाई अध्यापक विद्यालय रत्नागिरीचे प्रा. श्री. संदेश रावराणे यांची समिती नेमण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम दि. २७ नोव्हेंबर २०१४ रोजी कीर सभागृह, पटवर्धन हायस्कूल, रत्नागिरी येथे करण्यात आला. या कार्यक्रमाला देवरूख येतील मा. प्रा. डॉ. सुरेश जोशी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.

**प्रथम क्रमांक** - रोख रक्कम रु. ५००/- प्रशस्तीपत्र व 'सह्याद्रीचा सुपुत्र' पुस्तक.

**द्वितीय क्रमांक** - रोख रक्कम रु. २५०/-

प्रशस्तीपत्र व 'सह्याद्रीचा सुपुत्र' पुस्तक.

**विजेत्यांची नांवे पुढीलप्रमाणे**

**रत्नागिरी जिल्हा :**

प्रथम क्र. वैष्णवी सुर्वे

(शिवाजीराव सुर्वे माध्यमिक विद्यालय, निवळी, ता. चिपळूण)

द्वितीय क्र. अनिकेत कोळंबेकर

(शिवाजीराव सुर्वे माध्यमिक विद्यालय, निवळी, ता. चिपळूण)

उत्तेजनार्थ - रजनीगंधा गोताड

(अ. आ. देसाई माध्यमिक विद्यालय, हातखंबा, ता. रत्नागिरी)

**सिंधुदुर्ग जिल्हा :**

प्रथम क्र. ओंकार चिंदरकर

(शिरगाव हायस्कूल, ता. देवगड)

द्वितीय क्र. प्रतिक्षा तिर्लोटकर

(श्रीराम माध्यमिक विद्यामंदिर, पडेल, ता. देवगड)

**पालघर जिल्हा:**

प्रथम क्र. सम्राज्ञी हांबिरे

(जनता हायस्कूल, नवापूर, जि. पालघर)

द्वितीय क्र. मानती घरत

(जनता हायस्कूल, नवापूर, जि. पालघर)

तसेच ज्या शिक्षकांनी स्पर्धा परीक्षेकरिता सहकार्य केले त्यांचाही यावेळी मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रमुख अतिथी श्री. सुरेश जोशी यांनी उपस्थितांना यशवंतराव चव्हाण यांचा संक्षिप्त जीवनपट सांगितला. ते म्हणाले यशवंतरावांचे जीवनचरित्र सांगायचे म्हणजे एक व्याख्यानमाला होईल. महाराष्ट्राला अग्रेसर राज्य घडवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. राजकारणापलीकडचे नेतृत्व असल्यानेच त्यांनी साहित्य संस्कृती महामंडळ निर्माण केले. सुसंस्कृत समाजकारणी व नि:स्वार्थी नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ते सुपरिचित होते. लॉटरी म्हणजे बिनश्रमाचा पैसा त्यामुळे विद्यार्थ्यांनी कष्टाने कमवेन तेच खाईन असे वागले पाहिजे. मी कधीही भ्रष्टाचार करणार नाही आणि करायला देणार नाही, अशी शपथ घेऊन महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांना तरुण आणि विद्यार्थ्यांनी श्रद्धांजली वाहिली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी मनोगतात सांगितले की, यशवंतराव चव्हाणांची विचारसरणी व साधी राहणी, कर्तबगारी सर्वांना कळण्यासाठी प्रतिष्ठान कार्यरत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांची जीवनशैली आत्मसात करावी यासाठी स्पर्धापरीक्षा आयोजित केली होती. तिला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मानसी चव्हाण यांनी केले. तर आभार श्री. सुभाष पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विभागीय समिती सदस्य, जिल्हाध्यक्षा, जिल्हा समिती सदस्य, शिक्षक व विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

**माहे जानेवारी २०१५**

**चित्रकला स्पर्धा:**

केदारनाथ विद्यामंदिर रामनगर, ठाणे, यशवंतराव चव्हाण स्मृती संस्था, ठाणे व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र कोकण यांचे संयुक्त विद्यमाने दि. ३ जानेवारी २०१५ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त स्व. यशवंतराव चव्हाण यांच्यावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते प्रशस्तीपत्रक व बक्षिसे देण्यात आली.

यावेळी मा. आम. निरंजन डावखरे, कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, ठाणे वैभवचे संपादक श्री. मिलिंद बल्लाळ, शिक्षणाधिकारी श्री. बेलदार, कोकण विभागीय समितीचे सदस्य तथा यशवंतराव चव्हाण स्मृती संस्था ठाणेचे अध्यक्ष मा. श्री. विलास निकम, श्री. भागवत, श्री. गायकवाड, मा. सौ. फाल्गुनी राजपूत इ. मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मुलांना

मनोरंजनात्मक गोष्टी सांगितल्या.

**परिसंवाद कार्यक्रम :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय केंद्राच्या वतीने कोकण विभागीय समितीचे पहिले अध्यक्ष स्व. भाऊसाहेब नेवाळकर यांचे जन्मशताब्दी वर्षानिमित्त दि. १२ जानेवारी २०१५ रोजी वसई-विरार मधील वि.वा. इंन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शिरगांव येथे इंजिनीअरिंग शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता 'असा घडतो उद्योजक' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कोकण विभागीय समितीचे सदस्य तथा ख्यातनाम उद्योजक मा. श्री. सुनिक शिर्के व वसईतील सुप्रसिद्ध उद्योजक मा. श्री. पुरुषोत्तम पवार यांनी विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधून उद्योगक्षेत्रातील अनुभव व आठवणी सांगून विद्यार्थ्यांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी व वि. वा. इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य मा. डॉ. अनिलकुमार व श्री. शशांक पाटील यांनीही या परिसंवादामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सदर कार्यक्रमाचा १८० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

**परिसंवाद कार्यक्रम :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय समितीचे वतीने नवकोकण संस्था चिपळूणचे डी.बी.जे. महाविद्यालय, येथे दि. १५ जानेवारी २०१५ रोजी स्व. भाऊसाहेब नेवाळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'असा घडतो उद्योजक' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. उद्योजक श्री. सतीश साठे, श्री. मोरे व श्री. सुनील शिर्के यांनी परिसंवादामध्ये भाग घेतला. यावेळी व्यासपीठावर नवकोकण संस्थेचे चेअरमन मा. श्री. सुजयअण्णा रेडीज, व्हाईस चेअरमन, श्री. बाबू तांबे, डी.बी.जे. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. श्याम जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

कमी शिक्षण असले तरीही उद्योजक होता येते, हे कमी शिक्षण घेतलेल्या श्री. मोरे यांनी विद्यार्थ्यांना स्वत:च्या उदाहरणावरून पटवून दिले. श्री. सुनील शिर्के यांनीही कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थीही उद्योजक बनू शकतात, असे अनेक उदाहरणावरून पटवून दिले. महाविद्यालयातील ७० ते ८० विद्यार्थ्यांनी या परिसंवादाचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उद्योजकांनी उत्तरे दिली.

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## कार्यवृत्त

**बी. रघुनाथ स्मृतिसंध्या आयोजन व पुरस्कार वितरण**

मराठवाड्याचे भूषण असलेले ज्येष्ठ मराठी लेखक बी. रघुनाथ यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिनांक ७ सप्टेंबर रोजी हा सोहळा पार पडतो. कविसंमेलन, साहित्यिक कार्यक्रम व बी. रघुनाथ साहित्य पुरस्कार वितरण असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. मराठीतील एका लेखकाला हा पुरस्कार देऊन गौरवले जाते. आतापर्यंत ह्या पुरस्काराने मा. भास्कर चंदनशिव, मा. फ. मु. शिंदे, मा. नागनाथ कोतापल्ले आदी मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. यावर्षीचा पुरस्कार कवी कादंबरीकार मा. रमेश इंगळे उत्रादकर यांच्या 'मातीचे पाय' ह्या कविता संग्रहास देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी मुक्ता बर्वे व मिलिंद जोशी यांचा मराठी कवितांवर आधारित कार्यक्रम 'रंग नवा'चे सादरीकरण मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

याप्रसंगी ज्येष्ठ कथा-कादंबरीकार संजय भास्कर जोशी, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, नाथ ग्रुपचे सतीश कागलीवाल आदी उपस्थित होते. यंदाचे बी. रघुनाथ स्मृतिसंध्या या कार्यक्रमाचे रौप्य महोत्सवी वर्ष होते. यावर्षी नाथ ग्रुप व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद हे या कार्यक्रमाचे सहआयोजक होते.

**'सृजन' शालेय विद्यार्थ्यांकरिता आनंददायी उपक्रम**

विभागीय केंद्र औरंगाबाद व क्लोवरडेल हायस्कूल, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना कलांची ओळख व्हावी या हेतूने दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. ११ जानेवारी २०१५ रोजी सृजन या उपक्रमाची सुरुवात क्लोवरडेल हायस्कूल मध्ये सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत करण्यात आली होती. सृजनची सुरुवात 'धागा धागा अखंड विणूया'' (धाग्यांपासून शोभेच्या वस्तू बनविणे) या कार्यक्रमापासून झाली. या उपक्रमात ५ शाळांमधील सुमारे २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या उपक्रमात विविध प्रकारच्या धाग्यांपासून कलात्मक व शोभेच्या वस्तू बनविण्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. विविध प्रकारचे धागे, मातीची भांडी, फॅब्रिक कलर्स आदींचा वापर करून फुलदाणी तयार करणे, धाग्यांच्या माळा बनविणे हे प्रकार विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रा. त्रिशूल कुलकर्णी, क्लोवरडेल हायस्कूलचे कला शिक्षक अंकुश सर, यशवंत कला महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्षाला शिकणारे कमलेश पाटील व रोहित चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमात वस्तू बनविण्यासाठी लागणारे साहित्य हे विभागीय केंद्राकडून पुरवण्यात आले. यावेळी सुबोध जाधव, दीपक जाधव, क्लोवरडेल हायस्कूलच्या मुख्याध्यापिका मिता कपूर, राजेंद्र वाळके, जयश्री कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

# विभागीय केंद्र, नागपूर

## कार्यवृत्त

**कल्पना एक आविष्कार अनेक:**

नाट्यस्पर्धा - रविवार दि. १४ सप्टेंबर, २०१४. विभागीय केंद्र, नागपूर, राष्ट्रभाषा परिवार, नागपूर आणि अस्तित्व पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'कल्पना एक आविष्कार अनेक' या विषयावरील नाट्यस्पर्धेचे आयोजन रविवार दि. १४ सप्टेंबर २०१४ रोजी राष्ट्रभाषा सभेच्या सभागृहात आयोजित करण्यात आले.

**'इच्छामरण' - एक परिचर्चा :**

शुक्रवार दि. १९ सप्टेंबर, २०१४. विभागीय केंद्र, नागपूर व अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'इच्छामरण' एक परिचर्चा या एका आगळ्यावेगळ्या व संवेदनशील विषयावरील विचारमंथन कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार दि. १९ सप्टेंबर, २०१४ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. डॉ. कुमार शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी मा. डॉ. शिशिर पळसापुरे, ॲड. वृषाली प्रधान, माधुरी साकुळकर हे सहभागी जाले.

**नाना ढाकुळकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली :**

बुधवार दि. २४ सप्टेंबर, २०१४. ज्येष्ठ नाटककार नाना ढाकुळकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विदर्भ साहित्य संघात मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभेचे आयोजन झाले. याप्रसंगी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी बोलत होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूर व विदर्भ साहित्य संघ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांच्या संयुक्तपणे आयोजित केलेल्या या सभेत डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. रविंद्र शोभणे, वामन तेलंग, मदन गडकरी, प्रमोद भुसारी व प्रफुल्ल फरकसे व्यासपीठावर उपस्थित होते.

मनोहर म्हैसाळकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. सभेचे शेवटी सर्व उपस्थितांनी मूक उभे राहून नानांना श्रद्धांजली अर्पण केली.

**'प्रात:स्वर - २०१४':**

मंगळवर, दि. २१ ऑक्टोबर, २०१४. विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दिवाळीनिमित्त 'प्रात:स्वर २०१४' या 'थाट'-रंगावर आधारित थाटांच्या आश्रयरागांची मैफल कार्यक्रम दि. २१ ऑक्टोबर, २०१४ रोजी सकाळी ६.०० वाजता कीर्तनकेसरी भाऊसाहेब शेवाळकर सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे मा. श्री. समीर सराफ, मा श्री. प्रेमबाबू लुनावत व मा. डॉ. प्रमोद मुनघाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी मा. साधना शिलेदार, सुगंधा लातुरकर, मिलिंद इंदूरकर, अथर्व भालेराव हे कलाकार उपस्थित होते.

कार्यक्रमाची संकल्पना - मा. सौ. साधना शिलेदार, संगितकार - मा. श्री. सचिन बक्षी (तबला) आणि मा. संदीप गुरुमले (संवादिनी), निवेदन - मा. रजनी-हुद्दा यांचे होते.

**पुरस्कार वितरण समारंभ :**

सोमवार दि. २७ ऑक्टोबर, २०१४. महाराष्ट्रातील प्रख्यात कवयित्री स्व. अरुणाताई पवार-चवरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विदर्भस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला नवोदितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेला बक्षीस वितरण समारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूर व युवा स्पंदन सामाजिक व सांस्कृतिक, साहित्य सेवा संस्था नागपूरच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. २७ ऑक्टोबर, २०१४ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे खालील मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी व मा. प्रा. जैमिनी कडू हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**स्व. यशवंतराव चव्हाण यांची ३०वी पुण्यतिथी :**

दि. २५ नोव्हेंबर, २०१४. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३०व्या पुण्यतिथीदिनानिमित्त 'यशवंतराव चव्हाण यांची साहित्यिक व सामाजिक दृष्टी' या विषयावर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन मंगळवार दि. २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी मा. श्री. धनराज वंजारी, निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते.

**गंधर्वगीते :**

दि. १ डिसेंबर, २०१३. विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दिवंगत ना. बा. उपाख्य नानासाहेब गोखले ह्यांच्या प्रथम मासिक स्मृतिदिनानिमित्त बालगंधर्वांच्या अजरामर नाट्यपदांचा 'गंधर्वगीते' या कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दि. १ डिसेंबर, २०१४ रोजी सायं. ६.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी व मा. श्रीमती नीला फडणवीस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मा. श्री. विवेक गोखले, मा. रुपाली बक्षी (अकोला), मा. डॉ. साधना शिलेदार, मा. विशाखा मंगदे हे कलाकार उपस्थित राहतील. संगीतकार - मा. श्री. राम ढोक (तबला), मा. श्री. संजय इंदूरकर (संवादिनी), निवेदन - मा. श्री. प्रकाश एदलाबादकर यांचे होते.

**सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा :**

दि. २५ डिसेंबर, २०१४. विभागीय केंद्र नागपूर शिक्षण उपसंचालक, महापालिका शिक्षण विभाग, रायसोनी ग्रुप, रामन विज्ञान केंद्र आणि अक्षरभूषण मधुकर भाकरे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचा पारितोषिक वितरणाच्या वेळी सुधार कोहळे बोलत होते. या कार्यक्रमाला महापौर श्री. प्रवीण दटके, अभिनेत्री राधिका देशपांडे, तरुण भारतचे मुख्य संपादक गजानन निमदेव, नगरसेवक बंडू राऊत, रश्मी फडणवीस, रामन विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक श्री. विश्वनाथ जोशी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष अण्णाजी मेंडजोगे, नारायण समर्थ, हेमंत सोनारे, राजाभाऊ चिटणीस उपस्थित होते. यावेळी सरस्वती विद्यायाच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका जानकी गणेशन यांचा शिक्षक जीवन पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. त्यांना २१ हजार रोख शाल श्रीफळ व मानपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय भाकरे तर अभय भाकरे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

या स्पर्धेतील पारितोषिक विजेते - गट अ - वर्ग ८ ते १० अमिषा कारेमोरे (केशवनगर माध्यमिक शाळा), साक्षी तल्हार (जामदार हायस्कूल, रेशिमबाग), ऐश्वर्या संजय झाले (साऊथ पॉईंट स्कूल), आकांक्षा मनोज वैद्य (केशवनगर माध्यमिक शाळा), हर्षल प्रदीप बोरकर (विवास माध्यमिक शाळा), रूपशुक पाटील (भारतील विद्या भवन, सिव्हील लाइन्स), मार्गी निमदेव (सोमलवार हायस्कूल), तन्वी लोखंडे (राजेंद्र हायस्कूल). माध्यमिक गट - वर्ग ५ ते ७ - यश लोही (केशवनगर माध्यमिक शाळा), दिशा जिभकाटे (सोमलवार रामदासपेठ), अनुष्का पाटील (पं. बच्छराज व्यास विद्यालय), श्रुती नाकाडे (सेंट झेवियर्स), कस्तुरी बेलन (सोमलवार हायस्कूल, रामदासपेठ), अर्थव प्रशांत अहिरराव (केशवनगर माध्यमिक शाळा), श्रुती गजभिये (बी.जी.एम. गर्ल्स हायस्कूल), कल्याणी सिरसाम (जाईबाई चौधरी

ज्ञानपीठ शाळा). प्राथमिक गट - वर्ग १ ते ४ - विभूती वंजारी (नवयुग प्राथमिक शाळा), अनुष्का मोहुर्ले (यशोदा मराठी प्रा. शाळा), गोविंद जावळे (नवयुग प्राथमिक शाळा), श्लोक आनंद गांधी (बी.पी. विद्या भवन्स), अनिरुद्ध मुठाळ (भारती कृशन विद्या विहार), प्राची हांडे (यशोदा प्रा. मराठी शाळा).

**लिहित्या स्त्रियांची तृतीय कार्यशाळा:**

दि. २७ व २८ डिसेंबर २०१४. माहेर संस्थेद्वारा प्रकाशित 'आकांक्षा' मासिक आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने द्विदिवसीय विदर्भस्तरीय लिहित्या स्त्रियांची तृतीय द्विदिवसीय कार्यशाळा शंकरनगरातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित करण्यात आली.

**लेखन-प्रकाशन व्यवहार कार्यशाळा:**

दि. ६ जानेवारी, २०१५. विभागीय केंद्र, नागपूर आणि स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने लेखन-प्रकाशन व्यवहार कार्यशाळेचे आयोजन श्रीमंत बाबुराव धनवटे साभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे मंगळवार दि. ६ जानेवारी, २०१५ सकाळी ११ ते ३ पर्यंत करण्यात आले. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी, अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ कवी मा. श्री. प्रभू राजगडकर व कार्यशाळा मार्गदर्शक मा. श्री. श्याम पेठकर ज्येष्ठ लेखक व संपादक उपस्थित होते.

**'चालता-बोलता वर्षारंभ अंक'**

शुक्रवार दि. ९ जानेवारी २०१५. अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नागपूर संयुक्तपणे २०१५ या वर्षाचे स्वागत एका अभिनव कार्यक्रमाने करण्यात आले. शुक्रवार दि. ९ जानेवारी २०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता राष्ट्रभाषा संकुलाच्या श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृहात 'चालता-बोलता वर्षारंग अंक' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विशेषांकात असणारी सर्व सदरे व्यासपीठावरून सादर करण्याचा हा आगळावेगळा उपक्रम होता.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीशजी गांधी यांनी प्रसंगी व्यासपीठावरून शुभेच्छा संदेश दिला. 'शहीद एक सामाजिक भान' या विषयावरील अनुराधा फडणवीस यांचे, स्वानुभवावर आधारित विचार प्रकटन हे या अंकाचे प्रमुख आकर्षण होते. शिवाय शर्मिला महादेवकर यांची खुसखुशीत वऱ्हाडी कथा शुभा साठे यांनी सादर केली. पुन:प्रत्ययाचा काव्यानंद, श्रीमती साठे यांची मिश्किली तर माला केकतपुरे लिखित पथ्य ही नाट्यछटा अशी विविध सदरे सादर केली. अंकाचे मुखपृष्ठ पूर्वा गंगाखेडकर तर मलपृष्ठ योगाभ्यासी मंडळ नागपूर यांच्या सौजन्याने सजलेले होते. या अंकाचे संपादन सुप्रिया अय्यर यांचे व संयोजन हेमा नागपूरकर यांचे तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संकल्पना स्वाती सुरंगळीकर यांची होती.

# विभागीय केंद्र, कराड

## कार्यवृत्त

**आदरणीय स्व. पी. डी. पाटील साहेब यांची पुण्यतिथी -** (१७ सप्टेंबर २०१४)

विभागीय केंद्र कराड आणि सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने पुण्यस्मरण करण्यात आले. सौ. वेणुताई स्मारकात आदरणीय स्व. पी. डी. पाटील साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले वाहण्यात आली. संपूर्ण दिवसभर मोठ्या प्रमाणावर नागरिक बंधू भगिनी, कराड नगर पालिकेच्या नगराध्यक्षा, नगरसेवक, नगरसेविका सौ. वेणूताई स्मारकातील प्रतिमेस अत्यंत आदराने अभिवादन करीत होते.

सायंकाळी श्री. व सौ. ताम्हणकर यांनी आयोजित केलेल्या संगीत भजनाचा कार्यक्रम झाला.

**करिअर गायडन्स व्यक्तिमत्त्व विकास शिबीर** (दि. २३ सप्टेंबर २०१४)

विभागीय केंद्र कराड आणि देवराष्ट्रे या ठिकाणी मा. संजीव लाटकर ज्येष्ठ माध्यम तज्ज्ञ व दैनिक सकाळचे माजी संपादक यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. या कर्यक्रमासाठी मुंबई प्रतिष्ठानचे अधिकारी श्री. संजय बनसोडे आवर्जून उपस्थित होते. यावेळी व्यक्तिमत्त्व विकासाबाबत सौ. शुभांगी लाटकर व मानसोपचारतज्ज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे यांच्या व्हिडीओ क्लिप दाखविण्यात आल्या. त्यांच्या मते प्रत्येकाने कोणतेही काम आत्मविश्वासाने केले पाहिजे. आपले व्यक्तिमत्त्व हे आपले बोलणे व चेहऱ्यावरील हावभाव अशा एकूण ३२ फॅक्टरने तयार होते, वेळेचे नियोजन ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे आणि योग्य आखणी करून वेळेचा पुरेपूर वापर करा. आपले ध्येय ठरवा, आत्मविश्वासाने कामाला लागा, असे मार्गदर्शन शाळेच्या मुलांना त्यांनी केले.

बालदिन ( १४ नोव्हेंबर २०१४ )

विभागीय केंद्र कराड यांच्या वतीने सौ. वेणूताई चव्हाण हॉलमध्ये मा. नितीन शिंदे, श्री. भास्कर सदाकळे, मा. संजय बनसोडे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमामध्ये इ. ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना अंधश्रद्धा व विज्ञानासंबधी सप्रयोग माहिती सांगितली.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात हजर होते. अंगात येणे, भूतेखेते यावर सप्रमाण माहिती सांगितली गेली.

**स्व. यशवंतरावजी चव्हाण पुण्यतिथी**

मा. शरदचंद्र पवार यांनी प्रीतीसंगमावरील यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पचक्र वाहत आपली आदरांजली वाहिली. सौ. वेणूताई चव्हाण सभागृहातील पुतळ्यास मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली. सन्माननीय रामराजे नाईक निंबाळकर, शशिकांत शिंदे, देवराज पाटील प्रतिष्ठानच्या कराड विभागाचे अध्यक्ष मा. आमदार बाळासाहेब पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले व आभारही मानले, त्यानंतर सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टची मिटिंग झाली. मा. पवारसाहेब यांनी पत्रकार परिषद घेऊन मनोगत व्यक्त केले. पत्रकारांबरोबर सुसंवाद झाला.

सायंकाळी ४.३० वाजता सजविलेल्या रथामध्ये स्व. यशवंतरावांची प्रतिमा ठेवून सौ. वेणूताई ट्रस्ट ते यशवंतराव सभाधीस्थळ पदयात्रा काढण्यात आली. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, सौ. वेणूताई कला वाणिज्य महाविद्यालय, ति. विठामाता हायस्कूल, शिवाजी हायस्कूल त्याचप्रमाणे शिक्षण मंडळ कराडच्या टिळक हायस्कूल, सारोटी कन्या शाळा, महिला विद्यालय मधील प्राचार्य,

मुख्याध्यापक, प्राध्यापक, प्राध्यापिका या पदयात्रेत मोठ्या प्रमाणात सामील होत्या.

समाधीस्थळी मान्यवरांनी स्व. यशवंतराव यांच्या आठवणी सांगितल्या.

सन्माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त वर्षभर कार्यक्रम होणार आहेत (१२ डिसेंबर २०१४) या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दि. १३ डिसेंबर २०१४ रोजी सायंकाळी ५ वाजता गच्चीवरील शेती कार्यक्रम (फक्त महिलांसाठी) आयोजित केला. मा. प्रशांत शिंदे मुंबई यांचे भाषण आयोजित केले होते. या कार्यक्रमासाठी मा. दत्ता बाळसराफ, श्री. बनसोडे हजर होते. आजी माजी नगराध्यक्षा व मोठ्या संख्येने नागरिक या कार्यक्रसाठी उपस्थित होते.

**अपंग शिबीर -** (१४ डिसेंबर २०१४)

कराड शहर व परिसरातील अपंग कर्णबधीर, अस्थिव्यंग यांसाठी हे शिबीर प्रतिष्ठानच्या वतीने सौ. वेणूताई चव्हाण स्मारक येथे आयोजित केले (स. १० ते सा. ५) या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानच्या वतीने तज्ज्ञ डॉक्टर व विजय कान्हेकर व इतर ५ डॉक्टरांचे पथक जातीने हजर होते. मा. दत्ता बाळसराफ, मा. संजय बनसोडे हजर होते. यावेळी २७ कर्णबधीर व १७ अपंग यांची तपासणी करण्यात आली.

सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे सदस्य श्री. नंदकुमार बटाणे, श्री. बाबूराव किवळकर आदी लोक हजर होते.

# विभागीय केंद्र, नाशिक
## कार्यवृत्त

नाशिक विभागीय केंद्राच्या विविध कार्यक्रमांसाठी विश्वास को-ऑप. बँक, नाशिक; विश्वास ज्ञानप्रबोधिनी अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, विश्वास कम्युनिटी रेडियो ९०.८ एफएम, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, सृजन कन्सल्टंट्स, नाशिक या संस्थांचे व त्यांच्या प्रतिनिधींचे सहकार्य मिळाले.

**'जमिनीवरचे तारे' माहितीपटाचे स्क्रिनिंग**
(शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०१४)

'जमिनीवरचे तारे' या माहितीपटाचे स्क्रिनिंग संस्थेच्या गंगापूर रोड येथील सभागृहात संपन्न झाले. यावेळी दीडशेचे वर विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक उपस्थित होते.

विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व दिशा शैक्षणिक उपक्रमाच्या सुधा मेहता यांच्या प्रयत्नांतून श्रमिक, कष्टकरी व मजूर कुटुंबातील विशेषत: आनंदवल्ली व परिसरातील निम्न मध्यमवर्गीय तसेच आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकातील मुलांमध्ये शिक्षणाविषयी जाणीव जागृती निर्माण व्हावी, त्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी प्रेरित व्हावे या उद्देशाने सदर उपक्रम मागील आठ वर्षांपासून अविरत सुरू आहे. 'दिशा' या स्तुत्य शैक्षणिक उपक्रमाची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विश्वास ज्ञान प्रबोधिनीद्वारे 'जमिनीवरचे तारे' ह्या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली आहे.

खासगी क्लासेसची फी भरू न शकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी गोडी निर्माण होऊन चांगल्या दर्जाचे शिक्षण प्राप्त होण्यासाठी इयत्ता पहिली ते दहावीचे वर्ग या उपक्रमांतर्गत चालविले जातात. हे वर्ग चालविण्याकरिता सामाजिक कार्याची आवड असणारी अनुभवी शिक्षक मंडळी म्हणून कल्पना ओहळ, संगीता कुलकर्णी, दीप्ती, प्रीती, रेखा, कोमल, स्नेहल कुलकर्णी व सुधा मेहता परिश्रम घेतात. आतापर्यंत ५००च्यावर विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी सदर उपक्रमाचा लाभ घेतलेला आहे. याच उपक्रमात शिकलेल्या रेखा व कोमल या विद्यार्थीनी आता शिकविण्याचे काम करतात ही दिशा शैक्षणिक उपक्रमाची उपलब्धी आहे. तसेच या उपक्रमाचा लाभ घेतलेले अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी मोठ्या उत्साहाने प्रयत्शील आहेत. काही विद्यार्थी नोकरी मिळविण्यात यशस्वी झाले आहेत.

**द बँडस व्हिजिट - इस्त्रायली भाषेतील चित्रपट**
(शनिवार दि.१३ सप्टेंबर २०१४)

सुप्रसिद्ध दिग्दर्शक एरान कोलीरीन यांचा 'द बँडस् व्हिजिट' हा इस्त्रायली भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

इस्त्रायल हा छोटासाच देश व कायम युद्धग्रस्त व सततच्या राजकीय घडामोडींमुळे माध्यमांमध्ये चर्चिला जाणारा. साहजिकच इस्त्रायलचे अनेक चित्रपट युद्धाची पार्श्वभूमी संघर्ष, तणाव ह्यांचेच दर्शन घडवितात. परंतु 'द बँडस व्हिजिट' हा आगळावेगळा विनोदी चित्रपट आपल्याला त्या सर्वांच्या पलीकडचा सर्वसामान्य लोकांची दुसरी बाजू दाखवितो. इजिप्त हा खरा शत्रूपक्षातला परंतु तेथील आठ जणांचे पोलिस वाद्यवृंद दल इस्त्रायलमध्ये अरब कल्चरल सेंटरचे उद्‌घाटन करण्याच्या निमित्ताने येते. त्यांच्या स्वागताला कोणीच नाही म्हणून ते भांबावून जातात व चुकीच्या गावात पोहोचतात. असा दोन वेगळ्या संस्कृतीतील लोकांचा अचानकपणे जुळून आलेला योग अनेक मर्म प्रसंगांना जन्म देतो.

## शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'संवाद कौशल्य' कार्यशाळा

(शनिवार, दि.२० सप्टेंबर २०१४)

माहितीची देवाणघेवाण करणे, भावना व्यक्त करणे, समस्या सोडविणे, स्वतःला व इतरांना प्रोत्साहित करणे, निर्णय घेणे अशा उद्दिष्टांच्या पलीकडे जाऊन संवादाकडे बघितले जाते. संवादाचा मूळ उद्देश हा केवळ गरज भागविणे नसून, नातेसंबंध दृढ करणे हा आहे. चांगले नेतृत्व घडविण्यासाठी संवाद कौशल्याचे गुण आत्मसात करून प्रभावी संवाद साधल्यास यशाचे शिखर नक्की गाठता येते, असे प्रतिपादन संवादतज्ज्ञ राजेश हिवरे यांनी केले. उपक्रमांतर्गत 'संवाद कौशल्य' कार्यशाळा संस्थेच्या गंगापूर रोड येथील सभागृहात संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते.

सदर कार्यशाळेत सहभागी प्रशिक्षणार्थींना संवाद कलेची संकल्पना श्री. हिवरे यांनी समजून सांगितली. संवाद चांगला होण्यासाठी दुसऱ्यांचे ऐकून घेणे महत्त्वाचे आहे. आपले नेतृत्व वृद्धिंगत करण्यासाठी आवश्यक संवाद कौशल्य आणि व्यापक दृष्टिकोन निर्मिती, बोलण्यातील अडथळ्यांचा चिकित्सक अभ्यास करून ते सोडविण्याचे कौशल्य आत्मसात करून विषयांची चौफेर व प्रभावी मांडणी करता आली पाहिजे. आत्मविश्वासपूर्वक संवाद साधल्यास विषय लवकर समजून येत असल्याची माहिती श्री. हिवरे यांनी दिली.

माहितीपट, खेळ, पोस्टर्स, चर्चासत्र अशा वेगवेगळ्या माध्यम सत्रांचा वापर करून संवाद कौशल्याचे धडे देण्यात आले. देहबोली, आवाज, भाषा, मांडणी, संवेदनशीलता, नजर आत्मविश्वास अशा संवाद व संभाषण कौशल्यातील महत्त्वाच्या मुद्यांवर प्रशिक्षणार्थींची मते जाणून घेण्यात आली. मनातील भीती व पूर्वग्रह नष्ट करून प्रभावी संवाद साधण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

## शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'मुलांच्या अंगी असलेल्या टॅलेंटची जोपासना' व्याख्यान : मार्गदर्शक - संजीव भामरे

(शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०१४)

विद्यार्थ्यांमधील टॅलेंटची जोपासना करण्यासाठी पालकांनी त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी त्यांना स्वतंत्रपणे विचार करू द्यावा. बदलते भाषिक पर्यावरण, माहिती व तंत्रज्ञान, शिक्षणाची भाषा व रोजच्या व्यवहारातली भाषा, जगण्यातील रोजचे अनुभव यातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असतो. गतिमान जीवनशैलीमुळे विद्यार्थ्यांच्या आवडी इतक्याच करिअरच्याही संधी निर्माण होत आहेत. त्यासाठी पालकांनी त्यांच्यात आत्मविश्वास जागविण्याचे काम करावे, असे प्रतिपान टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसमधून निवृत्त झालेले संजीव भामरे यांनी केले.

'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'मुलांच्या अंगी असलेल्या टॅलेंटची जोपासना' या विषयावर प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, साहित्य, कला अशा क्षेत्रातील मुलांचा कल त्यांच्या मानसिकतेला बळ देत असतो. गणित, इंग्रजीसारखे विषय हसत खेळत व मनोरंजनाच्या माध्यमातून शिकवल्यास त्यांच्यात आवड निर्माण होते. शाळेतल्या शिक्षणाबरोबरच निसर्गातील शिक्षणही त्यांच्यासाठी आनंददायी आहे. त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे न लादता सुसंवाद व समजून घेण्याची प्रक्रिया वेगाने करण्याची गरज आहे.

## वाजदा - अरेबिक भाषेतील चित्रपट

(शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०१४)

सुप्रसिद्ध दिग्दर्शका हैफा अल् मन्सूर यांचा 'वाजदा' हा अरेबिक भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

सौदी अरेबियासारख्या तेलसंपन्न परंतु काहिशा पुराणमतवादी देशातील हा पहिला पूर्ण लांबीचा व तोसुद्धा एका तरुण स्त्री दिग्दर्शिकेने दिग्दर्शित केलेला

चित्रपट आहे. ही एका 'वाजदा' नावाच्या दहा वर्षाच्या रियाध महानगराच्या एका उपनगरात राहणाऱ्या मुलीची कथा आहे. सायकल विकत घेण्यासाठी ती आपल्या आईच्या मागे लागते व त्याकरिता पैसेही जमा करते. तिच्या ह्या छोट्या व साध्या इच्छेच्या मार्गातले असंख्य अडथळे व तिचा सायकल चालविण्याचा प्रयास एकविसाव्या शतकातील सौदी अरेबियाच्या समाजावर झगझगीत प्रकाश टाकतो.

**द अनबरीड मॅन - हंगेरियन भाषेतील चित्रपट**

(शनिवार, दि. ११ ऑक्टोबर २०१४)

सुप्रसिद्ध दिग्दर्शक मार्ता मेस्झारोस यांचा 'द अनबरीड मॅन' हा हंगेरियन भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

हंगेरीच्या विसाव्या शतकाच्या इतिहासातील इम्रे नागी यांची कारकीर्द ही लक्षणीय घटना म्हणून नोंदवावी लागेल. कम्युनिस्ट राजवटीच्या इतिहासात वॉर्सा करार देशांतून फुटून बहपक्षीय लोकशाहीची जाहीर मागणी व त्यासाठी जनआंदोलनाला पठिंबा देणारे ते पहिले कम्युनिस्ट नेते होते. ऑक्टोबर १९५६ मध्ये सुरू झालेला घटनाक्रम रशियाचे हंगेरीवरचे आक्रमण, इम्रे नागी यांची अटक, चौकशी व फाशी असा होत पुढे ३१ वर्षे नागी एका नाही चिरा, नाही पणती अशा थडग्यात विसावतात. १९८९ मध्ये संपूर्ण पूर्व युरोपातील क्रांतीकारी राजकीय घटनांनंतर नागी यांचे राजकीय पुनर्वसन होते याचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रण ह्या चित्रपटात केले आहे. हा एक प्रकारचा डॉक्यु ड्रामा आहे पण एखाद्या राष्ट्राच्या इतिहासात घडलेल्या घटनांचा पट पडद्यावर कसा चितारावा याचा आदर्श वस्तुपाठ आहे.

**सुलेखन कार्यशाळा**

**सादरकर्ते - सुप्रसिद्ध कॅलिग्राफर ( सुलेखनकार ) व चित्रकार अच्युत पालव**

(गुरुवार दि. ३० ऑक्टोबर २०१४ ते रविवार दि. ०२ नोव्हेंबर २०१४)

अक्षरे हे माणसांना जोडण्याचे, आपुलकी, जिव्हाळ्याचे प्रतीक म्हणून काम करत असतात. मानवी स्वभावाइतक्याच संवेदना अक्षरांना व त्यांच्या अर्थांना असतात. अक्षरांचे सौंदर्य हे मनातील घटनांचा अविष्कार असते म्हणूनच अक्षरसाधना ही नेहमीच आनंद निर्माण करणारी प्रक्रिया आहे. यासाठी वयाची अट नसून मेहनत व शिकण्याची तयारी हवी. चांगले वाचून लिहिण्याची प्रेरणा म्हणजेच अक्षर संवेदनांची जोपासना करणे होय, असे प्रतिपादन ख्यातनाम कॅलिग्राफर अच्युत पालव यांनी केले. यांच्या मार्गदर्शनाखाली चार दिवसीय कॅलिग्राफी कार्यशाळेचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते. अच्युत पालव यांनी अक्षर लेखनातील बदलत्या शैली, प्रयोगशीलता, माध्यमे यांचा आढावा घेतला.

अक्षरांतील चित्रांचे, भावनांचे, अक्षरातला आशय आपल्या प्रात्यक्षिकांतून प्रभावीपणे दाखवत अच्युत पालव यांनी कलारसिकांना सुलेखनाची अपूर्व भेट दिली. 'पाऊस' या शब्दांतील पावसाचे विभ्रम, 'लता' या शब्दांतील सुरांची तरलता, 'सुंदर' शब्दातील देखणेपण अशा अनेक रोजच्या व्यवहारातील अक्षरांना चित्ररूप दिले. कॅलिग्राफीतून मनातल्या भावनांचे रूपच नकळतपणे व अभिनवपणे समोर आले. चित्रास गीत-नृत्य अशा त्रिवेणी संगमातून कॅलिग्राफीचा प्रयोगशील अविष्कार उपस्थितांना अचंबित करून गेला.

**तुलपान ( ट्युलिप ) - कझाक ( रशियन ) भाषेतील चित्रपट**

(शनिवार, दि. १ नोव्हेंबर २०१४)

सुप्रसिद्ध दिग्दर्शक सर्गेई डॉरटसेव्हाय यांचा 'तुलपान (ट्युलिप)' हा कझाक (रशियन) भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

हा चित्रपट अफाट पसरलेल्या गवताळ कुरणांच्या कझाकस्तानचा व त्यातील उसा व तुलपान (ट्युलिप) ह्या तरूण जोडीच्या लग्नाची कथा सांगणारा

आहे. अर्थातच कझाकस्तानचा भूभाग हा या सिनेमाचा अविभाज्य अंग बनला आहे. रशियन नेव्हीतून निवृत्ती घेतलेला उसा आपल्या गावी परत येतो व मेंढपाळीच्या पारंपारिक व्यवसायात लक्ष घालण्याचे ठरवितो. त्याचे लग्न तुलपानबरोबर ठरते पण ती त्याला चक्क लंबकर्ण म्हणून नाकारते. ह्यातून एक विनोदी व आंबटगोड चित्रपट निर्माण होतो.

**'फुले वेचिता'**
**भ्रमणध्वनीवर काढलेल्या निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन**
**छायाचित्रकार - रवीना दत्तू मौळे**

(शनिवार दि. ०८ नोव्हेंबर २०१४ ते रविवार दि. १६ नोव्हेंबर २०१४)

आर्थिक परिस्थिती चांगली नसलेले, तसेच मार्गदर्शन आणि संधी मिळत नसल्याने अनेक गुणवंत उपेक्षित राहतात. अशा मुला-मुलींचे सुप्त गुण ओळखून त्यांना सहकार्य आणि प्रोत्साहन दिले, तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो, असे प्रतिपादन वनाधिपती विनायकदादा पाटील यांनी केले.

सातपूरच्या जनता विद्यालयात इयत्ता नववीत शिकणारी रवीना दत्तू मौळे या आदिवासी कोकणा विद्यार्थीनीने भ्रमणध्वनीवर काढलेल्या निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन 'फुले वेचिता' या शीर्षकाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कुसुमाग्रज स्मारक येथे आयोजित करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते. दैनिक सकाळचे छायाचित्रकार व नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष सोमनाथ कोकरे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

विनायकदादा पाटील पुढे म्हणाले की, सातपूर येथे मोलमजुरी करणाऱ्या आदिवासी कोकणा समाजाच्या दत्तू मौळे व यमुना मौळे यांची कन्या रवीनाने माझ्याकडून मोबाइलवर छायाचित्र कसे काढायचे हे बघितले. तिने फुलांचे छायाचित्र काढले. तेव्हा तिच्या छायाचित्राची कला अंगभूतच असल्याची जाणीव झाली. तिला सलग पाच दिवस काही वेळासाठी मोबाइल दिला असता, तिने शेकडो पानाफुलांची छायाचित्रे काढली. त्यातील निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

सोमनाथ कोकरे म्हणाले की, छायाचित्रणात कला आणि शास्त्र यांचा संबंध आहे. कलेचा भाग रवीनाने अचूक पकडला आहे. त्यासाठी तिने चौकटीचा पुरेपूर वापर केला आहे. त्यातून तिच्याकडे या कलेतील अंगभूत कौशल्ये असल्याचे जाणवते. हेमंत टकले म्हणाले की, संस्कृती आणि परंपरा लुप्त होत असताना उपजत कला शोधणे हा आनंदाचा भाग आहे. प्रदर्शनास रवी गुरनानी, तंत्रज्ञ योगेश गामणे, दीपक बहादरे, कविता गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

**शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत**
**'जागर अभ्यासाचा' या विषयावर कार्यशाळा**
**मार्गदर्शक - शंतनु गुणे**

(रविवार दि. ०९ नोव्हेंबर २०१४)

काळाच्या ओघात पुस्तकांची जाडी वाढली आहे, शैक्षणिक क्षेत्रात स्पर्धा वाढली आणि त्यातूनच पालकांमध्येही तगमग वाढली. आपल्या पाल्याने सातत्याने अभ्यास करावा, चांगले गुण मिळवावे अशा अपेक्षा वाढल्या असल्या तरी त्यातूनच मुलांवर तणाव वाढला, परीक्षेच्या पद्धतीविषयी भीती वाढली. यावर साधासोपा उपाय म्हणजे प्रभावी व लक्षपूर्वक अभ्यास होय. शिक्षण पद्धतीत अभ्यासाविषयक दृष्टिकोन हा मार्कांभोवतीच ठिरत असतो आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला यामुळे खीळ बसत असते, असे प्रतिपादन सृजन कन्सलटन्टचे शंतनु गुणे यांनी केले.

'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावरील कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये अभ्यासाविषयी सकारात्मक जाणीव निर्माण करण्यासाठी शिक्षक व

पालकांनी महत्त्वाची भूमिका निभावावी. विविध खेळ, सुसंवाद यातून हे साध्य होऊ शकते. अभ्यास म्हणजे काय व तो कसा करावा यावर मुद्देसूद व सोप्या पद्धतीने मार्गदर्शन करून त्यांच्या अभ्यास करण्याच्या पद्धतीमध्ये परिवर्तन घडून येऊ शकते हे शंतनु गुणे यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सोदाहरण स्पष्ट केले. स्वत:च्या अभ्यासाची जबाबदारी स्वत: घेणे व त्यातून गुणवत्ता वाढीसाठी यश मिळू शकते. संवादातून आणि कृतीमधून शिक्षण अशा प्रयोगातून अभ्यासाविषयक संकल्पना उत्तमरीत्या समजतात व त्या कशा वापराव्या हेही श्री. गुणे यांनी यावेळी सांगितले.

### यशवंतराव चव्हाण यांच्या ३०व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला सुप्रसिद्ध चित्रपट समीक्षक अनिल झणकर यांचे व्याख्यान

(सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०१४)

प्रतिमेचा आकार कॅनव्हासवर साकारत चित्र निर्मिती झाली. चित्रकलेच्या दृश्यरूपाला संगीताची जोड देत कृष्णधवल काळातील मूकपटांनी शहरी संस्कृतीची ओळख करून दिली. चित्रपटांतील ही ओळख कालौघात बदलत गेली. देश, भाषा, प्रांत, प्रदेश यांच्या बंधनातून मुक्त होऊन बदललेल्या काळाचे प्रतिबिंब चित्रपटाच्या कथानकातून उलगडत गेले. ते कधी प्रबोधनाचे माध्यम बनले, तर कधी निव्वळ मनोरंजनाचे. लोकप्रियतेचे सर्वोच्च शिखर गाठणाऱ्या चित्रपटसृष्टीचा देदीप्यमान इतिहास ख्यातनाम चित्रपट समीक्षक आणि दिग्दर्शक अनिल झणकर यांनी उलगडला.

चित्रपट चावडी उपक्रमांतर्गत महाराष्ट्राचे थोर शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या ३०व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला अनिल झणकर यांचे 'चित्रपटातील शहरं' या विषयावर दृकश्राव्य व्याख्यानाचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते. त्याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, कॅनव्हासवर साकारलेले चित्र म्हणजे सुंदर कलाकृती. काळ बदलला मात्र, ती कलाकृती स्थिर राहिली अर्थात त्या चित्रातून व्यक्त होणारी भावना मर्यादितच राहिली. अव्यक्त होणारी ही भावना, चित्राची व्याप्ती व्यापक करण्याचे काम जर्मनी व फ्रान्समधील मूकपटांनी केले. शहरी संस्कृतीची ओळख त्या काळात चित्रपटांतून होत गेली. काळ बदलत गेला अन् कथानकाचे अंगही बदलले. ध्वनी अन् संवादाला उत्तम सौंदर्यस्थळांची जोड मिळत गेल्याने चित्रपटांचे माध्यम लोकप्रिय बनले.

अनिल झणकर यांचा परिचय राजेश हिवरे यांनी करून दिला तर सन्मान प्रतिष्ठानचे विश्वस्त व उपमहापौर गुरुमित बग्गा यांनी केला.

### शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावर कार्यशाळा मार्गदर्शक - शंतनु गुणे

(गुरुवार दि. २७ नोव्हेंबर २०१४)

'जागर अभ्यासाचा' या कार्यशाळेत अभ्यास म्हणजे काय, प्रभावी अभ्यास म्हणजे काय, या प्रश्नांची उत्तरे कृतीद्वारे व चर्चेद्वारे शंतनु गुणे यांनी करून घेतली. अभ्यास व उत्तम गुणवत्तेचे नाते म्हणजे काय, हे त्यांनी विविध प्रयोगातून समजावून सांगितले. उत्तम अभ्यास कधी होतो, त्यासाठी चंचल मनाला कसे शांत करायचे, एकाग्रता कशी वाढवावी, याची सोपी व प्रभावी तंत्रे त्यांनी समजावून सांगितली. याचबरोबर अभ्यासामध्ये आपण कुठे आहोत हे समजून घेण्याबरोबरच अभ्यासाचे नियोजन कसे करावे याच्या महत्त्वपूर्ण टिप्सही शंतनु गुणे यांनी दिल्या.

त्यानंतर गोल सेटिंग आणि स्मार्ट ॲक्शन प्लॅन या संकल्पना खेळातून समजावून सांगितल्या. या कार्यशाळेत महत्त्वाचा आणखी एक भाग म्हणजे पालक सभा होय. दिवसभरात विद्यार्थ्यांना जे जे शिकवले ते पालकांपर्यंत पोहोचवले जाते व त्यांच्याही शंकांचे निरसन केले जाते.

प्रभावी अभ्यासाचे आव्हान विद्यार्थी व पालक यांनी मिळून पेलावे व नुसते मार्कार्थी न होता प्रभावी अभ्यास आनंदाने करीत गुण आणि गुणवत्ता वाढवावी

असा मंत्र शंतनु गुणे यांनी दिला.

**शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत**
**'जादू वैदिक गणिताची' या विषयावर कार्यशाळा**
**मार्गदर्शक - ललित डांगरे**
(गुरुवार दि. २७ नोव्हेंबर २०१४ ते रविवार दि. ३० नोव्हेंबर २०१४)

सुप्रसिद्ध गणितज्ञ ललित डांगरे यांच्या 'जादू वैदिक गणिताची' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते.

वैदिक पद्धतीचा वापर करून जलद, अचूक व सोप्या पद्धतीने गणित सोडवता येते. त्याचबरोबर वैदिक गणितामध्ये कमी स्टेप असल्याने जलद गतीने कमीत कमी दहापट वेगाने गणित सोडवता येते. उदाहरणादाखल ललित डांगरे यांनी विद्यार्थ्यांकडून गणिते सोडवून घेतली, त्यातून विद्यार्थ्यांना शिकण्याचा अनोखा आनंद मिळाला. वैदिक गणित मनोरंजक असल्याने गणित सोडवण्याची भीती नाहिशी होते. वैदिक गणिताचा वापर करून साधारण विद्यार्थीसुद्धा गुणाकार, भागाकार, बेरीज-वजाबाकी, वर्ग, वर्गमूळ, घन, घनमूळ आश्चर्यकारक वेगाने सोडवतात. निरनिराळ्या प्रकारच्या पेपर सोडवण्याचा वेग महत्त्वाचा असल्याने त्या ठिकाणी ही पद्धत फारच उपयोगी ठरते. एकाग्रता वाढण्यास यामुळे मदत होते. याचे प्रात्यक्षिक निवडक विद्यार्थ्यांकडून त्यांनी करून घेतले, त्यास विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

**लस्ट फॉर लाइफ ( इंग्रजी ) भाषेतील चित्रपट**
(शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०१४)

सुप्रसिद्ध दिग्दर्शक व्हिन्सेन्टी मिनेली (युनायटेड स्टेटस) यांचा 'लस्ट फॉर लाइफ' हा इंग्रजी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपट दाखविण्यासाठी विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ एफ.एम. यांचे सहकार्य लाभले.

जागतिक कीर्तीचा डच चित्रकार व्हिन्सेन्ट व्हॅन गॉग यांच्या जीवनावर 'लस्ट फॉर लाइफ' हा चित्रपट आधारीत आहे. ४७ वर्षांच्या आयुष्यात अत्यंत दर्जेदार व वैविध्यपूर्ण चित्रे विन्सेन्ट व्हॅन गॉग यांनी काढली आणि त्यांना जगभरातून मान्यताही मिळाली. त्यांनी हाताळलेली रंगमाध्यमे, विषय, रोजच्या जगण्यातील आणि प्रयोगशील होती. जगणे आणि कला यांचा खोलवर प्रभाव एखाद्या कलावंतावर किती असतो याचे चित्रण या चित्रपटात आहे. सुप्रसिद्ध लेखक इर्व्हिग स्टोन यांच्या 'लस्ट फॉर लाइफ' या कादंबरीवर हा चित्रपट आधारीत आहे.

**शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत**
**'जागर अभ्यासाचा' या विषयावर कार्यशाळा**
**मार्गदर्शक - शंतनु गुणे**
(रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०१४)

आजच्या आधुनिक माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना ज्ञानाविषयी अपडेट राहण्याच्या संधी आहेत त्यातून त्यांच्यातील मूलभूत ज्ञानाला दिशा मिळत असते. ज्ञानाची जोपासना करताना विद्यार्थी-शिक्षक सुसंवाद ही महत्त्वाची गरज असते. त्यातून निश्चित दिशा व जाणीव विकसित होत असते, असे प्रतिपादन सृजन कन्सलटंटचे शंतनु गुणे यांनी केले.

'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' या विषयावरील कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सदर कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली.

याप्रसंगी ते म्हणाले की, शिक्षणात अनेक विद्याशाखा निर्माण होत असून ज्ञान-तंत्रज्ञानाची नवी पिढी निर्माण होत आहे. कर्तृत्ववान व आदर्श पिढी घडवण्यासाठी दूरदृष्टी व आत्मविश्वासाची सांगड विद्यार्थ्यांनी घालावी. प्रतिकूल परिस्थितीचा सामना करून निश्चित ध्येयापर्यंत पोहचण्याची आस बाळगा. स्वयंविकासाबरोबरच समाजविकास साधण्यासाठी चांगुलपणाचीही कास धरा. एकाग्रता आणि अभ्यासाचे

नियोजन यातून घवघवीत यश मिळवा. निर्णयक्षमता वाढवून निश्चित ध्येयापर्यंत जाण्यासाठी वाट सुकर करा. चांगल्या विचारांची प्रामाणिकपणाने जग जिंका तसेच जिज्ञासावृत्ती जोपासा, हेही शंतनु गुणे यांनी यावेळी सांगितले.

**शिक्षणकट्टा उपक्रमांतर्गत**

**'जादू वैदिक गणिताची' या विषयावर कार्यशाळा**

**मार्गदर्शक - ललित डांगरे**

(सोमवार, दि. ०१ डिसेंबर २०१४ ते शुक्रवार, दि. ०५ डिसेंबर २०१४)

'शिक्षणकट्टा' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध गणितज्ञ ललित डांगरे यांच्या 'जादू वैदिक गणिताची' या विषयावरील पाच दिवसीय कार्यशाळेचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते.

वैदिक गणिताची कार्यशाळा ही विद्यार्थ्यांना आनंदाची व मनोरंजनपर ठरली. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि गणित सोडवण्याच्या पद्धती यातून गणिताविषयी गोडी वाढवण्यासाठी निश्चित मदत झाली. हसत-खेळत गणित असे या कार्यशाळेचे स्वरूप होते. आजच्या शिक्षण पद्धतीत गणिताविषयी अभिरुची, गोडी वाढण्यासाठी अशा कार्यशाळांना भरपूर प्रतिसाद मिळत असल्याचे ललित डांगरे म्हणाले.

**'स्वत:चा विकास कसा साधावा' या विषयावर कार्यशाळा**

**मार्गदर्शक - राजेश हिवरे**

तज्ज्ञ प्रशिक्षक राजेश हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वत:चा विकास कसा साधावा' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन रविवार, ७ डिसेंबर २०१४ रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते.

या कार्यशाळेत स्वत:च्या विकासाची संकल्पना स्पष्ट करताना राजेश हिवरे यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे व आव्हानांकडे खिलाडू वृत्तीने बघणे आवश्यक आहे. कार्यशाळेत स्वत:च्या विकासाची संकल्पना व विकासाचे विविध पैलू, स्वत:च्या क्षमता व कमतरता जाणून घेणे, प्रतिकूल परिस्थितीत जीवनात यशस्वी झालेल्या व्यक्तींची चरित्र ओळख करून घेणे अशा विषयांवर विविध सत्रे घेण्यात आली. चित्रफितीच्या माध्यमातून तसेच विविध खेळ व स्वत:चे कच्चे दुवे कागदावर उतरवून विद्यार्थ्यांना स्वत:चा विकास कसा साधावा याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

**मिस्टर लाझार ( फ्रेंच ) भाषेतील चित्रपट**

(शनिवार, दि. १३ डिसेंबर २०१४)

सुप्रसिद्ध दिग्दर्शक फिलिप फॉलार्डू (कॅनडा) यांचा 'मिस्टर लाझार' हा फ्रेंच भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

अमेरिका खंडाच्या (उत्तर व दक्षिण) प्रवासाची सुरुवात कॅनडाच्या 'मिस्टर लाझार' ह्या चित्रपटाने करत आहोत. मिस्टर बशीर लाझार हे मूळचे अल्जेरियीन निर्वासित क्वेबेकच्या मॉंट्रीयलचे रहिवासी आहेत. एका प्राथमिक शाळेत घडलेल्या शिक्षकाच्या द:खद मृत्यूनंतर त्यांना पर्यायी शिक्षक म्हणून त्या शाळेत नोकरी मिळते. 'मिस्टर लाझार' ह्यांचा दु:खद भूतकाळ व कॅनडामधून कधीही हाकलले जाण्याची भीती व सांस्कृतिक दरी ह्या अवस्थेत त्यांनी शाळेतल्या दु:खद प्रसंगाला सामोरे जात राखलेला तोल हा ह्या चित्रपटाचा गाभा आहे. आपले व्यक्तिगत दु:ख बाजूला ठेवून शाळेतल्या मुलांशी साधलेला संवाद व त्याला दिलेले बळ ह्यांनी हा चित्रपट एक वेगळीच उंची गाठतो. 'मिस्टर लाझार' आणि त्यांच्या प्राथमिक शाळेतील मुलांशी व सहशिक्षकांशी निर्माण झालेल्या ऋणानुबंधाच्या हिंदोळ्यावर आंदोलताना प्रेक्षकांच्या हृदयाची तार छेडून जातो.

**लोकसंवाद उपक्रमांतर्गत**

**'चित्रकलेतील सौंदर्य' या विषयावर दृकश्राव्य व्याख्यान**

**व्याख्याते - सुप्रसिद्ध चित्रकार आशुतोष आपटे**
(शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०१४)

निसर्गाच्या प्रत्येक गोष्टीत सौंदर्य आहे, त्यासाठी डोळे ही संवेदनाक्षम घटना व सत्य असते. कुठल्याही कलाकृतीचा आस्वाद हा शब्दांपलीकडे असतो तो जाणीवेतून होत असतो. कलेच्या आस्वादाची प्रक्रिया ही मनाच्या बऱ्या-वाईट अवस्थेपासून सुरू होते आणि कलेचा आशय शोषून घेण्यापर्यंत तिचा प्रवास असतो. आस्वादातून अंत:करणाचा दरवाजा उघडतो आणि त्यातूनच सौंदर्याचे अवकाश तयार होते, असे प्रतिपादन ख्यातनाम चित्रकार आशुतोष आपटे यांनी केले.

'लोकसंवाद' उपक्रमांतर्गत 'चित्रकलेतील सौंदर्य' या विषयावर आयोजित व्याख्यानात प्रतिष्ठानच्या सभागृहात ते बोलत होते.

जागतिक आणि भारतीय चित्रकलेत अनेक प्रयोग झाले आहेत आणि त्यातूनच प्रयोगशीलता आली. चित्रांचे विषय, चित्रशैली, रंगलेपन, समकालीन वास्तव व परंपरांचा मेळ कलाकृतीतून मांडण्याचे प्रयोग होत गेले आणि पारंपरिक चित्रशैलीतून सुरू झालेला प्रवास अमूर्त चित्रांपर्यंत पोहोचला आहे. यातून चित्रसाक्षरता वाढीस लागली आहे असेही श्री. आपटे म्हणाले.

**द सर्चर्स ( इंग्रजी ) भाषेतील चित्रपट**
(शनिवार, दि. २७ डिसेंबर २०१४)

सुप्रसिद्ध दिग्दर्शक जॉन फोर्ड (यू.एस.ए.) यांचा 'द सर्चर्स' हा इंग्रजी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

'चित्रपट चावडी'च्या चित्रपटांतून जगभ्रमंतीच्या टप्प्यातील पुढचा पडाव आहे अमेरिका. अमेरिका हा खरा सिनेमांचा देश. हॉलिवुडचा तेथे १९०२च्या 'ग्रेट ट्रेन रॉबरी' ह्या एडविन पोर्टरच्या चित्रपटापासून सुरू झालेला प्रवास अव्याहतपणे सुरू आहे. चित्रपटाची नुसतीच संख्या नाहीतर त्याचे विविध प्रकारही आपल्याला पाहण्यास मिळतात. उदा. सामाजिक, सांगितिक, युद्धपट, वेस्टर्न, भयपट, गुन्हेगारीपट, विज्ञानपट इत्यादी अतिभव्य, प्रचंड पैसे खर्च करून केले चित्रपट ते अत्यंत कमी खर्चात केलेल्या इंडी सिनेमामधून खूप मोठी आर्थिक उलाढाल व जगभर निर्माण केलेला प्रेक्षकवर्ग हे अमेरिकन सिनेमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हॉलिवुडचे स्टुडिओ, नट-नट्या व दिग्दर्शकांनी जगभरच्या सिनेरसिकांवर अधिराज्य गाजविले.

टिपिकल वेस्टर्न चित्रपटांच्या उतरणीच्या काळात निर्माण झालेला हा चित्रपट अप्रतिम प्रकाशचित्रण व भव्य निसर्गदृश्यांनी नटलेला आहे, शिवाय जॉन वेन सारखा कसदार अभिनेताही सोबतीला आहे. ह्यात गोष्ट आहे ती अमेरिकन यादवी युद्धात लढलेल्या एथन एडवर्डची. युद्धानंतर तो आपल्या भावाच्या टेक्सासमधील शेतावर परत येतो परंतु त्याला त्याच्या पळवून नेलेल्या पुतणीच्या शोधात कमांचे इंडियनांच्या प्रदेशात मोहिमेवर जावे लागते. एक प्रकारे एथनचा हा सुडाचा प्रवास आहे. १९५६ मध्ये प्रदर्शित झालेल्या या रंगीत चित्रपटाचा कालावधी ११९ मिनिटांचा आहे.

**डक सिझन ( स्पॅनिश ) भाषेतील चित्रपट**
(शनिवार, दि. १० जानेवारी २०१५)

सुप्रसिद्ध दिग्दर्शक फर्नांडो ऑम्बक (मेक्सिको) यांचा 'डक सिझन' हा स्पॅनिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

'चित्रपट चावडी'च्या चित्रपटांतून रसिकांनी जगभर राज्य करणाऱ्या अमेरिकन सिनेमाचा आस्वाद घेतला आहे. त्याचा शेजारी असलेल मेक्सिकोवर सुरुवातीपासून शेजाऱ्याचा फारसा प्रभाव नव्हता व त्याने आपली स्वत:ची अशी वाट चोखाळली. मुख्यत: मेक्सिकन सिनेमा हा स्पॅनिश भाषेतला असल्याने त्याचे प्रेरणास्त्रोत युरोपमध्ये होते.

यात कहाणी आहे दोन पौगंडावस्थेतील किशोरांची व त्यांच्या आई-वडिलांच्या भंगलेल्या संसाराच्या पार्श्वभूमीवरील एका आळशी रविवारची. त्यात आणखी दोन पात्रांची भर पडते आणि त्यातून प्रसंगांची एक मालिका उलगडते. मेक्सिकन समाजावर

मुलांच्या एकटेपणावर मोडणाऱ्या संसारावर भाष्य करणारा आगळा वेगळा सिनेमा हा खूप नाट्यमय नसूनसुद्धा संवादातून आणि गहिऱ्या तपशीलातून व्यक्त होतो.

**'जाणीव सामाजिकतेची' उपक्रमास प्रारंभ**

(बुधवार, दि. १४ जानेवारी २०१५)

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजांसोबतच शिक्षण हीदेखील अतिमहत्त्वाची गरज आहे. शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा मानला जातो. त्यामुळे वंचित, दुर्लक्षित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना प्राथमिक शिक्षण मिळाले तर त्यांचा शिक्षणासंदर्भातील दृष्टिकोन व्यापक होण्यास मदत होते व शिक्षणाविषयी ओढ निर्माण होऊन त्यांचे भवितव्य उज्ज्वल घडू शकते. यासाठी या विषयावर संवेदनशीलतेने काम करण्याची गरज लक्षात घेऊन 'रेडिओ विश्वास ९०.८' या समुदाय रेडिओतर्फे 'जाणीव सामाजिकतेची' या उपक्रमाच्या माध्यमातून रेडिओची माहिती, उपकरणे, कार्यक्रम, निर्मिती प्रक्रिया इत्यादी बाबतची माहिती सामाजिक व शैक्षणिक संस्थांना प्रात्यक्षिकाद्वारे 'रेडिओ विश्वास ९०.८'तर्फे देण्यात येत आहे. त्यात यावेळी महानॅब स्कूल फॉर दि ब्लाइंड, सातपूर; नाशिक व मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय, अशोक नगर, सातपूर, नाशिक या शाळेतील विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या.

यावेळी रेडिओ जॉकी सोहम शहाणे यांनी प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शब्दोच्चार आणि समयसूचकता यांचे महत्त्व रेडिओ जॉकीसाठी किती उपयुक्त आहे हे त्यांनी विशद केले. या क्षेत्रात करिअरसाठी भरपूर संधी असल्याचेही त्यांनी सांगितले. रेडिओ विश्वासच्या निवेदिका पूनम पाटील यांनी रेडिओचे ऑन एअर शेड्युलिंग, स्टुडिओची माहिती, रसिकांना आवडणारे कार्यक्रम व त्याचा प्रतिसाद याविषयी अनुभव कथन केले. रसिकांच्या प्रतिसादामुळे कार्यक्रमांमध्ये कशी विविधता आणता येते याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. रेडिओ विश्वासचे समन्वयक राजेश हिवरे म्हणाले की, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील संस्थांना आपले प्रश्न व नवनवीन संकल्पना मांडण्यासाठी पर्यायी व हक्काचे व्यासपीठ म्हणून रेडिओ विश्वासने पुढाकार घेतला आहे त्या माध्यमातून संस्थांचे कार्य जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे. तरी यात जास्तीत जास्त संस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विश्वास शेरीकर, हेमंत गवळे, पराग कानडे, प्रशांत बाविस्कर, ओवी जोशी यांनी रेडिओ विश्वासच्या विविध विभागांची माहिती दिली.

या उपक्रमात मनपा शाळा क्र. ५६-मुले व मनपा शाळा क्र. ६७-मुली (फुले नगर, नाशिक), आनंद निकेतन (पाईपलाईन रोड, गंगापूर रोड, नाशिक), नूतन प्राथमिक विद्यालय (गरवारे, अंबड, नाशिक), दिशा उपक्रम (विश्वास लॉन्स, सावरकर नगर, गंगापूर रोड, नाशिक), पाच बंगला प्राथमिक शाळा (खांडरे मळा, नाशिकरोड) व मनपा शाळा क्र. ७-मुली व मनपा शाळा क्र. २९-मुले (मखमलाबाद नाका, नाशिक) या शाळा सहभागी झाल्या.

**'फोटोग्राफी व फोटो फिल्म मेकिंग' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा**

(शनिवार, दि. १७ जानेवारी २०१५)

'फोटोग्राफी व फोटो फिल्म मेकिंग' या विषयावर प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

फोटोग्राफी हा सर्वांच्या आवडीचा विषय असून आताच्या डिजिटल जमान्यात मोबाइलमुळे प्रत्येकाच्या हातात कॅमेरा आला आहे. प्रत्येकजण महत्त्वाचे क्षण आपल्या कॉमेऱ्यात बंदिस्त करू इच्छितो, मात्र फोटोग्राफी कौशल्याच्या अभावामुळे हे क्षण उत्तमरीत्या कॉमेऱ्यात बंदिस्त होत नाहीत. संस्था, संघटना आणि इतर कार्यालये जेथे तुम्ही काम करतात तेथे चालणाऱ्या नियमित उपक्रमांमध्ये फोटोग्राफीला अत्यंत महत्त्व आहे.

तसेच कार्यक्रम, बैठका, कामाचे सादरीकरण व दस्तऐवजीकरण अशा विविध गोष्टींसाठी फोटोग्राफी कौशल्य महत्त्वाचे आहे. याच फोटोची फिल्म तयार केल्यास तुमच्या सादरीकरणातून तुमची प्रतिमा उंचावण्यास मोलाचा हातभार लागतो. अगदी नवख्या व्यक्तीलासुद्धा फोटोग्राफी व फोटोफिल्म बनविण्याची कला अवगत व्हावी यासाठी सदर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेत तज्ज्ञ प्रशिक्षक राजेश हिवरे यांनी फोटो कॅमेरा वापराचे साधे-सोपे तंत्र, फोटो काढण्यासाठी कोणकोणती काळजी घ्यावी, फोटोग्राफीचे विविध प्रकार, प्रकाशयोजना वापराचे कौशल्य, फोटोफिल्म कशी तयार करावी व त्याचे एडिटिंग कसे करावे हे विविध टुल्सचा वापर करून प्रात्यक्षिकांद्वारे शिकविले.

**'जाणीव सामाजिकतेची' उपक्रमांतर्गत सामाजिक व शैक्षणिक संस्थांसाठी कार्यशाळा**

(बुधवार, दि. २१ जानेवारी २०१५ ते शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०१५)

समुदायाच्या मूलभूत प्रश्नांना घेऊन ते सोडवण्यासाठी कम्युनिटी रेडिओ हे प्रभावी माध्यम असून त्याचा उपयोग करून समाजातील दुर्लक्षित, वंचित घटकांना एकत्र आणून विकासाचा विचार प्रत्यक्षात आणण्यात निश्चित मदत होते. त्यासाठी या माध्यमात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने आपला सहभाग नोंदवावा, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या दीपाली मानकर यांनी केले.

विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. तर्फे 'जाणीव सामाजिकतेची' उपक्रमांतर्गत नाशिकमधील सामाजिक, शैक्षणिक संस्थांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या शुभारंभाप्रसंगी दीपाली मानकर बोलत होत्या. प्रतिष्ठानच्या सभागृहात सदर प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली.

यात सहभागी संस्थांच्या सहभागातून विविध कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, पालक हे कार्यक्रमाची निर्मिती करून 'रेडिओ विश्वास'वर सादर करणार आहेत. सर्वसामान्यांच्या दारापर्यंत 'रेडिओ विश्वास'चा आवाज पोहोचणार आहे.

या कार्यशाळेत कार्यक्रम निर्मिती विषयी 'आजीच्या गोष्टी' या कार्यक्रमाच्या सादरकर्त्या भाग्यश्री काळे यांनी मार्गदर्शन केले. आजच्या काळात चांगल्या संस्काराची जोपासना करण्याची गरज असून त्यासाठी पालकांचा, मोठ्यांचा आदर राखा व सन्मार्गाकडे वाटचाल करा, असे सांगितले व यावेळी त्यांनी काही गोष्टींचे सादरीकरण केले.

'रेडिओ जॉकी' या विषयावर सोहम शहाणे यांनी प्रसंगनिष्ठता, समयसूचकता, वाचन यावर मार्गदर्शन केले. निवेदक, सूत्रसंचालक, ओ.बी. रेकॉर्डर, संहिता लेखन या विषयी हेमंत गवळे यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे नियोजन व आखणी या विषयी राजेश हिवरे यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, या माध्यमातून सामाजिक व शैक्षणिक संस्थांना आपले प्रश्न व नवनवीन संकल्पना मांडण्यासाठी व्यासपीठ ठरणार आहे. संस्थांची अभिनव व वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैली यामुळे समाजापर्यंत पोहोचणार आहे.

या प्रशिक्षण कार्यशाळेत दिशा उपक्रम सावरकरनगर, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, प्राथमिक/माध्यमिक विद्यालय अशोकनगर, मनपा शाळा क्र. ७ (मुली), मनपा शाळा क्र. २९ (मुले), मखमलाबाद नाका, महानॅब स्कूल सातपूर, मनपा शाळा क्र. ५६ (मुले) फुलेनगर, आनंद निकेतन सातपूर, मनपा शाळा क्र. ६७ (मुली) फुलेनगर, पाच बंगला प्राथमिक शाळा नाशिकरोड, नूतन प्राथमिक विद्यालय अंबड, मनपा शाळा क्र. ३३ (मुली), मनपा शाळा क्र. ७१ (मुले), आनंदवल्ली या शाळांनी सहभाग नोंदवला.

**द गोल्डन ड्रीम ( स्पॅनिश ) भाषेतील चित्रपट**

(शनिवार, दि. २४ जानेवारी २०१५)

सुप्रसिद्ध दिग्दर्शक दिएगो क्वेमाडा डिएझ (ग्वाटेमाला) यांचा 'द गोल्डन ड्रीम' हा स्पॅनिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. ग्वाटेमाला मध्य अमेरिकेतील एक गरीब देश जुआन, सारा आणि सॅम्युएल ह्या तीन किशोरावस्थेतील मुलांना अमेरिकेचे सोनेरी स्वप्न खुणावत आहे. ते तसे जगभरच्या अनेकांना खुणावत असते व त्यामुळेच अनेक देशातील लोक व्यापाराच्या, नोकरीच्या वा चांगल्या राहणीमानाच्या शोधात अमेरिकेची वाट गेली कित्येक दशके शोधत आहेत. हा त्यातलाच एक काहीसा रोमांचक आणि तितकाच खडतर प्रवास. वाटेत मेक्सिको ओलांडताना चालत, ट्रेनने व रस्त्यावर मिळेल त्या वाहनांनी प्रवास करत हे त्रिकूट त्या सोनेरी स्वप्नांच्या जवळ पोहोचते.

सोनेरी स्वप्नांचे काय? शेवटी ते स्वप्नच, पण त्यांचा प्रवास मात्र रोमांचक, उत्कट व श्वास रोखून धरायला लावणारा होता.

# विभागीय केंद्र, लातूर
## कार्यवृत्त

**यशवंतरावांचे व्यापक राजकारण आणि निवडणूक सुधारणा**

(बुधवार, दि. १० सप्टेंबर २०१४)

महाराष्ट्रातील थोर समाजवादी विचारवंत मा. श्री. पन्नालालजी सुराणा यांचे विभागीय केंद्राच्या वतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध विचारवंत माजी खा. डॉ. जे. एम. वाघमारे हे होते. कार्यक्रमाचा विषय यशवंतराव चव्हाण यांचे व्यापक राजकारण आणि निवडणूक सुधारणा हा होता.

निवडणूक सुधारणांविषयी बोलताना सुराणा पुढे म्हणाले की, '५४२ पैकी ३०० खासदार हे करोडपती आहेत. जर्मन देशाप्रमाणे स्टेट इलेक्शन फंडाची तरतूद करावी. तारकुंडे समितीच्या सूचनेप्रमाणे इ.व्ही.एम. मशिन बंद करून मूठभर भांडवलदारांचे अमाप हित टाळावे. नेपाळ व जगातील अन्य ३२ देशाप्रमाणे, प्रमाणशीर प्रतिनिधित्व स्वीकारावे. ५१ टक्के मते मिळाले तरच प्रतिनिधी म्हणून घोषित करावे आणि प्रत्येक पक्षाने योग्य उमेदवारांची नावे प्रारंभीच रीतसर द्यावीत.

अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. वाघमारे म्हणाले की, यशवंतराव हे अत्यंत व्यापक विचारांचे होते. व्यापक दृष्टिकोनाशिवाय आपणास समाज सोडून जातीय ऐक्य टिकवणे हे कदापि शक्य नाही असा त्यांचा ठाम विश्वास होता. सहकारासह शिक्षणावर त्यांचा अधिक जोर होता. शिवाय सत्तेच्या विकेंद्रीकरणालाही त्यांनी विशेष गती दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव मा. हरिभाऊ जवळगे यांनी केले तर मा. गणपतराव तेलंगे यांनी सूत्रसंचालन केले. रामकुमार रायवाडीकर यांनी आभार प्रदर्शन केले.

**मराठवाडा मुक्तिसंग्राम दिवस**

बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०१४ - विभागीय केंद्राच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी 'मराठवाठा मुक्तीसंग्राम दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वातंत्र्यसेनानी व ज्येष्ठ पत्रकार श्री. जीवनधर शहरकर हे होते. याप्रसंगी मराठवाडा मुक्तीसंग्रामात काम केलेल्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांचा विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. खा. डॉ. जनार्धन वाघमारे, सचिव हरिभाऊ जवळगे व इतरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### हिंगोली

**ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा**

बुधवार, दि. २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त थोर स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे हे उपस्थित होते. याप्रसंगी हरिभाऊ जवळगे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व आनंद याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना दादासाहेब शिंदे यांनी जेष्ठ बंधू-भगिनींना आपले अनुभव सांगून आनंदाचा उत्सव साजरा केला.

दुपारचे सत्र : गांधी विचारावर आधारित कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूर व महात्मा गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. या सत्रातच खालील ज्येष्ठ बंधु भगिनींचा सत्कार करण्यात आला.

१. नागोराव इंगोले.
२. एम. एम. नरवाडे
३. मा. आ. गलांडे
४. नागोराव लोखंडे
५. नारायणाव बांगर

६. श्रीमती फुलाबाई वावळे

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागीय केंद्राचे हिंगोली जिल्हा प्रमुख ज्येष्ठ संचालक प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे तसेच प्रा. किशोर इंगोले, प्रा. आर. बी. भाकरे यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

**हिंगोली**

**स्वयंरोजगार निर्मिती कार्यशाळा**

बुधवार दि. ८ ऑक्टोबर २०१४ रोजी विभागीय केंद्र लातूर व दर्पण सेवाभावी महिला संस्था हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंरोजगार कार्यशाळा शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित शिवाजी महाविद्यालय येथे घेण्यात आली. वरील संदर्भात या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. श्री. अशोक कुमार (उपसंचालक, एम.एस.जी.सी.एम. इंडिया) हे लाभले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती विद्याताई पवार या होत्या. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून विभागीय केंद्राचे सचिव व नांदेड जिल्ह्याचे डॉ. व्ही. एन. इंगोले, प्रा. उत्तम सूर्यवंशी हे लाभले होते.

**लातूर**

दि. २ आक्टोबर २०१४. विभागीय केंद्राच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री या दोन्ही महामानवांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

**बैठक :**

रविवार दि. ९ नोव्हेंबर २०१४, रोजी मंगळवार दि. २५ नोव्हेंबर २०१४ रोजी येत असलेल्या लोकनेते यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने होणाऱ्या कार्यक्रमानिमित्त विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन कार्यक्रमाची रूपरेषा व कामाची विभागणी करण्यात आली.

**परिसंवाद : लोकनेते यशवंतराव यांचा स्मृतिदिन**

मंगळवार दि. २५ नोव्हेंबर २०१४ रोजी यशवंतराव चव्हाण साहेबांचा स्मृतिदिन विभागीय केंद्राच्या वतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा विषय : भारतातील सध्याची राजकीय परिस्थिती हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. याप्रसंगी त्यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती मांडली.

प्रमुख वक्ते म्हणून ॲड. मनोहरराव गोमारे यांनी हा देश विविध जाती, जमाती, धर्म, पंथ, भाषा यांचा आहे. त्यामुळे सद्य राजकीय परिस्थितीत धर्मनिरपेक्षता टिकवणे हे मोठ आव्हान सरकारपुढे असून त्याकरिता पुरोगामी संघटना व नागरिकांनी दक्ष असण्याची गरज आहे.

दुसरे वक्ते म्हणून मा. त्र्यंबकदास झंवर यांनी यशवंतरावांनी लोकशाहीचे विकेंद्रीकरण करून चांद्यापासून बांद्यापर्यंत एकसंध महाराष्ट्र घडविला. आजच्या राजकीय परिस्थितीत यशवंतरावांच्या विचारांच्या स्मृतीचा जागर करणे खूप गरजेचे आहे.

याप्रसंगी वक्ते विठ्ठल मोरे यांनी, हा देश संविधानाच्या चौकटीनुसार मार्गक्रमण करतो. मात्र चौकटीबाहेर व्यवस्था जात आहे असे लक्षात येताच जनतेने सत्तांतरण केले आहे, ही वस्तुस्थिती विशद केली.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. जनार्दन वाघमारे सरांनी सद्य राजकीय परिस्थिती बदललेली असून एकाच विचारसरणीवर युवक विश्वास ठेवतील असे नाही तर समुद्राच्या लाटा ज्याप्रमाणे बदलत असतात तशाच पद्धतीने विचारसरणी बाबतीत सातत्याने परिवर्तनशीलता दिसून येत असते. ही परिवर्तनशीलता राजकीय पक्ष व कार्यकर्त्यांसाठी गरजेची असते. मोदींच्या वाटचालीसंदर्भात बोलताना सबका साथ सबका विकास, श्रमवेय जयते इ. विचारांचा सकारात्म उल्ले करून ३७० कलम, राम मंदिर, समान नागरी कायदा या जाहिरनाम्यातील मुद्याकडे दुर्लक्ष केल्याचे प्रतिपादन केले.

शेवटी आभार फ. म. शहाजिंदे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम कदम व अरविंद कांबळे यांनी केले. याप्रसंगी शहरातील विविध स्तरावरील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

### नांदेड

### जनसामान्यांसाठी यशवंतराव चव्हाण यांनी आयुष्य समर्पित केले

विभागीय केंद्र लातूरच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०१४ रोजी लालबहादूर शास्त्री हॉल नांदे येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. भगवान अंजनीकर यांनी मुलांसाठी 'आदर्श लोकनेता - यशवंतराव चव्हाण' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. भु. द. वाडीकर हे होते. ते म्हणाले, 'जनसामान्यांसाठी यशवंतराव चव्हाण यांनी आयुष्य समर्पित केले.' यावेळी प्रा. डॉ. जगदीश कदम, प्रा. महेश मोरे, देवदत्त साने, प्रा. नारायण शिंदे, प्रकाशक निर्मलकुमार सुर्यवंशी, आनंदराव शिंदे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्र. उत्तम सूर्यवंशी यांनी केले तर आभार निर्मलकुमार यांनी मानले.

### लातूर

### महात्मा जोतिबा फुले यांना विनम्र अभिवादन

विभागीय केंद्राच्या वतीने महामानव सामाजिक क्रांतीचे आद्य प्रणेते जोतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्र लातूरचे कळंब तालुका संपर्कप्रमुख मा. श्री. सुभाषराव टेकाळे हे होते, याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव, प्रसिद्ध नाट्यलेखक मा. श्री. हरिभाऊ जवळगे म्हणाले की, सामाजिक क्रांतीचे आद्य प्रणेते महात्मा फुले यांना त्या काळातील सर्व दृष्टीने प्रतिगामी असलेल्या प्रवाहाविरोधात लढावे लागले. ते ज्या समाजात जन्मले त्यावेळी त्या समाजाने पण त्यांना या बंडखोर वृत्तीमुळे अक्षरश: वाळीत टाकले. महात्मा फुले व त्यांच्या पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या दोघांचा त्यावेळी बेभान असा सर्व बाजूने छळ झाला. अशा अतिअवघड परिस्थितीत त्यांनी आपला महाराष्ट्र चुकीच्या जुन्या चालीरीती, जातीयता, अंधश्रद्धा यातून मुक्त करण्यासाठी त्यांच्यासमोरच्या डोंगराएवढ्या समस्यांना तोंड देत शिक्षणाचा प्रसार प्रचार करून आपले राज्य सर्व दृष्टीने पुरोगमी विचाराचे करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या मानवतेच्या विचाराची धुरा राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजे सयाजीराव गायकवाड, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, साने गुरुजी, बाबा आमटे, डॉ. नरेंद्र दाभोलकर इ. व आज ती पुरोगामित्वाची पताका आपल्या खांद्यावर घेऊन जीवन जगत असलेले आपल्या राज्याचे माजी गृहमंत्री भाई वैद्य, माजी कुलगुरू तथा माजी खासदार डॉ. जनार्दन वाटमारे, कामगार नेते बाबा आढाव, पन्नालाल सुराणा इ. मान्यवर आपल्या परीने महात्मा फुले यांचे पुरोगामित्वाचे यश टिकविण्यासाठी धडपडत आहेत. म्हणूनच मला सद्यस्थितीत वाटते की, महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पेरलेले हे पुरोगामी विचार जिवंत ठेवणे हे आजच्या तरुणांच्या हातात आहे.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. सुभाषराव टेकाळे यांनी आपले यथोचित विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. यशवंत भोसले यांनी केले तर सूत्रसंचालन मा. श्री. एस.बी. गायकवाड व शेवटी सर्वांचे आभार मा. श्री. जी. डी. माळी यांनी मानले.

दि. १२ डिसेंबर २०१४. लोकनेते शरदचंद्रजी पवार साहेब यांचा ७४ वा वाढदिवस विभागीय केंद्र लातूर व शरद कृषी फाउंडेशन लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक अत्यंत सद्यस्थितीत लोकोपयोगी असा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचा विषय, 'आजच्या अल्पभूधारक कोरडवाहू शेतकऱ्याचे प्रश्न'. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरद कृषी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. श्रीधरराव जाधव हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून माजी खा. तथा या विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे लाभले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरील दोन्हीही संस्थेचे सचिव मा. हरिभाऊ

जवळगे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकेत त्यांनी सद्यस्थितीत शरद कृषी फाउंडेशन व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र लातूरच्या वतीने वरीलप्रमाणे कार्यक्रम घेणे गरजेचे आहे असे सांगितले.

### नांदेड

**पारंपरिक शेतीसोबत जोड व्यवसाय काळाची गरज**

विभागीय केंद्र लातूर व मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने आखाळा बाळापूर येथे दि. १४.१२.२०१४ रोजी 'दुष्काळाशी मुकाबला - शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि लोकप्रतिनिधींशी संवाद' या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत बोलताना खा. राजीव सातव यांनी पारंपरिक शेतीमुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाचा फटका बसतो, या शेतीबरोबर जोडव्यवसाय ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले.

यावेळी आमदार डॉ. संतोष टारफे, आ. रामराव वडकुते आणि माजी आमदार विजय खडसे यांची भाषणे झाले. स्वातंत्र्यसैनिक भिमराव बोंढारे हे अध्यक्षस्थानी होते. प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक केले.

### लातूर

**साने गुरुजी जयंती उत्सव**

बुधवार दि. २४ डिसेंबर २०१४ रोजी विभागीय केंद्राच्या वतीने विद्यार्थी विद्यार्थिनींकडून साने गुरुजी कथामालेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी या कथामालेचा प्रचार प्रसार करून प्रा. श्याम आगळे यांनी विभागीय केंद्राला मोलाचे सहकार्य केले.

### उस्मानाबाद

**आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबीर**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूर व उस्मानाबाद येथील बिल गेटस् महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मीना जिंतूरकर यांचे आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सौ. चंद्रिका परमार या होत्या. प्रा. सौ. विद्यादेवी गायकवाड, प्रा. कु. सुप्रिया शेटे, प्रा. कु. शिल्पा पारवे त्याचबरोबर मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### लातूर

बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०१४. विभागीय केंद्र लातूर व अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा शाखा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने २०१४ या वर्षाला निरोप व २०१५ या नववर्षाचे स्वागत या निमित्ताने लातूर शहरातून अनेक शाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, इतर सेवाभावी संस्था सोबत घेऊन शहरातून रात्री भव्य अशी रॅली काढण्यात आली. या रॅलीत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव मा. श्री. माधव बावगे, लातूर जिल्ह्याचे अध्यक्ष प्राचार्य अनिरुद्ध जाधव तसेच विभागीय केंद्राचे सचिव तथा अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष मा. श्री. हरिभाऊ जवळगे इ. मान्यवर सहभागी झाले होते.

**नववर्षाचे स्वागत**

विभागीय केंद्र लातूर व शिवजी शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित शिवाजी महाविद्यालय येथे दोन्हीही समाजसेवी संस्थेच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे व नांदेड जिल्हा प्रमुख श्री. व्ही. एन. इंगोले हे होते. यादिवशी अगदी उत्स्फूर्तपणे अनेकांनी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवला.

### हिंगोली

**'मुलगी ही दोन्हीही घरची उद्धारकर्ती'**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त 'मुलगी ही दोन्हीही घरची उद्धारकर्ती' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्रीमती मंगलाताई वावले या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. रंगनाथराव मुंडे (शिवराबेल, ता.

कळमनुरी, जि. हिंगोली) हे होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्याचे वैशिष्ट्य म्हणजे मा. श्री. रंगनाथराव मुंडे यांना त्यांच्या मुलाला पहिली मुलगी झाली म्हणून त्यांनी या मुलीचा जन्मोत्सव आपल्या शिवराबेल या गावांला गावजेवण देऊन त्यांनी आपल्या नातीचे नाव राजनंदिनी असे ठेवले. याचा आदर्श सर्वांनी घ्यावा हाच विभागीय केंद्राचा या कार्यक्रमागचा मुख्य उद्देश होता.

### उस्मानाबाद

विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबाद तर्फे ३ जानेवारी २०१५ रोजी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त साक्षर महिला प्रगतीचे पहिले पाऊल या विषयावर प्रा. रविंद्र घाडगे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे विभागीय सचिव मा. श्री. हरिभाऊ जवळगे तसेच विभागीय केंद्राचे जेष्ठ संचालक ॲड. मनोहरराव गोमारे हे लाभले होते. सर्वांचे स्वागत उस्मानाबाद शाखा प्रमुख रमेशराव दापके यांनी केले.

दि. १२ जानेवारी २०१५. विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबाद तर्फे बिल गेट्स महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपकेंद्र उस्मानाबाद येथील व्यवस्थापनशास्त्र विभागाचे प्रा. विक्रम शिंदे यांचे युवकापुढील आव्हाने आणि उपाय या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

युवाशक्ती ही भारताचे भविष्य आहे पण आजचा युवक हा व्यसनाधीनतेमध्ये अडकलेला आहे. जगामध्ये सर्वात जास्त युवक असलेल्या आपल्या भारत देशात आव्हाने खूप आहेत. समस्या खूप आहे. पण या युवकांकडे उपाय कमी नाहीत असे प्रा. विक्रम शिंदे यांनी आपले विचार प्रकट करताना सांगितले. याप्रसंगी उस्मानाबाद शाखेचे अध्यक्ष डॉ. रमेश दापके तसेच महाविद्यालयातील प्रा. रजवी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

### लातूर

विभागीय केंद्र लातूर व विवेकानंदपुरम् एम. आय. डी. सी. लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महामानव स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंदपुरम् या संस्थेचे अध्यक्ष मा. आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून लातूर विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. खा. डॉ. जनार्दन वाघमारे तसेच या विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे व यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी डॉ. जनार्दन वाघमारे यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी आपले विचार मांडले.

### नांदेड

**जिजाऊ माँसाहेब स्वराज्याची प्रमुख प्रेरणा होती.**

विभागीय केंद्र लातूरच्या वतीने माँ जिजाऊ साहेब जयंती दि. १२ जानेवारी २०१५ रोजी साजरी करण्यात आली. प्रमुख वक्ते म्हणून स्वातंत्र्यसेनानी भिमरावजी बोढारे हे होते. त्यांनी जिजाऊ माँसाहेब या खऱ्या अर्थाने स्वराज्याचे प्रेरणास्थान होते असे प्रतिपादन केले. प्रास्ताविक शहाजी सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

### उस्मानाबाद

**दि. १४ जानेवारी २०१५**

विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबादतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त विद्यापीठाच्या उपकेंद्रातील इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. जी. व्ही. कोकणे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उस्मानाबादचे नगरसेवक मा. पृथ्वीराज चिलवंत, प्रा. रजवी त्याचबरोबर मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### उस्मानाबाद

**दि. १९ जानेवारी २०१५**

विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबादतर्फे

यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान या विषयावर केकस्थळवाडी येथे उस्मानाबादचे नगरसेवक मा. सय्यद खलील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी विद्यापीठ सिनेट सदस्य मा. नितीन बागल, पंचायत समितीचे माजी सभापती मा. रामचंद्र पाटील, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे उस्मानाबाद शाखेचे अध्यक्ष डॉ. रमेश दापके, प्रा रजवी यांनी आपंले मनोगत व्यक्त केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक व इतर कर्मचारी, गावातील नागरिक उपस्थित होते.

**उस्मानाबाद**

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंता व चिंतन या विषयावर चर्चासत्र**

(दि. १९ जानेवारी २०१५)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूर शाखा उस्मानाबाद तर्फे सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते व गाढे अभ्यासक प्रा. अर्जुन जाधव यांचे शेतकऱ्यांच्या आत्महत्या: चिंता व चिंतन या विषयावर चर्चासत्र आयोजित  कण्यात आले.

प्रा. अर्जुन जाधव म्हणाले की, शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. याच पोशिंद्यावर आत्महत्येची वेळ येते ही फार दुर्दैवाची गोष्ट आहे. आजचा शेतकरी हा कर्जबाजारी आहे. मनाने खचलेला आहे, पण अपयशाने खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने, प्रेरणेने स्वयंप्रेरित होऊन शेती करावी आणि आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येविषयी चिंता नव्हे तर चिंतन झाले पाहिजे. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे उस्मानाबाद शाखेचे अध्यक्ष डॉ. रमेश दापके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला प्रा. रजवी, प्रा. कुंभार, प्रा. जमाले, प्रा. अमोल राऊत तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे - भाग १ - संकलन : डॉ. व्ही. जी खोबरेकर | २५०.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधिमंडळ - भाग २ - संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट - वाय. बी. चव्हाण - खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | १०.०० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ०६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि.स. पागे | ३५.०० |
| ०८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन: पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन : पी.बी. पाटील. | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन - डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक-वेधक - डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्री रत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | 'संवादिनी' - सुप्रिया सुळे | २०.०० |

| | | |
|---|---|---|
| २८. | Appraising Schools - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| २९. | 'शाळांचे प्रगतिपुस्तक' - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| ३०. | Yashwantrao Chavban an Autobiography | ३९५.०० |
| ३१. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र - कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३२. | यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३३. | शिक्षणव्रती - डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३४. | शिक्षणकट्टा - बसंती रॉय | २००.०० |
| ३५. | वाटचाल ई-शिक्षणाची - बसंती रॉय | २००.०० |
| ३६. | हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |

## डीव्हीडी व व्हिडिओ कॅसेट्स

- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेथे यांचा जीवनपट, दिग्दर्शक - श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक - विनय नेवाळकर
- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक - जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणीवांचा.....' लघुपट, दिग्दर्शक - चंद्रकांत कुलकर्णी

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित...
# यशवंत बालचित्रपट महोत्सव

## औरंगाबाद

महोत्सवाचा आनंद घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १२,०००





## नांदेड

महोत्सवाचा आनंद घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ११,५००





## नाशिक

महोत्सवाचा आनंद घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३,०००





# MS-CIT ACHIEVERS



| Malhari Katkar | Pradnya Kanojia | Rahul Gupta | Shakuntala Dhurve | Prashant Harwade |
|---|---|---|---|---|
| 99% | 96% | 95% | 95% | 95% |

# MS-CIT करा

MKCL

|| Creating a Knowledge Lit World ||



## Last Date Of Admission 11th Of Every Month

YCP

**Tel. No. : 22817975 / 22043617 / 19**

**Mobile No.: 9769256343**



- क्रिएटीव्ह डिजीटल आर्टस्
- स्मॉल बिझनेस मॅनेजमेंट
- बँकिंग फायनान्स सर्व्हिस अॅण्ड इन्श्युरन्स ट्रॅक
- हार्डवेअर अॅण्ड नेटवर्किंग

MKCL KLiC Diploma

Gateway to Knowledge Lit Careers

### डिजीटल आर्टस्, ग्राफिक्स् आणि ॲनिमेशन

| | |
|---|---|
| Ps डिप्लोमा इन इमेज एडिटींग | **Photoshop CS4** |
| **Create :** Logos, Photo Albums, Greetings, Artworks and Artistic Designs, etc. | |
| Ai डिप्लोमा इन कन्टेन्ट इलस्ट्रेशन | **Illustrator CS4** |
| **Prepare:** Illustrations, Brochures, Stationery, Invitations, Artworks, Signposts, etc. | |
| ID डिप्लोमा इन डेस्कटॉप पब्लिशिंग | **In Design CS4** |
| **Design:** Newspaper, Manual & Magazine Layouts, Photobook Designs, etc. | |
| Dw डिप्लोमा इन वेब डिझायनिंग | **Dreamweaver CS4** |
| **Learn:** Website Designing, Banner Ads, etc. | |
| Fl डिप्लोमा इन टु-डी ॲनिमेशन | **Flash CS4** |
| **Animate:** Movies, eLearning content, Audio Video presentation, etc. | |

कोर्स फी रु.□□□□/प्रत्येकी

### डिप्लोमा इन फायनांशियल अकौंटिंग कोर्स

Tally टॅली ईआरपी ९ सह — **Tally with ERP 9**

कोर्स फी रु.□□□□/-

MKCL wave